CMYK



सदाफुलीसह

# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, १ एप्रिल २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १२३ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

TATA IPL

लखनौ वि. दिल्ली

वेळ : सायं.७.३० वाजता

ठिकाण : लखनौ

---

सोलापूर तरुण भारत

### नम्र सूचना!

छपाई साहित्याच्या दरवाढीमुळे नाईलाजास्तव आजपासून '**सोलापूर तरुण भारत**' अंकाची किंमत ८ रुपये करीत आहोत. तरी आमचे वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी आम्हाला नेहमीप्रमाणे सहकार्य करावे, ही विनंती.

**- व्यवस्थापक**

---

## विचारपुष्प



'स्वयंसेवक' या शब्दातच फार मोठा अर्थ भरलेला आहे. स्वयंसेवक म्हणजे अंत:प्रेरणेने, नि:स्वार्थ बुद्धीने स्वत:हून जो पुढे येतो, देशाच्या हितासाठी जो काम करतो, संघटन ही महाशक्ती निर्माण करण्यासाठी आपण प्राणपणाने लढले पाहिजे, देशभर जिकडे तिकडे अशी वृत्ती ठेवणारे स्वयंसेवक देशभरात उत्पन्न केले पाहिजेत असे ज्याला वाटते तो स्वयंसेवक.

**- बाबासाहेब आपटे**

रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

---

# राज्यात रेडीरेकनर दर 'जैसे थे'

**राज्य सरकारचा निर्णय**



**◆ पुणे, ३१ मार्च**

**आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे बाजारपेठांमध्ये निर्माण झालेली परिस्थिती, आर्थिक मंदीच्या पृष्ठभूमीवर राज्य सरकारने यंदाच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षातील चालू बाजारमूल्यदर (रेडीरेकनर) जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यात रेडीरेकनरचे दर सरासरी ३.९२ एवढेच राहणार आहेत. त्यामध्ये महापालिका क्षेत्रात (मुंबई वगळता) ५.९५ टक्के, तर बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रात सरासरी ३.३९ टक्के रेडीरेकनरचे दर कायम राहणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे गृह खरेदीदारांना दिलासा मिळाला आहे.**

राज्याचे सह नोंदणी महानिरीक्षक राजेंद्र मुठे आणि सहसंचालक धनंजय खोत यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत राज्यातील वार्षिक मूल्यदराबाबत माहिती दिली. कोरोनामुळे १ एप्रिल २०२० ऐवजी सप्टेंबर २०२० मध्ये रेडीरेकनर दरात वाढ करण्यात आली होती. त्यानंतर २०२१-२२ या आर्थिक वर्षात रेडीरेकनरचे दर 'जैसे थे' ठेवण्यात आले होते. कोरोनामुळे राज्याची आर्थिक स्थिती खालावल्याने २०२२-२३ या वर्षी राज्यात रेडीरेकनरमध्ये ४.८१ टक्के घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्यानंतरची दोन वर्षे म्हणजेच २०२३-२४ आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षात रेडीरेकनर दर 'जैसे थे' ठेवण्यात आले होते. पुन्हा २०२५-२६ मध्ये सरासरी ३.९२ टक्के वाढ करण्यात आली होती. मात्र, यंदाच्या आर्थिक नवर्षाच्या सुरुवातीलाच आखाती देशांमध्ये युद्ध सुरू असल्याने त्याचा परिणाम भारतातील विविध राज्यांवर पडला आहे. करोनोसदृश परिस्थितीसारखे हळूहळू वातावरण निर्माण होत असून, बाजारपेठांमध्ये मंदीचे वातावरण तयार होत आहे.

याबाबत क्रेडाई, बांधकाम व्यावसायिक आणि सामाजिक संघटनांनी अशा परिस्थितीत रेडीरेकनरचे दर वाढवू नये, अशी मागणी मुख्यमंत्री आणि महसूलमंत्री यांच्याकडे केली होती. मात्र, हरकती आणि सूचनांचा प्रस्ताव तयार करून राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. *(तभा वृत्तसेवा)*

### सुसूत्रतेसाठी तांत्रिक बदल

**राज्य सरकारने रेडीरेकनरचे दर वाढवले नसले, तरी रेडीरेकनरमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी अनेक तांत्रिक बदल केले आहेत. ज्या नागरी क्षेत्रात विकास आराखडे (डीपी) मंजूर अथवा सुधारीत आहेत, अशा ठिकाणी संबंधित विकास आराखड्याच्या क्षेत्रानुसार (झोन) मिळकतींचे दर लागू होणार आहे.**

### वैशिष्ट्ये

- **विकास आराखडे, योजना मंजूर आणि सुधारीत झाल्याने त्याचा अंमल नव्याने करण्यात आला आहे.**
- **मंजूर प्रादेशिक योजना तसेच विकास आराखड्यांबाबत फेरबदलाची नोंद घेऊन दरात बदल करण्यात आला आहे.**
- **गहाळ मिळकती, गावे यांना दर गावांची नावे दुरुस्ती यांचा समावेश करण्यात आला आहे.**
- **उपमूल्य विभाग तसेच सूक्ष्म मूल्यविभाग तयार करण्यात आले.**
- **सर्व्हे नंबर, गट नंबर, याप्रमाणे स्वतंत्र बदल करण्यात आले आहेत.**

---

### टेनिसपटू लिएंडर पेसचा भाजपात प्रवेश

**◆ कोलकाता, ३१ मार्च**

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या उपस्थितीत मंगळवारी पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील पक्ष कार्यालयात भाजपात प्रवेश केला. त्यांनी सोमवारी तृणमूल काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा अधिकृत राजीनामा दिला होता. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर पेस यांचा पक्ष प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे.



पेस यांनी अलिकडेच कोलकाता येथे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली होती, तेव्हापासूनच त्यांच्या भाजपात प्रवेशाच्या चर्चेला उधाण आले होते. पेस २०२१ मध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये सामील झाले होते आणि २०२२ च्या गोवा विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी पक्षासाठी प्रचार केला होता. तथापि, त्यांनी आतापर्यंत निवडणूक लढवली नाही. माझा जन्म बंगालमध्ये झाला आणि माझी आई बंगाली आहे, असे त्यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

---

# मूत्रपिंडाची ९.५ लाखांत खरेदी, ९० लाखांमध्ये विक्री

## कानपूरमध्ये डॉक्टर दाम्पत्यासह १० जणांना अटक

**◆ कानपूर, ३१ मार्च**

कानपूरमध्ये मूत्रपिंडाची अवैध विक्री करणारे रॅकेट उघडकीस आले आहे. यात तीन खाजगी रुग्णालये गुंतली असून, त्यापैकी केवळ एका रुग्णालयाकडे परवाना असल्याचे तपासात आढळले. पीडितांकडून मूत्रपिंडांची साडेनऊ लाखांत खरेदी करून त्याची ९० लाखांत विक्री केल्याचेही तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी डॉक्टर दाम्पत्यासह १० जणांना अटक करण्यात आली आहे. चंद्रपूरच्या किडनी प्रकरणातील डॉक्टरही यात सहभागी असल्याचा संशय आहे.

पोलिसांच्या अहवालानंतर आरोग्य विभागाचे सीएमओ डॉ. रामित रस्तोगी, कल्याणपूर सीएचसीचे प्रभारी डॉ. राजेशसिंह आणि पथकातील इतर अधिकाऱ्यांनी सोमवारी तिन्ही रुग्णालयांची पाहणी केली. अधिकाऱ्यांच्या मते, या प्रकरणात अनेक वरिष्ठ डॉक्टरांची चौकशी केली जाऊ शकते. कारण, त्यापैकी काही डॉक्टर मोठ्या संस्थांशी संलग्न आहेत. आरोग्य विभाग आणि पोलिस सर्जन किंवा नेफ्रोलॉजिस्ट असलेल्या डॉक्टरांचाही शोध घेत आहेत.

या प्रकरणात नाव असलेल्या रुग्णालयांमध्ये साध्या शस्त्रक्रिया करण्याचीही सोय नाही. ही रुग्णालये अनेकदा मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी बाहेरून डॉक्टर बोलावतात. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या डॉक्टरांचीही चौकशी केली जाईल.

**डॉक्टरांसह एका तरुणाची चौकशी**

मूत्रपिंड प्रत्यारोपण प्रकरणी माहिती गोळा करण्यासाठी पोलिसांनी सोमवारी सायंकाळी पांडुनगर येथील रहिवासी डॉ. इंदरजितसिंग, त्यांचे भाऊ सुरजितसिंग आहुजा, त्यांची पत्नी डॉ. प्रीती आहुजा आणि आणखी एका तरुणाची चौकशी केली.

### मूत्रपिंडदात्याला बंद झालेल्या रुग्णालयात केले दाखल

**पोलिसांना तपासात मूत्रपिंडदात्याला आरोही रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. हे रुग्णालय सुमारे दोन महिन्यांपूर्वी बंद झाले होते.रुग्णालयाचा ऑपरेटर राजेशच्या सांगण्यावरून रुग्णाला दाखल करण्यात आले होते. पोलिसांनी घटनास्थळावरून रुग्णाचे नाव असलेली एक रुग्णालयाची स्लिप जप्त केली.**

यात सहभागी आहुजा रुग्णालय हे डॉ. इंदरजित आणि त्यांच्या कुटुंबाच्या मालकीचे असल्याचे सांगितले जाते. *(वृत्तसंस्था)*

---

# सेमीकंडक्टर भारताच्या आत्मनिर्भरतेचे प्रतीक

## ● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन ● 'मेड इन इंडिया-मेक फॉर द वर्ल्ड'चा दिला मंत्र

**◆ साणंद, ३१ मार्च**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुजरातच्या साणंद येथील केन्स सेमीकॉन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताची आत्मनिर्भरता मजबूत करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. देशातील हा अशा प्रकारचा दुसरा प्रकल्प आहे. उद्घाटनानंतर नरेंद्र मोदी यांनी 'मेड इन इंडिया-मेक फॉर द वर्ल्ड'चा मंत्र दिला.

### भारत बनला एक विश्वासार्ह पुरवठादार

**पंतप्रधान पुढे म्हणाले, या प्रकल्पात उत्पादन सुरू झाल्याने भारताने स्वत:ला एक विश्वासार्ह सेमीकंडक्टर पुरवठादार म्हणून स्थापित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. या दशकात महामारी, संघर्ष आणि जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्ययांमुळे जगावर विशेषतः चिप, दुर्मिळ खनिजे आणि ऊर्जा क्षेत्रांवर परिणाम झाला आहे.**

नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, साणंद आणि सिलिकॉन व्हॅलीदरम्यान एक नवीन पूल तयार झाला आहे. येथे उत्पादित होणाऱ्या उत्पादनांचा एक मोठा भाग निर्यातीसाठी आधीच निश्चित झाला आहे, जो 'मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड' हा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवत आहे. केन्ससारख्या भारतीय कंपन्या आता जागतिक सेमीकंडक्टर पुरवठा साखळीचा एक मजबूत भाग बनल्या आहेत. भविष्यात अनेक भारतीय कंपन्या जगाला एक विश्वासार्ह आणि मजबूत सेमीकंडक्टर पुरवठा साखळी प्रदान करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. *(वृत्तसंस्था)*

---

## महत्त्वाचे

### एअरटेल पेमेंटसला ३१ लाखांचा दंड

**मुंबई** : नियमांची पूर्तता न केल्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेने एअरटेल पेमेंटसला दणका दिला आहे. ३० मार्चच्या परिपत्रकानुसार, रिझर्व्ह बँकेने एअरटेल पेमेंटसला तब्बल ३१.८० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. वित्तीय प्रपत्र जाहीर करण्यासंदर्भातील नियमांची पूर्तता न केल्यामुळे रिझर्व्ह बँकेने बँकिंग नियमन कायद्यानुसार ही कारवाई केली आहे. रिझर्व्ह बँकेने एअरटेल पेमेंटसला कारणे दाखवा नोटीस जारी केली होती. याबाबत खुलासा मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेकडून इतर बँकांवरही कारवाई करण्यात आली आहे. यात कर्नाटकमधील द दावनगिरी जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह बँक आणि नगर सहकारी बँक लिमिटेड इटवाह उत्तरप्रदेश या बँकांचा समावेश आहे.

### एअर इंडिया एक्सप्रेस विमानाचे 'इमर्जन्सी लँडिंग'

**लखनौ** : एअर इंडिया एक्सप्रेसचे विमान हवेत असताना तांत्रिक बिघाड आल्यामुळे त्याचे लखनौमध्ये आपत्कालीन लँडिंग करण्यात आली. हे विमान सोमवारी सायंकाळी पश्चिम बंगालमधील बागडोगरा येथून दिल्लीला जात होते. विमान उत्तरप्रदेशातील आंबेडकरनगरवर असताना वैमानिकाच्या केबिनमध्ये धूर जाणवला. त्यावेळी विमान ३६ हजार फूट उंचीवर होते. वैमानिकाला धूर जाणवताच त्याने लखनऊ एअर ट्रॅफिक कंट्रोलला मेडे कॉल केला. मेडे कॉलनंतर प्रवाशांना ऑक्सिजन मास्क उपलब्ध करून देण्यात आले. लखनौमध्ये आपत्कालीन लँडिंगची परवानगी मिळताच सायंकाळी ५:१७ वाजता विमान सुरक्षितपणे उतरवण्यात आले. विमानात १४८ प्रवासी आणि चालक दलाचे सदस्य होते. ते सर्व सुरक्षित आहेत. अनेक प्रवाशांना दुसऱ्या विमानांनी दिल्लीला पाठवण्यात आले, तर काहींना हॉटेलमध्ये थांबवण्यात आले आहे. सुरक्षा आणि तांत्रिक पथके विमानात तपासणी करीत आहेत.

### भारतासह जगभरात इंटरनेट बंद होण्याचा धोका

**तेलअवीव** : अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझ प्रभावित झाल्याने जगभरात ऊर्जा संकटापाठोपाठ आता इंटरनेट ठप्प होण्याचा धोका आहे. याचे कारण असे की, होर्मुझ मार्गातून केवळ जगातील २०% कच्चे तेल आणि २५% ङछ्ऋ जात नाही, तर या मार्गाखाली इंटरनेट केबल्सही टाकलेल्या आहेत. जर या प्रदेशात तणाव वाढला किंवा केबल्सना नुकसान झाले, तर भारतासह संपूर्ण जगात इंटरनेटचा वेग मंदावू शकतो.

---

# राज्यात १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांची बदली

**◆ मुंबई, ३१ मार्च**

आर्थिक वर्ष संपण्याच्या पूर्वसंध्येला राज्य शासनाने राज्यातील १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश जारी केला. या बदल्यांमध्ये काही महत्त्वाच्या पदांवर नव्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या सेवानिवृत्तीनंतर या पदासाठी अश्विनी भिडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या मुंबई महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त ठरल्या आहेत. तुकाराम मुंढे यांची महसूल व वन विभागातील आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे मनपाचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांची वसई-विरार महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

यासह लोकेश चंद्र यांची मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिवपदी, विकास चंद्र रस्तोगी यांची वित्त विभागात अतिरिक्त मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), विनिता वैद्य सिंघल यांची मृद व जलसंधारण विभागाच्या प्रधान सचिवपदी, परिमल सिंह यांची कृषी विभागाच्या सचिवपदी, लहू माळी यांची शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून, माणिक गुरसळ यांची दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदी, तर प्रेरणा देशभ्रतार यांची मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या बदल्यांमुळे राज्य प्रशासनात महत्त्वाचे फेरबदल झाले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

---

# भारतीय नौदलाच्या ताफ्यात तीन स्वदेशी युद्धनौका

## सागरी क्षेत्रात बळकट होणार क्षमता

**◆ नवी दिल्ली, ३१ मार्च**

भारतीय नौदलाच्या ताफ्यात तीन नवीन युद्धनौका सामील झाल्या. यामध्ये ॲडव्हान्स्ड गाईडेड मिसाईल फ्रिगेट दुनागिरी, सर्वेक्षण जहाज संधोधक आणि पाणबुडीविरोधी युद्धनौका अग्रय यांचा समावेश आहे. गार्डन रीच शिपबिल्डिंग ॲण्ड इंजिनिअर्स लिमिटेडने (जीआरएसई) या युद्धनौका बांधल्या असून, स्वदेशी संरक्षण निर्मितीच्या क्षेत्रात हे एक महत्त्वपूर्ण यश असल्याचे संरक्षण विभागाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

ॲडव्हान्स्ड गाईडेड मिसाईल फ्रिगेट दुनागिरी ही सर्वांत अत्याधुनिक नौकांपैकी एक आहे. १४९ मीटर लांब आणि ६,६७० टन वजनाची ही फ्रिगेट अत्याधुनिक शस्त्रे आणि सेन्सर्सने सुसज्ज आहे, यात प्रगत क्षेपणास्त्र प्रणाली आणि एकात्मिक युद्ध व्यवस्थापन प्रणालीचा समावेश आहे. ब्रह्मोस जहाजविरोधी आणि जमिनीवर मारा करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्रांनी, तसेच प्रगत संरक्षण प्रणालींनी सुसज्ज असलेली दुनागिरी नौदलच्या हल्ल आणि संरक्षण क्षमतेमध्ये एक मोठी झेप दर्शवते असे संरक्षण विभागाने म्हटले आहे. 'संधोधक' हे एक सर्वेक्षण जहाज आहे. अंदाजे ३,४०० टन विस्थापन आणि ११० मीटर एकूण लांबी असलेले हे सुधारित जहाज अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे. *(वृत्तसंस्था)*




कोलकाता येथील 'गार्डन रीच शिपबिल्डर्स ॲण्ड इंजिनियर्स लिमिटेड'ने बांधणी केलेली 'आयएनएस संशोधक' नौका नौदलाला सोपवण्यात आली. या सोहळ्याला उपस्थित असलेले नौसैनिक आणि अधिकारी

### पाळत, शोध, हल्ला करणे अधिक सोपे

**अग्रया हे अर्नाळा-श्रेणीतील पाणबुडीविरोधी उथळ पाण्यातील चौथे जहाज आहे. हे २०१७ मध्ये सेवेतून निवृत्त झालेल्या आयएनएस अग्रया या गस्ती जहाजाची जागा घेईल. हे जहाज पूर्ण-प्रमाणातील पाण्याखालील पाळत, शोध आणि हल्ला, मोहिमा, तसेच विमानांसोबत समन्वित कारवाया करण्यास सक्षम आहे. ते हलक्या वजनाच्या टॉर्पेडो व पाणबुडीविरोधी युद्ध क्षेपणास्त्रांनी सुसज्ज आहे.**

---

# राजू बाविस्कर यांना पुरस्कार प्रदान

## देशातील २४ भाषांमधील साहित्यिकांचा 'साहित्य अकादमी'ने गौरव

**◆ नवी दिल्ली, ३१ मार्च**

साहित्य अकादमीतर्फे २०२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या साहित्य पुरस्कारांचे वितरण मंगळवारी राजधानी दिल्ली येथील कमानी सभागृहामध्ये करण्यात आले. जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार व लेखक राजू बाविस्कर यांना मराठी भाषेसाठी साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. बाविस्कर यांच्यासह देशातील २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींचा गौरव यावेळी करण्यात आला.

बाविस्कर यांना 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथेसाठी सन्मानित करण्यात आले. विशेष समारंभात साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते बाविस्कर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि साहित्य अकादमीचे माजी अध्यक्ष विश्वनाथप्रसाद तिवारी, अकादमीच्या उपाध्यक्ष कुमुद शर्मा, संस्कृती मंत्रालयाचे संचालक अनीश राजन, अकादमीच्या सचिव होळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्कार सोहळ्याला संबोधित करताना तिवारी म्हणाले, समाजातील सृजनशील सकारात्मकतेचा गौरव होणे गरजेचे आहे, अन्यथा समाज मूल्यहीन होऊन नष्ट होईल. सृजनाचा गौरव करणे ही अमूर्त स्वरूपातील समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या साहित्य अकादमीसारख्या संस्थांची जबाबदारी आहे.



**पुरस्कारात विविध साहित्य प्रकारांचा समावेश**

यंदाच्या पुरस्कारांमध्ये काव्यसंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, निबंध, समीक्षा, आत्मकथा अशा विविध साहित्य प्रकारांतील विविध पुस्तकांची निवड करण्यात आली आहे.

**इतर भाषेतील पुरस्कार विजेते**

आसामी : देवब्रत दास, बांगला : प्रसून बंद्योपाध्याय, बोडो : सहायसुली ब्रह्म, डोगरी : खजूर सिंह ठाकूर, इंग्रजी : नवतेज सरना, गुजराती : योगेश वैद्य, हिंदी : ममता कालिया, कन्नड : अमरेश नुगडोगी कश्मीरी : अली शैदा, कोकणी : एच एम. पेरनाळ, मैथिली : महेंद्र झा, मल्याळम् : एन. प्रभाकरन, मणिपुरी : हाउबम नलिनी देवी, ओडिया : गिरिजाकुमार बलियारसिंह, पंजाबी : हरजिंदर पाल जिंदर, राजस्थानी : जितेंद्र कुमार सोनी, संस्कृत : महामहोपाध्याय भद्रेशदास, संताली : सुमित्रा सोरेन (मरणोत्तर) आदींना पुरस्काराने गौरवण्यात आले *(तभा वृत्तसेवा)*

---

# बस्तरमध्ये ३३ नक्षलवाद्यांना अटक

## सात किलो सोने, तीन कोटींची रोकड, शस्त्रास्त्रे जप्त

**◆ जगदलपूर, ३१ मार्च**

सुरक्षा दलांनी मंगळवारी छत्तीसगडच्या बस्तर परिक्षेत्रातील चार जिल्ह्यांमध्ये मोठी मोहीम राबवून ३३ नक्षलवाद्यांना अटक केली तसेच मोठ्या प्रमाणात शस्त्रे, रोकड आणि सोने जप्त केले.

बिजापूर जिल्ह्यात २५ नक्षलसमर्थकांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चार एके-४७ आणि नऊ एसएलआर रायफल्ससह एकूण ९३ शस्त्रे जप्त करण्यात आली. विजापूरमध्ये एकूण १४.०६ कोटी रुपयांचा लुटलेला मालही जप्त करण्यात आला. यामध्ये २.९० कोटी रुपये रोकड आणि ७.२ किलो सोन्याचा समावेश होता. जप्त केलेल्या सोन्याचे मूल्य अंदाजे ११.१६ कोटी रुपये आहे.

**दंतेवाडा, सुकमा, नारायणपूरमध्ये शस्त्रसाठा जप्त**

या मोहिमेंतर्गत दंतेवाडा जिल्ह्यातून पाच नक्षलसमर्थक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून आठ एसएलआर आणि इतर अनेक शस्त्रे जप्त करण्यात आली. तर सुकमा जिल्ह्यातून दोन नक्षलसमर्थक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून एक एलएमजी, दोन एके-४७ रायफल्स आणि १० लाख रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. नारायणपूर जिल्ह्यातून माओवाद्याला अटक करीत एलएमजी जप्त करण्यात आली.

**इतर जिल्ह्यांमध्येही सुरक्षा दलांची कारवाई**

दंतेवाडा जिल्ह्यातून पाच कार्यकर्ते आणि आठ एसएलआर शस्त्रे जप्त करण्यात आली. सुकमा येथे दोन कार्यकर्त्यांसह एक एलएमजी आणि दोन एके-४७ रायफली जप्त करण्यात आल्या. सुकमा येथे १० लाख रुपये रोकडही जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सुरक्षादलाची मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. *(वृत्तसंस्था)*

### बिजापूरमध्ये १४ कोटींची मालमत्ता जप्त

**सुरक्षा दलांना बिजापूर जिल्ह्यात मोठे यश मिळाले आहे. या कारवाईत १४.०६ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. यात २.९० कोटी रुपये रोख आणि ७.२ किलो सोन्याचा समावेश आहे. जप्त केलेल्या सोन्याचे मूल्य ११.१६ कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. ही एक मोठी कामगिरी आहे.**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### सोनिया गांधींना मिळाली रुग्णालयातून सुटी



**नवी दिल्ली :** प्रकृतीत सुधारणा झाल्यामुळे काँग्रेस सांसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांना मंगळवारी सर गंगाराम रुग्णालयातून सुटी देण्यात आली. श्वास घेण्यास त्रास होत असल्यामुळे सोनिया गांधी यांना २४ मार्चला रात्री गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉ. डी. एस. राणा, डॉ. एस. नंदी आणि डॉ. अरुप बसू या विशेषज्ञ डॉक्टरांच्या पथकाने त्यांच्यावर उपचार केल्याचे रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. अजय स्वरूप यांनी सांगितले. डॉक्टरांनी त्यांना काही दिवस पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे. याआधी डिसेंबर महिन्यातही सोनिया गांधी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सोनिया गांधींना रुग्णालयात दाखल केल्यामुळे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केरळचा दौरा रद्द केला होता.

### युद्ध थांबवा, शांततेने तोडगा काढा : दलाई लामा

**नवी दिल्ली :** ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम, हिंदू, ज्यू धर्म किंवा जगातील कोणताही पंथ प्रेम, करुणा, सहनशीलता आणि स्वयं शिस्त हाच संदेश देतो. सर्वच धर्मांचा आशय शांतता आणि प्रेम हाच आहे. युद्धातून विनाशाशिवाय काहीही निष्पन्न होत नाही. जागतिक नेत्यांना युद्ध थांबवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन तिबेटचे सर्वोच्च धर्मगुरू दलाई लामा यांनी केले. संघर्षातून कायमचा मार्ग काढण्यासाठी संवाद, समजूतदारपणा, एकमेकांचा सन्मान ठेवला गेला पाहिजे, असे सांगत त्यांनी हे युद्ध लवकर थांबवण्याचे आवाहन केले आहे. इतिहासाने आपल्याला वारंवार दाखवून दिले की हिंसाचारातून नेहमीच अधिक हिंसाचारच जन्माला येतो. हिंसाचार कधीही चिरस्थायी शांततेचा पाया असू शकत नाही. दलाई लामा यांनी निवेदनातून पश्चिम आशियामध्ये आणि रशिया व युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या संघर्षांवर तीव्र चिंता व्यक्त केली.

### मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा

**मुंबई :** मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक भागांमध्ये पुढील काही दिवस वादळी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. भारतीय हवामान विभागाच्या पाच दिवसीय अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# होर्मुझमधून स्वतःच न्या तेल

## अमेरिका कोणत्याही देशाला मदत करणार नाही : ट्रम्प



◆ **वॉशिंग्टन, ३१ मार्च**

अमेरिका यापुढे कोणत्याही देशाला मदत करणार नाही. प्रत्येक राष्ट्राला स्वतःची सुरक्षा करावी लागेल. तेल संकट टाळण्याचे दोनच मार्ग आहे, एकतर अमेरिकेकडून तेल खरेदी करा अन्यथा, होर्मुझ सामुद्रधुनीतून तेल स्वतःलाच न्यावे लागेल. होर्मुझच्या मार्गाचा वापर करणाऱ्या देशांनाच सुरक्षेची जबाबदारी घ्यावी लागेल. अमेरिका मदत करणार नाही, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

हॉर्मुझमधील विस्कळीत झालेल्या जलवाहतुकीने निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या मुद्यावरून युरोपियन देशांवर संताप व्यक्त करताना ट्रम्प म्हणाले, ज्या देशांनी इराणविरुद्धच्या मोहिमेत अमेरिकेला साथ दिली नाही, त्यांना आता स्वतःचे रक्षण स्वतःच करावे लागेल. संकटाच्या काळात अमेरिकेने युरोपियन देशांना नेहमीच मदत केली, त्यांच्या सुरक्षेसाठी अब्जावधी डॉलर्सचा खर्च केला. होर्मुझ जलमार्गाच्या सुरक्षेसाठी लष्करी मदतीचे अनेकदा आवाहन करूनही त्यांनी पाठ दाखवली. यापुढे त्यांनी अमेरिकेकडून मदतीची अपेक्षा करू नये. त्यांनी अमेरिकेकडून तेल खरेदी करावे अन्यथा धोका पत्करत होर्मुझ जलमार्गाचा वापर करावा. आम्हाला गरज असताना साथ दिली नव्हती, त्यामुळे आता तुम्हाला स्वतःसाठी लढायला शिकावे लागेल. (वृत्तसंस्था)

### इराणविरुद्धचा लढा अंतिम टप्प्यात : हेगसेथ

इराणच्या नवीन सत्ताधाऱ्यांनी शहाणपण दाखवून अमेरिकेशी करार करावा अन्यथा विध्वंसासाठी तयार राहावे. इराणविरुद्ध सुरू असलेले युद्ध अंतिम टप्प्यात असल्याचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ पत्रपरिषदेत म्हणाले, राष्ट्राध्यक्ष संघर्षविरामासाठी तयार आहेत आणि इराणला त्यांच्या अटी आधीच माहीत आहेत. तथापि, इराणने अटी मान्य केल्या नाही, तर अमेरिकन सैन्य अधिक शक्तीनिशी हल्ले करेल.



शक्ती आणि युक्तीची देवता हनुमंताचा जन्मोत्सव सोमवारी असून, या उत्सवाच्या पृष्ठभूमीवर हनुमानाच्या मूर्तीवरून शेवटचा हात फिरवताना मुंबईच्या काळाचौकी कार्यशाळेतील कलावंत

### पाकिस्तानमार्फत मध्यस्थी मान्य नाही

◆ **तेल अवीव, ३१ मार्च**

पाकिस्तानी काय करत आहेत हे मला माहीत नाही. मला वाटते की ते स्वतःला महत्त्वाचे सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहेत. जिहादी दहशतवादाच्या जगात ते स्वतःच एक मोठी समस्या आहेत. युद्धविरामासाठी पाकिस्तानमार्फत होणाऱ्या वाटाघाटी आम्हाला मान्य नाही असे इस्रायलचे इस्रायलच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते फ्लोर हसन नाहूम यांनी म्हटले आहे. दुसरीकडे इराणने देखील पाकिस्तानच्या मध्यस्थीने होणारी चर्चा मान्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

युद्धविरामासाठी सौदी अरब, इजिप्त आणि तुर्कीच्या परराष्ट्र मंत्र्यांनी इस्लामाबाद येथे बैठक घेतली. (वृत्तसंस्था)

# रोहित पवारांच्या लुडबुडीवर सूरज चव्हाण कडाडले

## अजित पवार, शरद पवार गटातील कलह उफाळला

◆ **मुंबई, ३१ मार्च**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार आणि शरद पवार गटातील कलह तसेच आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण आता टोकाला पोहोचले आहे. आमदार रोहित पवार यांनी पक्षातील काही नेत्यांवर केलेल्या आरोपांनंतर, पक्षाचे प्रवक्त सूरज चव्हाण यांनी त्यांना खणखणीत प्रत्युत्तर दिले आहे. आमच्या पक्षात विनाकारण लुडबूड करू नका, अन्यथा जशास तसे उत्तर दिले जाईल, असा गंभीर इशारा चव्हाण यांनी रोहित पवारांना दिला आहे.

सूरज चव्हाण यांनी रोहित पवारांवर अत्यंत खळबळजनक आरोप केला आहे. आमच्या पक्षातील नेत्यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी आणि पक्षात फूट पाडण्यासाठी रोहित पवार यांनी एका खासगी एजन्सीला चक्क पाच कोटी रुपयांचे पॅकेज दिल्याचा दावा चव्हाण यांनी केला. यासाठी सोशल मीडियावर जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**स्वतःच्या आमदारांकडे लक्ष द्या**

रोहित पवारांच्या कार्यपद्धतीवर टीका करताना चव्हाण म्हणाले की, जेवढा वेळ तुम्ही आमच्या पक्षातील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी घालवता, त्यापेक्षा जास्त वेळ आपल्या स्वतःच्या आमदार आणि खासदारांच्या कामासाठी द्या. मोहोळचे आमदार कोणत्या बॅनरखाली कार्यक्रम घेतात, याचे आत्मपरीक्षण करा.

तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसला शिस्त लावण्यासाठी सुनेत्रा पवार पूर्णपणे सक्षम आहेत, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

**संविधानाबाबतच्या अफवांचे खंडन**

पक्षाच्या संविधानातून सेवा दल आणि ओबीसी सेल वगळल्याच्या वावड्या रोहित पवार यांच्या टीमकडून उठवल्या जात असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला. हे सेल कधीही फ्रन्टल संघटनांचा भाग नव्हते, ते सुरुवातीपासून सेल म्हणूनच कार्यरत आहेत. अर्धवट माहितीच्या आधारे संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न थांबवावेत, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. (तभा वृत्तसेवा)



# आपण कितीही मोठे झालो तरी माणुसकी जपली पाहिजे

- पद्मश्री ॲड.उज्ज्वल निकम यांचे प्रतिपादन
- राष्ट्रीय गणितरत्न पुरस्कार वितरण समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

आपण ज्ञानी असून उपयोग नाही तर माणूसही असायला हवे. आपण कितीही मोठे झालो तरी माणुसकी जपली पाहिजे, असे प्रतिपादन पद्मश्री तथा राज्यसभेचे खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांनी केले.

मंगळवारी, प्रा. ठाकरे गौरव संस्था, संगमेश्वर महाविद्यालय आणि लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यावतीने आयोजित संगमेश्वर महाविद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या कर्मयोगी अप्पासाहेब काडादी सभागृहाचे उद्घाटन आणि 'राष्ट्रीय गणितरत्न पुरस्कार' वितरण सोहळ्यात पद्मश्री ॲड. निकम बोलत होते. विज्ञान संस्था बंगळुरू येथील प्रा. वामसी प्रीतम पिंगाली यांना गणितरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मी हायड्रोलिक्सचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे होते. याप्रसंगी विचारपीठावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, संस्थेचे अध्यक्ष ॲड. धनंजय माने, संस्थेच्या सचिव ज्योती काडादी, माजी कुलगुरू तथा प्रा. ठाकरे गौरव संस्थेचे अध्यक्ष डॉ. एन. के. ठाकरे, प्राचार्य प्रा. ऋतुराज बुवा उपस्थित होते. संस्थेच्या कामात काही असंतुष्ट मंडळींकडून जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याची खंत धर्मराज काडादी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली होती.

तोच धागा पकडून पद्मश्री ॲड. निकम म्हणाले, आपण पुढे जात असताना अनेक शत्रू तयार होत असतात. अनेक निंदक तयार होत असतात. आपल्या प्रगतीबद्दल असूया असलेली माणसे त्रास देण्याचा प्रयत्न करतात. मात्र, त्यांच्याकडे लक्ष न देता आपण काम करायला हवे, असा सल्लाही ॲड. निकम यांनी पुढे बोलताना दिला. तुमच्या वाटचालीत काही अडचणी आल्यास मी आपल्या पाठीशी भक्कमपणे उभा राहीन, अशी ग्वाही ॲड. निकम यांनी देताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य प्रा. ऋतुराज बुवा यांनी केले. लक्ष्मी हायड्रॉलिक्सच्या संचालिका सुप्रिया ठाकरे यांनी सत्कारमूर्ती प्रा. वामसी यांच्या सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. बाळासाहेब वाफरे यांनी प्रा. ठाकरे गौरव संस्थेचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी धुमाळ यांनी केले. मधुकर पवार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुष्पराज काडादी, शरणराज काडादी आणि काडादी परिवार, लक्ष्मी हायड्रॉलिक्सचे संचालक आदित्य ठाकरे आणि ठाकरे परिवार, श्री सिध्देशर देवस्थानचे विश्वस्त, सिध्देश्वर साखर कारखान्याचे संचालक यांच्यासह श्री सिध्देश्वर शिक्षण संकुलातील सदस्य उपस्थित होते.

**उदात्त परंपरेचा गौरव : काडादी**

राष्ट्रनिष्ठ व देशभक्तीने प्रेरित होऊन आपले संपूर्ण आयुष्य जनसेवेसाठी अर्पण केलेल्या कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांचे नाव सभागृहाला दिले जाणार असल्याने त्यांच्यासारखेच समर्पित भावाने देशसेवा केलेल्या व्यक्तीच्या हस्ते हा सोहळा व्हावा ही आमची इच्छा होती. भारतीय न्यायव्यवस्थेतील धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांच्यारूपाने ती इच्छा पूर्ण झाल्याचे संगमेश्वर शिक्षण संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी सांगितले. हा सोहळा केवळ एका सभागृहाच्या उद्घाटनापुरता मर्यादित नसून एका उदात्त परंपरेचा गौरव आहे. एका कर्मयोगीच्या चिरंतन कार्याला अर्पिलेली ही आदरांजली असल्याचेही काडादी यांनी सांगितले.

**आगामी काळ गणिताचा सुवर्णकाळ : प्रा. पिंगाली**

गणिताबद्दल खूप गैरसमज आहेत. इतर विषयांच्या तुलनेत गणित दुर्लक्षित आहे. मात्र, प्रा. ठाकरे गौरव संस्थेने गणिताला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे सत्कारमूर्ती प्रा. वामसी पिंगाली यांनी सांगितले. एआय तंत्रज्ञानाने कवेत घेतलेला हा काळ गणितासाठी सुवर्णकाळ असल्याचा विश्वासही प्रा. पिंगाली यांनी व्यक्त केला.

**गणितासह नवरत्न पुरस्कार देणार : ठाकरे**

प्रा. ठाकरे गौरव संस्थेच्यावतीने गेल्या पाच वर्षांपासून राष्ट्रीय पातळीवर गणितरत्न पुरस्कार दिला जातो. आता पुढील वर्षापासून वैद्यकीय , कृषी आणि इतर विज्ञान शाखांतील उल्लेखनीय योगदानासाठी नवरत्न पुरस्कार देणार असल्याची घोषणा शरद ठाकरे यांनी केली. या पुरस्कारांसाठी निवड प्रक्रिया नोबेलच्या धर्तीवर पारदर्शकपणे होईल. सोलापुरातच या पुरस्कारांचे वितरण होईल, असेही ठाकरे यांनी सांगितले.

# महिलांच्या नेतृत्वाला चालना; राज्य प्रशासनात नवे पर्व

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कार्यकाळात अनेक 'पहिल्या' महिला अधिकाऱ्यांची नोंद

◆ **मुंबई, ३१ मार्च**

राज्याच्या प्रशासकीय आणि राजकीय व्यवस्थेत महिलांचे नेतृत्व ठळकपणे पुढे येत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाच्या पदांवर प्रथमच महिलांची नियुक्ती झाल्याने नवा इतिहास घडत आहे.

राज्य प्रशासनात महिलांच्या सहभागाला आणि नेतृत्वाला बळ देण्याच्या दृष्टीने अलिकडील काळात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विविध उच्च



पदांवर महिलांची नियुक्ती होत असून, यामुळे प्रशासनात सकारात्मक बदल घडताना दिसत आहे. राज्याला पहिल्यांदाच महिला मुख्य सचिव म्हणून सुजाता सौनिक यांची नियुक्ती झाली. त्याचबरोबर स्वाती साठे यांनी राज्याच्या कारागृह विभागाच्या पोलिस महानिरीक्षकपदाची धुरा सांभाळत इतिहास रचला. मुख्यमंत्री कार्यालयातही पहिल्या महिला प्रधान सचिव म्हणून अश्विनी भिडे यांची नियुक्ती झाली.

कायदा आणि सुव्यवस्था क्षेत्रातही महिलांचे नेतृत्व बळकट झाले असून, रश्मी शुक्ला या राज्याच्या पहिल्या महिला पोलिस महासंचालक ठरल्या आहेत. तसेच राजकीय पातळीवरही महिलांना संधी देत सुनेत्रा पवार या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या आहेत.

वन विभागातही महिलांची छाप उमटली असून, मुख्य वनसंरक्षक पदावर शोमिता विश्वास यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, मुंबई महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला आयुक्त म्हणून अश्विनी भिडे यांची नियुक्ती झाल्याने प्रशासनातील महिलांचे वर्चस्व अधिक ठळक झाले आहे. या सर्व नियुक्त्यांमुळे राज्यात महिलांच्या नेतृत्वाला नवी दिशा मिळत असून, प्रशासन अधिक समावेशक आणि सक्षम बनण्यास मदत होत आहे. (तभा वृत्तसेवा)

**राज्यातील 'पहिल्या' महिला**

| | |
|---|---|
| मुख्य सचिव : | सुजाता सौनिक |
| पोलिस महानिरीक्षक (कारागृह) : | स्वाती साठे |
| मुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सचिव : | अश्विनी भिडे |
| पोलिस महासंचालक : | रश्मी शुक्ला |
| उपमुख्यमंत्री : | सुनेत्रा पवार |
| मुख्य वनसंरक्षक : | शोमिता विश्वास |
| मुंबई महापालिका आयुक्त : | अश्विनी भिडे |

### आसाममध्ये भाजपाचे संकल्पपत्र जाहीर

**दिसपूर :** आसाममध्ये निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना भाजपाने संकल्पपत्र जाहीर केले आहे. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन् यांच्या हस्ते या संकल्पपत्राचे अनावरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, सर्बानंद सोनोवाल आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप सैकिया उपस्थित होते. या संकल्पपत्रात विकासावर भर देण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय आणि विद्यापीठ उभारण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध योजना राबवण्याचा निर्धार पक्षाने व्यक्त केला आहे. हिमंत बिस्वा सरमा यांनी पुढील पाच वर्षांत मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून सुमारे दोन लाख नोकऱ्या उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. तसेच पूरमुक्त आसाम घडवण्यासाठी मोठ्या निधीची तरतूद करण्याचेही त्यांनी सांगितले. राज्यातील महिलांसाठी चालवण्यात येणाऱ्या योजनांचा विस्तार करण्यावरही भर देण्यात आला आहे. दरम्यान, जाहीरनामा तयार करताना राज्यभरातील नागरिकांकडून सूचना मागवण्यात आल्या होत्या.

# राऊतांची वैचारिक अवस्था 'नेभळट'

## भाजपाचे प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघात

◆ **मुंबई, ३१ मार्च**

सातत्याने अपयशाचा सामना करावा लागत असल्याने संजय राऊत सध्या हताश झाले असून, त्यातूनच ते भारतीयांना कमी लेखण्याचे पाप करत आहेत. अमेरिकन जनतेचे दाखले देऊन १४० कोटी भारतीयांचा अपमान करणाऱ्या राऊतांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कणखर नेतृत्वाखालील भारत कधीच समजला नाही. वस्तुतः राऊत यांची स्वतःची वैचारिक अवस्था आता पूर्णपणे नेभळट झाली आहे, अशा शब्दांत भाजपाचे राज्याचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी त्यांचा समाचार घेतला.

सध्या चर्चेत असलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणावरून महाविकास आघाडीची कोंडी करताना नवनाथ बन यांनी अनेक बोचरे सवाल उपस्थित केले. 'हमाम मे सब नंगे' म्हणणाऱ्या राऊतांनी आधी हे सांगावे की, या भोंदूच्या आश्रमाला शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी कोणाच्या कार्यकाळात मिळाले? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या बाबासाठी पायघड्या कोणी घातल्या होत्या? मिलिंद नार्वेकर आणि या भोंदूच्या भेटीचा संदर्भ देत, उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत म्हणून नार्वेकरांनी तिथे नेमका कोणता नवस बोलला होता, याचे गुपित त्यांनीच उघड करावे, असा खोचक टोलाही बन यांनी लगावला. (तभा वृत्तसेवा)

**मुंगेरीलाल राऊतांचे स्वप्न धुळीस मिळणार!**

देशातील सुरक्षा यंत्रणा आणि लष्कराबाबत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या राऊतांवर टीका करताना बन म्हणाले की, भारतात अराजकता माजल्याचे स्वप्न पाहणे हे केवळ 'मुंगेरीलाल के हसीन सपने' आहेत. पंतप्रधान मोदी आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या भक्कम नेतृत्वात देश आणि महाराष्ट्र पूर्णपणे सुरक्षित आहे. केवळ सत्तेविना होत असलेल्या अस्वस्थतेतूनच विरोधक अशी देशविरोधी विधाने करत आहेत.

# पतंजली योगपीठाचे राष्ट्रनिर्मितीत योगदान

## बाबा रामदेव यांचे प्रतिपादन ● रामनवमीच्या मुहूर्तावर ३२ वा सन्यास दिन उत्साहात

◆ **हरिद्वार, ३१ मार्च,**

रामनवमी, नवरात्रीची समाप्ती आणि पतंजलींचा गौरवशाली संन्यास दिन असे तीन सण एकाच मुहूर्तावर साजरा करण्याची संधी आपल्याला मिळाली. गेल्या ३२ वर्षांत पतंजली योगपीठाने शिक्षण, वैद्यकशास्त्र, संशोधन, कृषी, उद्योग, रोजगार, निसर्ग, पर्यावरण, चारित्र्यनिर्मिती, राष्ट्र निर्माण, युगनिर्माण, वेदांची सेवा, राष्ट्रवाद आणि सनातन धर्मात ऐतिहासिक योगदान दिले असे बाबा रामदेव म्हणाले.



रामनवमीला पतंजली योगपीठाचे अध्यक्ष स्वामी रामदेव महाराज यांचा ३२ वा सन्यास दिन पतंजली योगपीठ-२ येथील पतंजली वेलनेस येथील योग भवनच्या सभागृहात साजरा झाला. यावेळी पतंजली योगपीठाचे महासचिव, आचार्य बाळकृष्ण, भारतीय शिक्षण मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष एन. पी. सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी स्वामी रामदेव बाबा म्हणाले, ज्याच्याकडे दैवी संपत्तीचा अभाव आहे, तो हिंदू नाही, सनातनी नाही, राम आणि कृष्णाचा वंशज नाही. आज शेकडो ट्रस्ट आणि विविध संस्थांच्या माध्यमातून, पतंजलीद्वारे देशभरातील ६०० पेक्षा जास्त जिल्ह्यांमधील पाच हजारांपेक्षा जास्त तालुक्यांमध्ये आणि जगभरातील जवळपास २०० देशांमध्ये योग, आयुर्वेद, स्वदेशी आणि सनातन धर्माच्या प्रसाराचे कार्य केले जात आहे.

३२ वर्षांच्या प्रवासात पतंजलीने शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक योगदान दिले. औपचारिक शिक्षण मुलांना चांगले भविष्य देऊ शकत नाही. पतंजलीमध्ये आम्ही संस्कार, सनातन संस्कृतीचे मूलभूत नियम, मानवी मूल्ये, जीवनमूल्ये, लोकशाही आणि घटनात्मक मूल्यांवर आधारित शिक्षण प्रणाली विकसित करत आहेत. जे संपूर्ण जगाला नवीन नेतृत्व देऊ शकतील.

**प्रभू श्रीरामाचे चरित्र जीवनासाठी दिशादर्शक**

आचार्य बाळकृष्ण म्हणाले, आज जगाच्या चेतनेमध्ये प्रभू रामाचे उदात्तत्व, प्रतिष्ठा, सर्वव्यापकता आणि स्वीकृतीची गरज आहे. आपण त्यांच्या चारित्र्याच्या आणि जीवनाच्या प्रत्येक पैलूतून बरेच काही समजू आणि शिकू शकतो. बाबा रामदेव सध्याच्या युगात त्याच परंपरेचे वाहक आहेत. आपण सर्व भाग्यवान आहोत की देवाने आपल्याला पूजनीय स्वामीजींसोबत भागीदार म्हणून काम करण्याचे साधन बनवले आहे. यावेळी एन. पी. सिंग म्हणाले, श्रीराम केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी प्रेरणा आणि मार्गदर्शक आहे.

### भाजपाची १३ उमेदवारांची यादी जाहीर

**कोलकाता :** पश्चिम बंगाल आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन भाजपाने उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली. या यादीत एकूण १३ जणांना उमेदवारी देण्यात आली. मैनागुरी मतदारसंघातील आधी घोषित केलेला उमेदवार बदलून आता त्या ठिकाणाहून दलीम रॉय यांना संधी देण्यात आली आहे. या नव्या यादीनुसार विविध मतदारसंघांत पक्षाने नवीन चेहरे पुढे केले आहेत. सीताई, नटबारी, बागडा, मगराहत पूर्व, फाल्टा, सोनारपूर उत्तर, हावडा दक्षिण, पांचला, चांदीपूर, गरबेटा, मेमारी आणि बाराबनी या मतदारसंघांसाठी उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये बागडा मतदारसंघातून केंद्रीय राज्यमंत्री शांतनु ठाकूर यांच्या पत्नी सोमा ठाकूर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच, नुकतेच पक्षांतर करून भाजपामध्ये दाखल झालेले संतोष पाठक यांनाही कोलकात्यातील चौरंगी मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे.

# भंडाऱ्यातील इटगाव देशातील पहिली बालस्नेही ग्राम पंचायत

### एक कोटी रुपयांचा पुरस्कार

◆ **भंडारा, ३१ मार्च**

भंडारा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या इटगाव पुनर्वसनला ग्राम पंचायतीला २०२५ चा राष्ट्रीय 'बालस्नेही पंचायत'चा प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला. केंद्रीय पंचायत राज मंत्रालयाने ही घोषणा केली असून, पुरस्काराची रक्कम एक कोटी रुपये आहे.

हा पुरस्कार वेगवेगळ्या नऊ विषयांच्या आधारे दिला जातो. यातील 'बालस्नेही पंचायत' या प्रकारात इटगाव पुनर्वसन या ग्राम पंचायतची प्रथम पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. इटगावची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ६६० असून, १६७ कुटुंब आहेत. महिलांची संख्या ३१५ आहे. हा उपक्रम राबविताना आरोग्य, शिक्षण, लसीकरण, पोषण आहार, सुरक्षा आणि पायाभूत सुविधा या विषयांवर विशेष काम करण्यात आले. गावात २०२३-२०२४ मध्ये एकही बालमृत्यू नाही. गावातील कुणावरही वर्षभरात कोणताही गुन्हा दाखल नाही. शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या शून्य आहे. अशा विविध विषयांत चांगली कामगिरी करणारे गाव बालस्नेही पुरस्कारासाठी पात्र ठरले आहे. (तभा वृत्तसेवा)





**गावाप्रतीच्या आस्थेचे फळ : चौधरी**

गावाप्रती प्रत्येक गावकऱ्यांच्या मनात असलेली आपुलकी आणि आस्था यातूनच हे शक्य झाले. सर्वांचे प्रयत्न आज राष्ट्रीय स्तरावर यशस्वी ठरले, अशी प्रतिक्रिया गावच्या सरपंच कविता चौधरी यांनी दिली.

**सांघिक प्रयत्नांमुळे यश**

सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून इटगावने मिळविलेले यश आणि गावात आलेले परिवर्तन हे सांघिक प्रयत्नांचे फळ आहे. ग्राम पंचायतीचे पदाधिकारी, सचिव, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून हे यश साकारता आले, अशी प्रतिक्रिया खंड विकास अधिकारी प्रमोद हुमणे यांनी दिली.



लोकशाहीत विरोधी पक्ष मजबूत नसेल तर, सत्ताधारी पक्ष अंकुश नसल्यासारखा वागू शकतो. यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी विरोधक मजबूत होण्यासाठी गावोगाव फिरावे.
- **चंद्रकांत पाटील**, उच्च व शिक्षण मंत्री


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा




या मंत्री महोदयांना स्वतःची जबाबदारी काय आहे, हेच समजत नसेल, तर यांनी राजीनामे देऊन घरी बसावे. आणि आपल्या वैयक्तिक आयुष्यात वेळ घालवावा. उगाच मंत्रिपदाची खुर्ची उबवू नये.
- **हर्षवर्धन सपकाळ**, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष



# इराणच्या अणुकेंद्रावर बंकर बस्टरचा मारा

## अमेरिकेचा इस्फाहानवर भीषण हल्ला

◆ **तेहरान/वॉशिंग्टन, ३१ मार्च**

अमेरिकेने इराणचा शस्त्रसाठा आणि अणुकेंद्राला लक्ष्य करीत मंगळवारी पहाटे दोन हजार पाऊंड वजनाच्या पेनिट्रेटर अर्थात् बंकर-बस्टर बॉम्बचा मारा केला. हल्ल्यात इराणचे इस्फाहान शहरालगत असलेले अणुकेंद्र आणि युरेनियमचा साठा पूर्णपणे नष्ट झाल्याचा दावा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.

इराणची लष्करी क्षमता नेस्तनाबूत करण्यासाठी इस्फाहान येथील अणुकेंद्र आणि शस्त्रसाठ्यांच्या तळांना लक्ष्य करीत अमेरिकन वायुदलाने २००० पाऊंड वजनाच्या बंकर-बस्टर बॉम्बने हल्ला केला. यात संपूर्ण परिसर नष्ट झाल्याची माहिती ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिली. त्यांनी हल्ल्याची चित्रफीत प्रसिद्ध केली. भूमिगत डेपोमध्ये ठेवलेल्या शस्त्रास्त्रांची आणि युरेनियम साठ्यांची राख झाली. आता इराणला शरणागती पत्करल्याशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी म्हटले. इस्फाहान हे इराणचे महत्त्वाचे संरक्षण केंद्र असून, तिथे बद्र वायुतळ आहे. इराणच्या इस्लामिक रिव्हाल्युशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीने इस्फाहान येथे हल्ला झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. अणुकेंद्रावरील हल्ल्याने आमच्या महत्त्वाकांक्षा कमी होणार नाहीत. आमच्याकडे अनेक शस्त्रास्त्रांचे अनेक भूमिगत साठे आहे आणि शत्रूवर ताकदीने प्रहार केला जाईल, असे त्यांनी म्हटले आहे.

इराणमधील अराक, अर्दाकान, इस्फहान, नतान्झ आणि बुशेहर यासारख्या प्रमुख अणुसुविधांना आणि क्षेपणास्त्र साठवणूक स्थळांना लक्ष्य करण्यात आले. इस्फाहान येथे युरेनियम साठवलेले असल्याने येथील हल्ला आमच्यासाठी महत्त्वाचा असल्याचे इस्रायलच्या संरक्षण विभागाने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# नालंदात चेंगराचेंगरी; नऊ भाविकांचा मृत्यू

**महिला व मुलांसह १४ जखमी**





◆ **नालंदा, ३१ मार्च**

बिहारमधील नालंदा जिल्ह्यात मंगळवारी सकाळी शीतला माता मंदिरात चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत नऊ लोकांचा मृत्यू झाला. चेंगराचेंगरीत आठ महिलांचा जागीच मृत्यू झाला तर, एका पुरुषाने रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. रीता देवी, कांती देवी, आशा देवी, देवंती देवी, अनुष्का देवी व रेखा देवी, अशी मृतकांची नावे आहे. इतर तीन मृतकांची ओळख पटलेली नाही.

शीतला माता अष्टमीच्या निमित्ताने मंगळवारी मोठ्या संख्येने भाविक या मंदिरात पोहोचले होते. तिथे जत्राही भरली होती. घटनास्थळी उपस्थित लोकांनी सांगितले की, गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी पुरेसे बंदोबस्त नव्हते. दर्शनाच्या रांगेत धक्काबुक्की झाली. गोंधळात अनेक लोक गर्दीत एकमेकांवर पडले आणि दबले. त्यामुळे अनेक भाविक जखमी झाले. या घटनेनंतर मंदिर आणि जत्रा तत्काळ बंद करण्यात आली.

**दर्शनाची घाई, पुढे जाण्याचा प्रयत्न**

चैत्र महिन्याच्या शेवटच्या मंगळवारमुळे पाटणा आणि आसपासच्या भागातूनही दर्शनासाठी आले होते. यामुळे गर्दी खूप वाढली. मंदिर परिसर लहान होता. गर्दी नियंत्रित करण्याची व्यवस्था नव्हती. लोकांमध्ये आधी दर्शन घेण्याची चढाओढ लागली. लोक रांगेत उभे राहण्याऐवजी पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागले. यामुळे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. अनेक लोक गर्दीखाली दबले.

**सुरक्षेची कोणतीही व्यवस्था नव्हती**

एका भाविकाने सांगितले, येथे सुरक्षेची कोणतीही व्यवस्था नव्हती. मंदिराच्या आत प्रचंड गर्दी होती. पोलिसांचा जवान आत तैनात नव्हता. गर्दीला वळवण्यासाठी किंवा दोन रांगांमध्ये विभागण्यासाठी कोणतीही व्यवस्था नव्हती. मंदिराचे पुजारीच लवकर-लवकर दर्शन घेऊन बाहेर पडायला सांगत होते. याच दरम्यान एका महिलेला चक्कर आली आणि ती तिथेच पडली. काही लोक तिला सावरू लागले आणि गर्दीला मागे हटवण्याचा प्रयत्न केला. याच वेळी चेंगराचेंगरी झाली.

**४० मिनिटांनी रुग्णवाहिका पोहोचली**

मंदिरात उपस्थित असलेल्या भाविकांनी सांगितले की, धक्काबुक्कीनंतर अनेक महिला गर्दीतच बेशुद्ध पडल्या होत्या. काही वेदनेने ओरडत होत्या. लोकांनी पोलिसांना माहिती दिली. सुरुवातीला २-३ पोलिस कर्मचारी पोहोचले. तातडीने जखमी महिलांना बाजूला काढून झोपवले. रुग्णवाहिकेसाठी अनेकदा फोन करण्यात आला. घटनेच्या सुमारे ४० मिनिटांनंतर पहिली रुग्णवाहिका पोहोचली. त्यानंतर जखमींना रुग्णालयात पाठवण्यात आले. काही महिलांचा घटनास्थळीच जीव गेला होता, असेही त्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### मृतांच्या वारसांना सहा लाखांची भरपाई

**या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री नितीश कुमार, भाजपाध्यक्ष नितीन नवीन, देन्ही उपमुख्यमंत्री आणि सर्व नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबीयांना सहा लाख रुपये तर, केंद्र सरकारने दोन लाख रुपयांची नुकसानभरपाई जाहीर केली आहे.**

## आई, मुलासह अपघातात तिघांचा मृत्यू

◆ **मिर्झापूर, ३१ मार्च**

मिर्झापूर जिल्ह्यातील अहरौरा-जमुई रस्त्यावर रोशनहारजवळ मंगळवारी सकाळी मोटारसायकलला भरधाव ट्रेलरने जबर धडक दिली. यात औषध आणण्यासाठी दुचाकीवरून जाणाऱ्या आई, मुलगा आणि भाच्याचा जागीच मृत्यू झाला. दुचाकी ट्रेलरमध्ये अडकून सुमारे १०० मीटरपर्यंत फरफटत गेली. त्यामुळे रस्ता रक्ताने माखला होता. वेदवती अशोक बिंद, अनमोल आणि अनुराग, अशी मृतकांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अहिरपूर सोनपूर निवासी वेदवती त्यांचा पाच वर्षांचा मुलगा अनमोल बिंद आणि भाचा अनुराग हे घाटमपूर गावाजवळून औषध आणायला जात होते. ते रोशनहारजवळ पोहोचताच भरधाव ट्रेलरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघातानंतर सुमारे १०० मीटर त्यांना फरफटत नेले. त्यामुळे तिघांचाही जागीच मृत्यू झाला. ◂(वृत्तसंस्था)



गुजरातच्या गांधीनगर येथे मंगळवारी सम्राट संप्रती संग्रहालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्राचीन हस्तलिखितांचे अवलोकन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

# अमेरिकेची धमकी झुगारून रशियाची क्युबाला मदत

### कच्च्या तेलाचे तीन टँकर पाठवले

◆ **मॉस्को, ३१ मार्च**

जगातील कुठल्याही देशाने क्युबाला कच्चे तेल देऊ नये, असा इशारा दिला. अमेरिकचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यांच्या आदेशाने अमेरिकेने कॅरिबियन बेटावरील ऊर्जा नाकेबंदी सुरू केली होती. अशातच अमेरिकेच्या धमकीला झुगारात रशियाने क्युबाला तीन कच्च्या तेलाचे टँकर पाठवले आहे.

अमेरिकेकडून क्युबा देशाची ऊर्जा कोंडी करण्यात येत होती. क्युबाला कुणीही तेल पाठवू नये असे अमेरिकेने बजावले होते. मात्र, व्हेनेझुएलाकडून क्युबाला तेल पुरवठा सुरू होता. परंतु, तिथेही ट्रम्प यांनी सैन्य कारवाई करीत मादुरो यांना अटक केली आणि तिथल्या तेलावर नियंत्रण मिळवले. या घटनेमुळे क्युबावरील संकट वाढले. ऊर्जा संकटामुळे देशात विजेचे संकट निर्माण झाले. अनेक अडचणींचा सामना तिथल्या लोकांना करावा लागला. अशा परिस्थितीत रशिया क्युबा देशाच्या मदतीसाठी धावून पुढे आला.

ऊर्जा संकटाचा सामना करणाऱ्या क्युबाला तेल टँकर मिळाल्याचा आम्हाला आनंद अशी माहिती रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने समाज माध्यमावरील पोस्टमधून दिली.

रशियाने या महिन्याच्या सुरुवातीला अनातोली कोलोडकिन नावाचा तेल टँकर क्युबाला पाठवला होता आणि आता तीन टँकर तेथे पोहोचले आहे. रशियाच्या मदतीवर नरमाईची भूमिका घेत ट्रम्प म्हणाले, रशियाने पाठवलेल्या टँकरवर आम्हाला आक्षेप नाही. एक महिन्यासाठी रशियाच्या तेलावरील बंदी उठवल्याने ते निर्यात करू शकतात. ◂(वृत्तसंस्था)

## घराला आग; पाच जणांचा मृत्यू

◆ **सुरत, ३१ मार्च**

येथील लिंबायत भागात एका तीन मजली घराला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील पाच जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये चार महिला आणि लहान मुलाचा समावेश आहे. ही घटना मंगळवारी सकाळी मिठी खाडी परिसरात घडली.

ज्या घरात आग लागली तेथे साडी पॅकिंगचे काम सुरू होते. घटनेच्या वेळी घरातील सदस्य फोम शीट वापरून साड्या पॅक करत होते. घरात मोठ्या प्रमाणात पॅकिंग साहित्य आणि फोम साठवून ठेवला होता. दरम्यान, फोमला अचानक आग लागली. काही वेळातच आग आणि संपूर्ण घरात पसरली. सर्वत्र पसरलेल्या धुरामुळे पाच जणांचा गुदमरून मृत्यू झाला.

उप पोलिस आयुक्त कानन देसाई यांनी सांगितले की, पोलिस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. आत अडकलेल्यांना गुदमरल्यासारखे होऊ लागले. सर्वांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. प्राथमिक तपासात असे समोर आले की, इलेक्ट्रिकल बोर्डवरील ठिणगीमुळे आग लागली असावी. बोर्डजवळ रसायने असलेली फोम शीट ठेवण्यात आली होती. आग लागताच फोममधून विषारी वायू आणि दाट धूर बाहेर पडू लागला. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘डफर’चे टीझर पोस्टर जारी




**मुंबई :** एलिफंटा फिल्म्सने त्यांच्या पहिल्या ‘डफर’ चित्रपटाचे टीझर पोस्टर प्रदर्शित केले आहे. पोस्टरमध्ये मुख्य पात्राचा चेहरा पूर्णपणे लपलेला आहे. सूत्रांनुसार, मुख्य भूमिकेसाठी शाहिद कपूर आणि जॉन अब्राहम यासारख्या नावांची चर्चा आहे, तरीही निर्मात्यांनी अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. चित्रपटाचे दिग्दर्शन पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते नकुल देव करत आहेत, लेखन आणि क्रिएटिव्ह दिग्दर्शन सुमन दिव्या सांभाळत आहेत. ‘डफर’चे पोस्टर जिम कॉर्बेट नॅशनल पार्कमध्ये लॉन्च करण्यात आले. ‘डफर’ला पारंपरिक स्पाय थ्रिलरपेक्षा वेगळा असल्याचे सांगत निर्मात्यांनी याला थरारक आणि रहस्यमय कथा म्हणून सादर केले आहे.

### ‘जुमानजी-३’चे चित्रीकरण पूर्ण




**वॉशिंग्टन :** ड्वेन जॉन्सन, याला चाहते प्रेमाने ‘द रॉक’ म्हणतात, त्याने ‘जुमानजी’ या तिसऱ्या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. त्याने ही बातमी त्याच्या समाज माध्यम खात्यावर दिली. त्याने ‘जुमानजी-३’च्या सेटवरील पडद्यामागील अनेक फोटोदेखील शेअर केले. हा माझ्या संपूर्ण कारकीर्दीतील सर्वांत मजेदार आणि सर्जनशील अनुभवांपैकी एक होता. ‘जुमानजी’चे साहस आता संपले आहे, असे त्याने लिहिले आहे. त्याने या पोस्टमध्ये कलाकारांची प्रशंसा केली आहे. ड्वेनने विशेषतः दिग्दर्शक जेक कासडन यांचे आभार मानले आहे. तुमच्यासोबत काम करणे हा एक सन्मान होता. आपण दोघांनी मिळून ‘जुमांजी’च्या जगात अनेक अद्वितीय पात्रे साकारली. त्याने रॉबिन विल्यम्स यांचीही आठवण काढली आणि लिहिले, हा अंतिम भाग तुमच्यासाठी आहे, असे लिहिले.

# आयडीएफसी बँक घोटाळ्याची होणार सीबीआय चौकशी

## हरयाणा सरकारचे केंद्राला पत्र




◆ **चंदीगड, ३१ मार्च**

हरयाणातील तीन खाजगी बँकांमध्ये ७५० कोटी रुपयांचा घोटाळा समोर आल्यानंतर आता सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (सीबीआय) मार्फत चौकशी करण्याची तयारी सुरू आहे. हरयाणा सरकारने यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाला पत्र लिहिले आहे. पहिल्या टप्प्यात आयडीएफसी फर्स्ट बँकेची चौकशी होईल. यात १८ सरकारी विभागांसोबत ५९० कोटी रुपयांचा घोटाळा झाला. याशिवाय एयू स्मॉल फायनान्स बँक आणि कोटक महिंद्रा बँकेतही घोटाळा समोर आला आहे.

हरयाणा सरकारच्या खात्यात पूर्ण ५९० कोटी रुपये परत आले असले तरी, मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी या प्रकरणात कठोर भूमिका घेतली आहे. आतापर्यंत या प्रकरणाची चौकशी एसीबी करत आहे. अनेक अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आहे.

एसीबीने या प्रकरणात बँक कर्मचाऱ्यांसह ज्वेलर्स आणि हरयाणा सरकारचे दोन वित्त अधिकाऱ्यांना अटक केली आहे. गत काही दिवसांपासून या घोटाळ्यात अंमलबजावणी संचालनालयाची (ईडी) देखील ‘एंट्री’ झाली आहे. ईडीने १९ ठिकाणी छापे टाकले होते. सध्या, सीबीआय चौकशीच्या शक्यतेने हरयाणा सरकारमधील अनेक वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांची झोप उडाली आहे. कारण आतापर्यंत फक्त छोटे अधिकारीच या कचाट्यात सापडले आहेत. या प्रकरणात सुमारे अर्धा डझन आयएएस अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद आढळली असून ते सरकारी यंत्रणांच्या रडारवर असल्याची चर्चा आहे. ◂(वृत्तसंस्था)

### एफडीच्या नावाखाली झाला घोटाळा

**वास्तवात, हरयाणा सरकारच्या १८ विभागांनी सुमारे ५९० कोटी रुपयांची रक्कम बँकेत जमा केली होती. ही रक्कम मुदत ठेवींमध्ये (एफडी) गुंतवण्यासाठी दिली होती. यानंतर एका विभागाने आपले खाते बंद करून रक्कम दुसऱ्या बँकेत हस्तांतरित करण्याची विनंती केली. या प्रक्रियेदरम्यान खात्यातील वास्तविक शिल्लक रक्कम आणि विभागाने सांगितलेल्या रकमेत फरक आढळला.**

# इस्रायलमध्ये पॅलेस्टिनी गुन्हेगारांना मृत्युदंड

## संसदेत विधेयक मंजूर

◆ **तेल अवीव, ३१ मार्च**

इस्रायलच्या संसदेने (नेसेट) पॅलेस्टिनी गुन्हेगारांना शिक्षा देणारे विधेयक मंजूर केले. यानुसार, वेस्ट बँकच्या पॅलेस्टिनींना इस्रायली नागरिकांची हत्या केल्यास किंवा दहशतवादी कारवायांमध्ये सामील झाल्यास थेट फाशीची शिक्षा दिली जाणार आहे. शिक्षेविरोधात पॅलेस्टिनी अपील करू शकणार नाही आणि ९० दिवसांत फाशी देणे बंधनकारक असेल. हा कायदा दहशतवादी हेतूने केलेल्या हत्यांना लागू होईल. तथापि, न्यायालयाला विशेष कारणांखाली जन्मठेपेची शिक्षा देण्याचाही अधिकार असेल.

विधेयक राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इत्तमार बेन ग्विर यांनी सादर केले. विधेयक मंजूर झाल्यानंतर बेन ग्विर आणि इतर खासदारांनी संसदेतच शॅम्पेनची बाटली उघडून जल्लोष केला. ग्विर म्हणाले, इस्रायल खेळाचे नियम बदलत आहे, जो ज्यूंची हत्या करेल, तो श्वास घेऊ शकणार नाही. या विधेयकाची मागणी इस्त्रायलमधील कट्टर उजव्या विचारसरणीचे गट दीर्घकाळापासून करत होते. वेस्ट बँक मध्ये पॅलेस्टिनींवर लष्करी कायदा लागू होतो. या विधेयकामुळे लष्करी न्यायालयाच्या नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यामुळे आता न्यायाधीश सर्वानुमतीशिवायही मृत्युदंडाची शिक्षा सुनावू शकतील. वंशभेद आणि सूडबुद्धीने प्रेरित विधेयक असल्याचे मानवाधिकार संघटनांनी म्हटले आहे. विरोधी पक्षनेते यायर लॅपिड यांनी या विधेयकावर टीका करीत याला हमाससमोर शरणागती पत्करणे असे म्हटले.

**सर्वोच्च न्यायालयात आव्हान**

विधेयक मंजूर झाल्यानंतर काही तासांतच या विधेयकाविरोधात इस्रायलच्या नागरी हक्क संघटनेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्याचबरोबर ते असंवैधानिक असल्याचे सांगत रद्द करण्याची मागणी केली. ◂(वृत्तसंस्था)

## पती-पत्नीसह घरात आढळले दोन मुलांचे मृतदेह

◆ **मुझफ्फरनगर, ३१ मार्च**

उत्तरप्रदेशातील मुझफ्फरनगरच्या सिव्हिल लाईन्स परिसरातील एका घरात एकाच कुटुंबातील चार सदस्यांचे मृतदेह आढळले. पत्नी आणि दोन मुलांचे मृतदेह एका खोलीत तर पतीचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. इरशादचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत तर, त्याची पत्नी नूरीन जमिनीवर मृतावस्थेत पडलेली होती. दोन लहान मुले अहिल आणि अक्षा हे दोघेही पलंगावर मृतावस्थेत पडून होते. पोलिसांनी मृतदेह शव विच्छेदनासाठी पाठवले. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय लष्कराला मिळाली प्रहार लाईट मशिन गन

## मिनिटाला ७०० गोळ्यांचा वर्षाव करण्याची क्षमता

◆ **नवी दिल्ली, ३१ मार्च**

भारतीय लष्कराला दोन हजार प्रहार लाईट मशीन गनची पहिली खेप अधिकृतपणे सोपवण्यात आली. ग्वाल्हेरच्या स्मॉल आर्म्स कॉम्प्लेक्समध्ये तयार करण्यात आलेल्या ७.६२ मिमी कॅलिबरचे शस्त्र एका मिनिटाला ७०० गोळ्यांचा वर्षाव करू शकते. याची मारक क्षमता ही हजार मीटर (१ किमी) अंतरापर्यंत अचूक निशाणा साधण्याची आहे. सीमेवरील मारक क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने प्रहार लाइट मशीन गन अतिशय महत्त्वाचे मानले जाते.




मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात, भारतीय सैन्याला दोन हजार प्रहार लाइट मशीन गनची पहिली खेप सुपूर्द करण्यात आली. ही मशीन गन एका मिनिटाला ७०० गोळ्यांचा वर्षाव करू शकते. या शस्त्रात एक किमी अंतरापर्यंत अचूक निशाणा साधण्याची क्षमता आहे. केवळ आठ किलो वजनाच्या या मशीन गनची लांबी ११०० मिमी आहे. यामुळे ती वाहून नेण्यास अत्यंत सोपी आहे. या आधुनिक शस्त्रांचा वापर प्रामुख्याने भारत-चीन आणि भारत-पाकिस्तान सीमांवर केला जाणार आहे. दुर्गम डोंगरदऱ्यांमध्ये गस्त घालणाऱ्या जवानांसाठी ही मशीन गन अधिक प्रभावी ठरेल, असा विश्वास संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनातून व्यक्त करण्यात आला. ◂(वृत्तसंस्था)

### लष्करी क्षेत्रातील आत्मनिर्भरता

**कार्यक्रमाला संरक्षण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव ए. अंबरासु आणि अडाणी डिफेन्स ॲण्ड एयरोस्पेसचे सीईओ आशिष राजवंशी उपस्थित होते. भारताने संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. खासगी क्षेत्रातील सहभागामुळे भारतीय सैन्याला जागतिक दर्जाची शस्त्रे आता देशातच उपलब्ध होत असल्याचे अंबरासू आपल्या संबोधनात म्हणाले.**

## सलमानने केली नव्या चित्रपटाची घोषणा

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता सलमान खानने नवीन चित्रपटाची घोषणा केली आहे. यावेळी तो साऊथचे चित्रपट निर्माता वामशी पेडिपल्ली आणि निर्माता दिल राजू यांच्यासोबत काम करणार आहे. सलमान खान आणि प्रॉडक्शन हाऊस ‘श्री व्यंकटेश्वर क्रिएशन्स’ने समाज माध्यमावर या प्रोजेक्टची घोषणा केली. याचे चित्रीकरण एप्रिलपासून सुरू होईल. सलमानने वामशी पेडिपल्लीसोबत फोटो शेअर करत एप्रिलपासून वामशी पेडिपल्ली आणि दिल राजू यांच्यासोबत दिल, दिमाग, जिगरने, असे लिहिले. चित्रपटाचे तात्पुरते नाव एसव्हीसी-६३ आहे. यात हिंदी आणि दक्षिण भारतीय उद्योगातील कलाकार असतील. चित्रपटाचे चित्रीकरण देशभरातील विविध ठिकाणी होईल आणि १४ एप्रिलपासून मुंबईतील सेटवर सुरू होईल. चित्रपटाचे दिग्दर्शन वामशी पेडिपल्ली करणार आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# जनगणना : वर्तमान आणि भविष्यासाठी..

कोणत्याही राष्ट्राची खरी संपत्ती म्हणजे त्या राष्ट्रातील नागरिक. देशाची ताकद, त्याच्या क्षमता आणि भविष्य नागरिकांवर अवलंबून असते. देश म्हणजे केवळ भौगोलिक सीमारेषा नसतात; तर त्या सीमांमध्ये जगणारी माणसं, त्यांच्या डोळ्यातील स्वप्नं, त्यांचा संघर्ष आणि भविष्याच्या दिशेने धावणाऱ्या कोट्यवधी आकांक्षा असतात. त्यामुळेच देशाची खरी ओळख त्याच्या लोकसंख्येत अर्थात नागरिकांच्या संख्येत आणि स्वरूपात दडलेली असते. खरे म्हणजे जनगणनेच्या माध्यमातून घेतलेली लोकसंख्येची नोंद म्हणजे त्या देशाच्या स्पंदनांची नोंद असते. जनगणना म्हणजे निव्वळ माणसांची मोजणी नसते; ती देशाच्या विकासाचा, बदलणाऱ्या सामाजिक संदर्भांचा आणि आर्थिक जडणघडणीचा जिवंत आरसा असते. त्यामुळे देशभरात आजपासून सुरू होत असलेली जागतिक पातळीवरील सर्वात मोठी जनगणनेची प्रक्रिया ही भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची पायरी आहे.

जवळपास दीड दशकानंतर म्हणजे २०११ नंतर ही जनगणना होत आहे. २०२१ मध्ये नियोजित असलेली जनगणना कोरोनाच्या महामारीमुळे पुढे ढकलावी लागली. मागील १५ वर्षांच्या काळात देशात अनेक महत्त्वाचे बदल घडले. लोकसंख्येत वाढ झाली, शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढला, रोजगाराच्या संधींसाठी लोक गावाबाहेर पडले, प्रत्येकाच्या हातात सोशल मीडियामुळे माध्यम आलं, डिजिटल क्रांतीचा विस्तार झाला. अशा अनेक बदलांमुळे देशाचे सामाजिक आणि आर्थिक चित्र बरेच बदलले आहे. या नव्या सामाजिक आणि आर्थिक वास्तवाचे अचूक प्रतिबिंब जनगणनेतून आपल्याला मिळू शकेल. जनगणना म्हणजे प्रत्येक नागरिकांची माहिती संकलित करून देशाची खरी संख्यात्मक, सामाजिक आणि आर्थिक स्थिती जाणून घेण्याचा व्यापक आणि शास्त्रीय प्रयत्न असतो. यात वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, निवास, कौटुंबिक माहिती, स्थलांतर यांसारख्या अनेक गोष्टींचा समावेश असतो. त्यामुळे जनगणनेतून मिळणारी ही माहिती आकडेवारीहून अधिक काही सांगत असते. त्या विविध ठिकाणी जगत असलेल्या मानवी समुदायांच्या बोलक्या कथा असतात. या कथांमधून विकासाची, विषमतेची, प्रगतीची आणि आव्हानांची जाणीव देशाला होत असते. कोणत्याही राज्यकर्त्यांसाठी आणि प्रशासनासाठी जनगणना म्हणजे विकासाचे नियोजन करण्यासाठीचा मूलभूत पाया असतो. देशाची एकूण लोकसंख्या किती, ती कुठे आणि कशी विभागली गेली आहे, कोणत्या वयोगटातील लोक जास्त आहेत, शिक्षणाचे प्रमाण किती, रोजगाराची स्थिती काय, निवास कुठे अशा देशाच्या भविष्याला आकार देणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरं जनगणनेतून मिळतात. बालकांच्या संख्येच्या प्रमाणात शाळा-दवाखाने, वृद्धांच्या संख्येनुसार आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षेवर काम करण्याची आवश्यकता असते. एखाद्या शहरात झपाट्याने लोकसंख्या वाढत असल्यास पायाभूत सुविधांवर ताण येतो. अशा वास्तव परिस्थितीचा योग्य अंदाज घेण्यासाठी जनगणना महत्त्वाची असते. याशिवाय, संसाधनांचे योग्य आणि न्याय्य वाटप करण्यासाठी जनगणना हा महत्त्वाचा आधार असतो.

देशातील पाणी, अन्न, वीज, निवारा यांसारखी संसाधने मर्यादित असतात. त्यामुळे ती कुठे आणि किती प्रमाणात द्यायची, याचा निर्णय जनगणना आकडेवारीच्या माध्यमातून घेता येतो. कोणत्या भागात कोणत्या सुविधांची कमतरता आहे, हे स्पष्ट होते. त्यामुळे विकासाच्या योजना अधिक परिणामकारक आणि समतोल पद्धतीने राबविता येतात. शहरी किंवा ग्रामीण भागातील नियोजन अधिक चांगल्या पद्धतीने आणि दूरदृष्टीने करता येते. समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठीही जनगणनेचा फायदा होतो. गरिबी, अशिक्षितता, बेरोजगारी, सामाजिक विषमता अशा समस्यांचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जनगणनेची माहिती उपयोगी येते. या माहितीच्या आधारे सरकार विशेष योजना आखून त्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे जनगणना ही सामाजिक न्याय साध्य करण्यासाठीही आवश्यक असते. निवडणूक प्रक्रियेतही लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची रचना आणि पुनर्रचना केली जाते. जनगणनेमुळे लोकसंख्येची वयोगटानुसार रचना, महिला-पुरुष प्रमाण, स्थलांतराचा कल आणि साक्षरतेचा दर स्पष्ट होतो.

यामुळे सरकारला सामाजिक सुरक्षा योजना, सार्वजनिक वाहतूक, ऊर्जा वापर तसेच पायाभूत सुविधांची उभारणी यासाठी योग्य दिशा मिळते. कृषी, उद्योग, अन्नसुरक्षा आणि पर्यावरण यांसारख्या क्षेत्रांतील बदलांचाही अभ्यास करता येतो.

आजच्या काळात 'डेटा' हा विकासाचा आधार बनला आहे. पण केवळ डेटा संकलित करणे पुरेसे नाही; तो समजून घेणे, त्याचे बारकाईने विश्लेषण करणे आणि त्यावर आधारित निर्णय घेणे अधिक महत्त्वाचे आहे. कोणतेही धोरण आखताना किंवा निर्णय घेताना अचूक आणि विश्वासार्ह माहिती गरजेची असते. जनगणना ही अशीच माहिती पुरविणारी सर्वात मोठी आणि व्यापक प्रक्रिया आहे. या माहितीच्या आधारेच प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार आणि परिणामकारकपणे काम करू शकते. जनगणनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती प्रत्येक नागरिकाच्या अस्तित्वाची अधिकृत नोंद करते. देशातील प्रत्येक व्यक्ती ही शासनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, याची जाणीव जनगणनेच्या माध्यमातून होते. त्यामुळे नागरिकांचा शासनावर विश्वास वाढतो. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही जनगणना उपयुक्त ठरते. पूर, दुष्काळ, भूकंप किंवा महामारी यांसारख्या संकटांच्या वेळी कोणत्या भागात किती लोक राहतात, त्यांची स्थिती काय आहे, याची माहिती असल्यास मदतकार्य अधिक जलद आणि प्रभावीपणे करता येते.

जनगणना ही केवळ सरकारी प्रक्रिया नव्हे. तीत सहभागी होणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अनेक वेळा लोक माहिती देताना टाळाटाळ करतात किंवा चुकीची माहिती देतात. मात्र, असे केल्यास संपूर्ण आकडेवारीवर परिणाम होतो आणि त्याचा परिणाम विकास योजनांवर होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने प्रामाणिकपणे आणि सहकार्याच्या भावनेने जनगणनेत सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. जनगणनेच्या प्रक्रियेत गोपनीयतेचाही आदर राखला जातो. नागरिकांनी दिलेली माहिती ही केवळ सांख्यिकीय वापरासाठीच असते; कुणाच्या वैयक्तिक वापरासाठी नसते. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता माहिती द्यायला हवी. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात भाषा, जात, धर्म, संस्कृती, जीवनशैली यातील विविधता समजून घेण्यासाठीही जनगणना मदत करते. कोणत्याही समाजाचा खरा चेहरा त्याच्या लोकसंख्येत दिसतो. त्यामुळेच जनगणना ही भूतकाळ, वर्तमानकाळ आणि आपल्या भविष्याला जोडणारी साखळी आहे. त्यातून आपल्याला कळते की, आपण कुठे होतो, सध्या कुठे आहोत आणि पुढे कुठे जाऊ शकतो. त्यामुळे ती केवळ एक शासकीय मोहीम नसून देशाच्या प्रवासाला दिशा देण्यासाठी आवश्यक अशी व्यापक प्रक्रिया आहे. आज सुरू होणारी ही जनगणना देशाला येणाऱ्या काळात देशाला नवी दिशा देईल. त्यातून विकासाला गती मिळेल आणि समतोल प्रगती नक्कीच साधली जाईल. जनगणनेतून केवळ वर्तमानच पुढे येत नाही, तर आपल्या भविष्याला आकारही दिला जात असतो. त्यामुळे वर्तमानासह भविष्यासाठीही ती गरजेची आहे आणि आपल्या साऱ्यांचे सहकार्यही तेवढेच आवश्यक आहे..

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# नवे ऊर्जा धोरण 'गेमचेंजर' ठरणार!

भारताच्या ऊर्जा क्षेत्राला नव्या दिशेने नेण्याच्या उद्देशाने ऊर्जा मंत्रालयाने जाहीर केलेले राष्ट्रीय वीज धोरण हा एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टी असलेला दस्तावेज ठरणार आहे. 'विकसित भारत २०४७' या ध्येयाच्या पृष्ठभूमीवर तयार करण्यात आलेले हे धोरण अंतिम झाल्यानंतर २००५ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या विद्यमान राष्ट्रीय वीज धोरणाची जागा घेणार आहे. एकेकाळी गंभीर मानली जाणारी वीजपुरवठ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर सुटली असून देशातील जवळपास सर्व गावे आणि इच्छुक घरांपर्यंत वीज पोहोचविण्यात यश आले आहे. सार्वत्रिक विद्युतीकरणाचा हा टप्पा गाठल्यानंतर आता लक्ष गुणवत्ता, विश्वासार्हता आणि शाश्वततेकडे वळले आहे. या धोरणानुसार २०४७ पर्यंत देशातील एकूण वीज निर्मिती क्षमतेपैकी ८० टक्क्यांहून अधिक क्षमता जीवाश्म इंधनांवर अवलंबून नसलेल्या स्रोतांमधून येईल तसेच एकूण वीज उत्पादनापैकी सुमारे दोन-तृतीयांश वीज अशा स्वच्छ ऊर्जास्रोतांमधून निर्माण होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर देशातील एकूण ऊर्जा वापरामध्ये विजेचा वाटा सध्याच्या तुलनेत दुप्पट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या मसुदा धोरणात संसाधन पर्याप्ततेवर विशेष भर देण्यात आला आहे. या अंतर्गत वितरण कंपन्या आणि राज्यस्तरीय 'लोड डिस्पॅच' केंद्रे आपल्या पातळीवर संसाधन नियोजन करतील आणि त्यांना राज्य वीज नियामक आयोगांच्या नियमांचे मार्गदर्शन मिळेल. वीज वितरण क्षेत्रातील आर्थिक शाश्वततेचा प्रश्न हा या धोरणाचा गाभा मानला गेला आहे. अनेक राज्यांमध्ये वीज दर हे पुरवठ्याच्या खर्चापेक्षा कमी ठेवले जात असल्यामुळे महसुलात सातत्याने तूट निर्माण होत असून कर्जाचा बोजा वाढत आहे. या समस्येवर तोडगा म्हणून खर्चानुसार दरनिर्धारण, योग्य वेळी दरवाढीची अंमलबजावणी आणि तांत्रिक तसेच व्यापारी तोट्यांमध्ये कपात यावर भर देण्यात आला आहे. नियामकांकडून दर निर्धारणात विलंब झाल्यास स्वयंचलित दरवाढीची तरतूद करण्याचाही प्रस्ताव आहे. यामुळे वितरण कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा प्रयत्न आहे.

नव्या धोरणात नूतनीकरणक्षम ऊर्जेला केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून सौर आणि पवन ऊर्जेच्या वाढत्या वापरासोबत येणाऱ्या तांत्रिक आणि व्यवस्थापनाच्या आव्हानांवर उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. ऊर्जा साठवण तंत्रज्ञानाचा वापर, बाजाराधारित यंत्रणा आणि पायाभूत सुविधांचे योग्य नियोजन याद्वारे वीज प्रणाली अधिक स्थिर आणि लवचीक करण्याचा प्रयत्न दिसून येतो. नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या चढ-उतारांशी जुळवून घेण्यासाठी पारंपरिक वीज प्रकल्प अधिक लवचीक



बनवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे तसेच अशा प्रकल्पांचा वापर केवळ वीजनिर्मितीसाठीच नव्हे, तर औद्योगिक प्रक्रियांसाठीही करण्याच्या शक्यता तपासण्याचा प्रस्ताव आहे. आण्विक ऊर्जेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विस्ताराचे संकेत देण्यात आले आहेत. २०४७ पर्यंत आण्विक ऊर्जा निर्मितीचे १०० गीगावॅट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले असून लहान आणि प्रगत अणुभट्ट्यांचा वापर वाढविण्यावर भर दिला आहे. औद्योगिक क्षेत्रालाही अणुऊर्जेचा वापर करण्याची परवानगी देण्याचा विचार या धोरणात मांडण्यात आला आहे. जलविद्युत क्षेत्राला यात धोरणात्मक महत्त्व देण्यात आले आहे. हवामान बदल आणि जलसुरक्षेच्या पृष्ठभूमीवर जलसाठा प्रकल्पांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. अशा प्रकल्पांमुळे पूरनियंत्रण, सिंचन आणि स्थिर वीजपुरवठा या तिन्ही बाबींमध्ये फायदा होऊ शकतो.

वीज बाजारपेठेच्या दृष्टीने अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि समावेशक व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. लहान उत्पादकांना संधी देणे, करार प्रक्रियेचे सुलभीकरण आणि बाजारावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मजबूत यंत्रणा उभारण्याचे उद्दिष्ट या धोरणातून दिसून येते. प्रसारण यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली असून 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ऑथॉरिटी'ला यासाठी पाच आणि दहा वर्षांचे आराखडे तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. वाढत्या नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या समावेशासाठी आणि मुक्त प्रवेश प्रणालीला चालना देण्यासाठी मजबूत प्रसारण नेटवर्क आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रीड व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ऊर्जा साठवण प्रणालींचा समावेश आणि संस्थात्मक सुधारणा याद्वारे वीज प्रणाली अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याचबरोबर सायबर सुरक्षेलाही विशेष महत्त्व देण्यात आले असून वीज क्षेत्रातील सर्व माहिती देशातच साठवण्याची सक्ती आणि सायबर हल्ल्यांना तोंड देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्यावर भर हे उपाय योजण्यात आले आहेत. डेटा शेअरिंगला प्रोत्साहन देऊन नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधारित उपायांना चालना देण्याचा प्रयत्नही या धोरणात दिसून येतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल साधनांचा वापर करून वीज क्षेत्र अधिक सक्षम आणि कार्यक्षम बनविण्याचा स्पष्ट प्रयत्न या मसुद्यातून जाणवतो. एकूणच राष्ट्रीय वीज धोरण भारताच्या ऊर्जा क्षेत्राला अधिक स्वच्छ, सक्षम, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि बाजारकेंद्रित बनविण्याचा व्यापक आराखडा मांडते; मात्र या धोरणाचा खरा कस लागणार तो त्याच्या अंमलबजावणीत. राज्य सरकारे आणि वीज वितरण कंपन्या या धोरणातील तरतुदी प्रभावीपणे राबवू शकतील का आणि त्यातून सेवा गुणवत्तेत तसेच आर्थिक स्थितीत अपेक्षित सुधारणा घडवून आणू शकतील का, हेच आगामी काळात निर्णायक ठरणार आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारताने वीज क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. एकेकाळी अंधारात असलेली गावे आता उजळली आहेत. उद्योगधंद्यांना सातत्यपूर्ण वीजपुरवठा मिळू लागला असून ऊर्जा ही विकासासाठी महत्त्वाची गरज बनली आहे. तथापि, या यशामागे काही गंभीर समस्या दडलेल्या आहेत. वितरण कंपन्यांचे वाढते कर्ज, अपुरे दरनिर्धारण, वीज चोरी आणि तांत्रिक तोटे या समस्यांनी संपूर्ण व्यवस्थेला आर्थिकदृष्ट्या कमकुवत केले आहे. त्यामुळेच नव्या धोरणात आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेवर विशेष भर देण्यात आला आहे. या धोरणातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ऊर्जा स्रोतांबाबतचा दृष्टिकोन. पारंपरिकरीत्या भारताची वीज निर्मिती मोठ्या प्रमाणावर कोळसा आणि इतर जीवाश्म इंधनांवर आधारित होती; परंतु हवामान बदलाच्या वाढत्या संकटाच्या पृष्ठभूमीवर आणि आंतरराष्ट्रीय बांधिलकी लक्षात घेता आता या अवलंबित्वात मोठी घट करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आगामी काळात सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा यांसारख्या स्वच्छ स्रोतांचा वापर झपाट्याने वाढवण्याचा मानस या धोरणातून स्पष्ट होतो. जीवाश्म इंधनावर आधारित पारंपरिक वीज प्रकल्प पूर्णपणे बंद होणार नाहीत; पण त्यांची भूमिका बदलणार आहे. भविष्यात हे प्रकल्प 'बेसलोड' पुरवठादार न राहता 'बॅकअप' आणि 'ग्रीड स्थिरता' राखण्यासाठी वापरले जातील. यामुळे नूतनीकरणक्षम ऊर्जेतील चढउतार सांभाळणे शक्य होईल. याचबरोबर या प्रकल्पांचा अधिक कार्यक्षम वापर करण्यासाठी लवचीक बनवण्यावर भर दिला जात आहे. त्यातूनच औद्योगिक प्रक्रियांसाठी उष्णतेचा वापर कवा शीतकरणासाठी वाफेचा उपयोग करण्यासारखे पर्याय पुढे येऊ शकतात.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# अखाद्य वनस्पतींचे जंगलातील वास्तव!

आम्ही काल्पनिक जगात अधिक रमतो. म्हणून तर असं केलं तर तसं होईल आणि आपला हेतू साध्य होईल, यावर आमचा दृढ विश्वास असतो. पण खरंच आपण जे करायचं, त्यावर लक्ष केंद्रित करून काम करतो का हो? हे एवढ्यासाठीच म्हणावसं वाटतं, कारण मानव आणि हिंस्र प्राणी संघर्ष हे न सुटलेले कोडे असल्यागत चर्चेची गुऱ्हाळे रंगतात आणि त्या मंथनातून निघतो, तो कोंबड्या, बकऱ्या सोडण्याचा सार! हे किती वास्तवाशी सुसंगत हा प्रश्नच आहे. पण या मंथनात जंगलातील अखाद्य वनस्पतींमुळे खंडीत होत चाललेली अन्न साखळी आणि त्याचे दुष्परिणाम यांना जागा नसेल तर वन आणि व्याघ्र संवर्धन न संपणाराच विषय आहे.

वास्तवाची जाणीव ठेवून केलेल्या कार्याच्या सफलतेचे प्रमाण नक्कीच चार भिंतींच्या आड बसून केलेल्या नियोजनापेक्षा अधिकच असते. आमच्या बाबतीतील अनेक गोष्टींचे नियोजन दूर कुठेतरी बसलेले प्रशासनातील अधिकारी करतात. लोकप्रतिनिधी, राज्यकर्त्यांचा त्याला दुजोरा असतो आणि मग कागदे रंगविली जातात. मानव आणि जंगलातील हिंस्र प्राणी हा संघर्ष वर्षानुवर्ष चालत आलेला विषय आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत जंगलाच्या बाहेर न भटकणारा प्राणी आता थेट गावात काय, लोकांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचला आहे. बिबट गावात आल्याच्या आणि वाघाने शेतात येऊन मानवाचा बळी घेतल्याच्या घटना नवीन नाहीत. मग आम्ही अनेक वर्षांपासून हा संघर्ष संपावा म्हणून रंगविलेल्या कागदांचे काय? त्याचे निघालेले फलित काय, असा प्रश्न उपस्थित केला गेला तर उत्तर शून्यच म्हणावे लागेल. आठवडाभरात दोन घटना घडल्या. यात एकाचा जीव गेला. एक महिला मृत्यूशी झुंज देत आहे. त्यांचा दोष काय तर ते शेतात काम करीत होते. तिथे वाघोबा आले आणि हल्ला केला? वाघ गावाकडे का आला किंवा येतो, याची अनेक कारणे असतील. ती शोधून त्यावर उपाययोजनाही होतात. म्हणून बिबट, वाघ जंगलाच राहावे म्हणून बकऱ्या जंगलात सोडण्याची कल्पना आमच्या मंत्रिमहोदयांच्या डोक्यात येते आणि त्यावर चर्चाही रंगतात. हे किती वास्तवाला धरून परिस्थिती सापेक्ष आहे, हे यासाठी आपल्या कल्पनेचा विस्तार करणाऱ्यांनाच माहीत. पण कधी वस्तुस्थितीचा विचार नियोजन करताना होतो का हो?

जंगलात एक अन्न साखळी असते. तृणभक्षी प्राणी म्हणजे हरीण, सांबार, नीलगाय, गवा हे जंगलात वाढणारे गवत म्हणजेच तृण खाऊन जागतात. त्यांची शिकार करून वाघ, बिबट यासारखे हिंस्र प्राणी आपली उपजीविका चालवितात. आज नवेगाव, नागझिरा, ताडोबा या राष्ट्रीय दर्जाच्या व्याघ्र प्रकल्पांची अवस्था काय? खरंच तेथे तृणभक्षी प्राण्यांसाठी अन्न शिल्लक आहे का? आज शाकाहारी प्राण्यांसाठीच्या गवताची जागा अखाद्य वनस्पतींनी घेतली. ताडोबात लॅंटोना कॅमेरा, युपॅरोशियम अशा अखाद्य विषारी वनस्पती फोफावल्या. नवेगाव-नागझिरा प्रकल्पात रान तुळस, महाडोर, तरोटा यांनी आपले अस्तित्व निर्माण करून तृणाला हद्दपार केले. कधीकाळी १० ते १२ टक्के असलेल्या या वनस्पतींनी आपले साम्राज्य एवढे वाढविले की, आज व्याघ्र प्रकल्पाचा ६० ते ७० टक्के भाग याच वनस्पतींनी काबीज केला. परिणामी तृणभक्षींचे अन्न संपले आणि तृणभक्षी प्राणीही! गवत नसल्याने त्याचे दुष्परिणाम शाकाहारी प्राण्यांवर झाले. त्यांची संख्या कमी झाली. परिणामी वाघ-बिबटच्या अन्नाचा प्रश्न निर्माण होऊन नाईलाजाने हे प्राणी पाळीव असलेल्या गाय-म्हैस या गावातील प्राण्यांकडे आणि मानवावर हल्ला करण्याकडे वळले. अन्न साखळी विस्कळीत झाली आणि पर्यावरणाचे चक्रही फिरले. भारतातील अनेक व्याघ्र प्रकल्पांमध्ये या अखाद्य वनस्पतींनी वाढविलेला व्याप आज व्याघ्र आणि वनसंवर्धनासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. अशा अखाद्य वनस्पती नवेगाव-नागझिरा प्रकल्पातून समूळ नष्ट करण्याची मागणी काही वर्षांपूर्वी केली खरी; पण हजारो किलोमीटर दूर, चार भिंतीत बसलेल्या प्रशासनातील अधिकाऱ्यांना तो विषय निरर्थक वाटला असावा. मात्र आज जेव्हा एका व्याघ्र प्रकल्पातून नागझिरा अभयारण्यात ५०० हरीण आणण्याचा निर्णय घेतला गेला, तेव्हा त्याचे महत्त्व नक्कीच पटले असावे! अखाद्य वनस्पतीमुळे तृणभक्षींना मिळणारे पोषक मूल्य संपले. अशा वनस्पतींची घनता वाढल्याने जंगलात प्राण्यांच्या अधिवासाचा प्रश्न उपस्थित झाला. ज्यांचा काहीच उपयोग नाही, अशा वनस्पतीला आम्ही गोंजारत असताना दुसरीकडे मात्र आमची जैवविविधता नष्ट होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. विचारांचे स्वातंत्र्य आम्हाला आहे. यातूनच नवनवीन कल्पना उदयास येतात. हे करताना अनेक समस्यांचे मूळ काय? याचेही मंथन होणे गरजेचे आहे. नाहीतरी भविष्यात आम्हाला अखाद्य वनस्पतीच्या जंगलात जंगल पर्यटन करण्याची वेळ येईल आणि प्राण्यांसाठी ग़ावाच्या शेजारी निवारे उभे करावे लागतील.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# श्रीमद्भागवत महापुराण

भारतीय वाङ्मयाचा मुकुटमणी म्हणजे श्रीमद्भागवत महापुराण होय. भक्ती, ज्ञान आणि वैराग्याची सुंदर गुंफण म्हणजे भागवत पुराण आहे. याशिवाय सर्व शास्त्र, साहित्य, व्याकरण, कला, काव्य याचा एकत्रित सागर म्हणजे भागवत होय. 'विद्यावतां भागवते परीक्षा' असे उगाच म्हटले नाही.

हे पुराण साक्षात विष्णूंनी ब्रह्मदेवांना, ब्रह्मदेवांनी देवर्षी नारदांना, नारदांनी महर्षी व्यासांना सांगितले. व्यासांनी त्याची रचना केली. १२ स्कंध म्हणजे भाग, ३२५ अध्याय आणि १८ हजार श्लोक असलेले हे भागवत पुराण व्यासांनी आपला पुत्र शुक महामुनींना सांगितले. शुकदेवांनी हे पुराण मुख्यतः मृत्यूच्या दारात असलेल्या परीक्षित राजांना सांगितले. म्हणूनच जगावे कसे? हे गीता सांगते आणि मरावे कसे? हे भागवत सांगते. 'गीता भागवत करिती श्रवण, अखंड चिंतन विठोबाचे !' हे जीवनाचे सूत्र असावे.

भागवत महापुराणातील दशम स्कंध भागवताचा प्राण आहे. या स्कंधात भगवान श्रीकृष्णाच्या लीला वर्णन आहे. प्रथम स्कंधात भागवत माहात्म्य आणि भक्तीचा महिमा दिला आहे. परीक्षिताचा जन्म, त्यांचा दिग्विजय आणि त्यांना श्रृंगी ऋषींचा शाप असा कथाभाग आहे. दुसऱ्या स्कंधात ब्रह्मांड उत्पत्ती, विराट स्वरूप, राजा परीक्षिताचे विविध प्रश्न आणि शुकाचार्यांचा कथारंभ दिला आहे. तृतीय स्कंधात उद्धवांनी केलेले भगवंतांचे बाललीला वर्णन, वराह अवतार कथा, हिरण्यकश्यपू, हिरण्याक्ष कथाभाग इत्यादी दिले आहे. चतुर्थ स्कंधात दक्ष यज्ञ, सती कथा, ध्रुव चरित्र, पृथु चरित्र, राजा पुरंजन उपाख्यान दिले आहे. पंचम स्कंधात भरत चरित्र, सागर, पर्वत, नदी, पाताळ, नरक यांची स्थिती दिली आहे. सहाव्या स्कंधात आजामेळ उपाख्यान, दधीची ऋषी आणि वृत्रासुर कथा, देवता, मनुष्य, पशू, पक्षी यांची जन्मकथा आहे.

सातव्या स्कंधात हिरण्याक्ष, हिरण्यकश्यपू वध, प्रल्हाद चरित्र दिले आहे. आठव्या स्कंधात मन्वंतर कथा, गजेंद्र मोक्ष, समुद्रमंथन, हलाहल प्राशन, मोहिनी रूप, वामन अवतार प्रयोजन दिले आहे. नवम स्कंधात च्यवन, अंबरीश, इक्ष्वाकू, चंद्रवंश, ययाती अशा विविध राजवंशाचे चरित्र दिले आहे. दशम स्कंध महत्त्वाचा असून भगवान पूर्णपूर्णावतार योगेश्वर श्रीकृष्णाचे यथासांग चरित्र दिले आहे. एकादश स्कंधात मुख्यतः यदुवंश संहार दिला आहे.



बाराव्या स्कंधात विभिन्न युगांचे वर्णन, चार प्रकारचे प्रलय, मार्कंडेय कथा, भगवंताचे अंग, उपांग, आयुधांचे रहस्य आणि अखेर श्रीमद्भागवताची महिमा दिली आहे. स्वतः वेदव्यासांनी या पुराणाचे माहात्म्य सांगताना-

'इदं भागवतं नाम पुराणं ब्रह्मसम्मितम् ।
उत्तमश्लोकचरितं चकार भगवानृषिः ॥

या पुराणाला वेदाचा दर्जा देऊन भगवंताच्या चरित्राने परिपूर्ण म्हटले आहे.

'सर्ववेदेतिहासानां सारं सारं समुद्धृतम् ।
स तु संश्रावयामास महाराजं परीक्षितम् ॥

शुकदेवांनी राजा परीक्षिताला सर्व वेद आणि आपला इतिहास कथन केला आहे. जेव्हा कथेला सुरुवात होणार होती तेव्हा सर्व देवता अमृत कुंभ घेऊन शुकदेवांजवळ आल्या आणि म्हणाल्या, हा अमृतकुंभ घेऊन राजा परीक्षिताला द्या आणि भागवत कथा आम्हाला सांगा. तेव्हा ते देवांना म्हणाले, अहो! कुठे कथा आणि कुठे अमृत? चिंतामणी आणि काचेच्या मण्यांची तुलना होईल का? भागवत कथा म्हणजे चिंतामणी आणि अमृत म्हणजे काचमणी. स्वयं भगवान विष्णु ब्रह्मदेवांना सांगतात-

'यः पठेत् प्रयतो नित्यं, श्लोक भागवतं सुत ।
अष्टादशपुराणानां फलमाप्नोति मानवः ।'

प्रतिदिन एक श्लोक वाचला तरी १८ पुराणांचे फळ मिळते. एकेक अक्षर कपिला गाय दानाचे पुण्य मिळते. अर्धा श्लोक एक सहस्र गोदानाचे पुण्य देते.

'जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट्
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥'

भागवत पुराणाचा प्रारंभीचा हा श्लोक परम् सत्य असलेल्या परब्रह्म परमात्म्याचे ध्यान करतो.

'नामसंकीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम् ।
प्रणामो दुःखशमनस्तं नमामि हरिं परम् ॥'

भागवत महापुराणाचा समारोपीय असलेल्या या श्लोकातून त्या परम् सत्यस्वरूपाला श्रीहरी संबोधून नमन केले आहे. भागवतातील नारायण कवच सर्व विघ्न हरण करणारे, सर्वत्र विजय, आरोग्य आणि ऐश्वर्य देणारे आहे. यात दिलेले पुंसवन व्रत मनोकामना पूर्तीसाठी, गजेंद्र स्तवन ऋणमुक्ती, पयोव्रत संतानप्राप्तीसाठी दिले आहे. भागवत महापुराण अद्भुत, अलौकिक आणि अवर्णनीय प्रासादिक ग्रंथ आहे. अभ्यासकांसाठी अभ्यास ग्रंथ, उपासकांसाठी उपास्य ग्रंथ, भक्तांसाठी भक्तिरससुधा आहे.

थोडक्यात श्रीमद्भागवत महापुराण साक्षात श्रीविष्णुस्वरूप असून ज्याच्या पठन अथवा श्रावणाने चारही मुक्ती साधण्याचा मार्ग प्रशस्त होतो. शांती, भक्ती, द्वैताद्वैत, सकाम निष्काम कर्म, साध्य, साधन आणि सिद्ध ज्ञान, प्रेमा भक्ती याचे रहस्य कळते. थोडक्यात ऐहिक आणि पारलौकिक ऐश्वर्य देणारा अद्वितीय ग्रंथ म्हणजे श्री भागवत पुराण होय.

९८२२२६२७३५

## आयुर्वेद, अध्यात्म आणि हनुमंताचा आदर्श

आत्ताची युद्धजन्य परिस्थिती पाहता समाजात सर्वांच्याच मनाचे मानसिक स्वास्थ ढासळलेले आहे. आधुनिक विज्ञान युगात आपण ॲलोपॅथीवर भर देतो. कारण त्याने आपल्याला तत्काळ बरे वाटते. त्यामुळे आयुर्वेद व अध्यात्म दोन्हीही आत्मसात करण्याची गरज आहे. आपल्याला हनुमंतांनी संजीवनीच्या माध्यमातून आयुर्वेदाचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले आहे. आत्ताची परिस्थिती पाहता, आपणही आवश्यक अशा आयुर्वेदिक वनस्पती घरी लावून त्याचा उपयोग करून घेऊ शकतो. उदा. अडुळसा, पुदिना, तुळस, कोरफड, गवती चहा, आलं, हळद यांसारख्या वनस्पती आपण सहज घरी लावू शकतो. या वनस्पती केवळ औषधी गुणांनी समृद्ध नसून आपले आरोग्य नैसर्गिक पद्धतीने टिकवून ठेवण्यास मदत करतात. चैत्र पौर्णिमा म्हणजे हनुमान जयंती. रामायणातील एक प्रसंग आहे- रावणाशी युद्ध सुरू असताना मेघनादाने लक्ष्मणावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या हृदयावर बाण चालवला व लक्ष्मण मूर्छित झाले. रामचंद्र दुःखी झाले. तेव्हा सुशेण वैद्य समोर आले व म्हणाले, 'रामा, चिंता करू नको. आपल्याकडे संजीवनी बुटी ही वनस्पती आहे; पण ती खूप दूर आहे. सूर्योदयाच्या आधी द्रोणागिरी पर्वतावर जाऊन ती आणली, तरच लक्ष्मणाचे प्राण वाचू शकतील.' जवळच उभे असलेले हनुमान पुढे आले. ते प्रभू रामचंद्रांसमोर उभे राहून म्हणाले, 'प्रभू, मला आज्ञा द्यावी.' आज्ञा घेऊन 'जय श्रीराम' म्हणत ते द्रोणागिरी पर्वताकडे उड्डाण केले. पर्वतावर अनेक दिव्य वनस्पती असल्यामुळे संजीवनी बुटी कोणती, हे हनुमंताला कळेना; तेव्हा त्यांनी संपूर्ण पर्वतच उचलून सुशेण वैद्यांकडे आणला. सुशेण वैद्यांनी संजीवनी बुटीचा लेप लक्ष्मणाला लावला व काही क्षणांतच लक्ष्मण उठून बसले. तेव्हा या हनुमान जयंतीला आपण प्रार्थना करूया... 'हे हनुमंता, तुझ्यासारखी दास्यभावना, तत्परता, समयसूचकता व शक्ती आम्हाला प्राप्त होऊ दे. आम्ही घेत असलेल्या आयुर्वेदिक औषधांना गुण येऊ दे आणि या युद्धजन्य परिस्थितीत, आपत्कालात आम्हाला योग्यरीत्या लढा देऊन आमचा विजय होऊ दे.'

**रमा देशमुख**

## वाचक पत्रे

### निसर्ग हाच मानवाचा तारणहार

राज्यातील संपत चाललेले कोळशाचे साठे, सर्वत्र चालू असलेली बेसुमार जंगलतोड, भूगर्भातील पाणी, बेसुमार नाना प्रकारची प्रदूषणे, जागतिक वाढते तापमान बदल हे सर्व पाहता पर्यावरणाच्या बाबतीत गेल्या २०-२५ वर्षांचा आढावा किंवा अभ्यास लक्षात घेतला तर मानवाच्या निसर्गातील अति हस्तक्षेपामुळे आज आपण विनाशाच्या पार उंबरठ्यावर येऊन ठेपलो आहोत. निसर्ग व पर्यावरण हाच मानवी जीवनाचा खरा आधार आहे. उद्या निसर्गच नष्ट झाला तर जीवन तरी कुठे? आणि कस असणार. जीवसृष्टीचा वापर नीट व्यवस्थित हवा असेल तर निसर्ग व मानव यांचे एकमेकाशी असलेले परस्पर संबंध विचारात घेणे महत्त्वाचे आहे. करोडो वर्ष तो मानव जातीला देतच आला. यापुढेही देतच राहील या सर्व गोष्टीचा विचार करणे खूप गरजेचे आहे. निसर्गच हा मानवाचा तारणहार आहे, याचा विसर पडत चालला आहे का? आता प्रश्न आहे तो निसर्गाने तरी अजून द्यायचे किती? आणि आपण ओंजळीत घ्यायचे किती?

**लोकेश बापट**/पुणे

### वैचारिक प्रदूषण

आजकाल आपल्याच समाजात राहून आपल्याच सण-परंपरांना 'अंधश्रद्धा' किंवा 'पर्यावरणपूरक नाही' असे ठरवणारा एक वर्ग निर्माण झाला आहे. यांना आपण 'अर्बन नक्षली' म्हणतो. हे लोक जाणीवपूर्वक हिंदू धर्मातील त्रुटी शोधून त्यावर प्रहार करतात, पण अन्य धर्मीयांच्या बाबतीत मात्र हेच लोक 'पुरोगामी' राहतात. दुसरीकडे 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या जातात, पण हे बुद्धिवंत चकार शब्दही काढत नाहीत. हा एक प्रकारचा वैचारिक नक्षलवाद आहे. या वैचारिक प्रदूषणापासून वाचण्यासाठी आणि आपल्या धर्माचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जनजागृतीची नितांत गरज आहे. याचसाठी हडपसर येथे ५ एप्रिलला हिंदू धर्मजागृती सभा होत आहे. वैचारिक लढाई जिंकण्यासाठी आणि आपली संस्कृती जपण्यासाठी या सभेला उपस्थित राहणे, हे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे.

**अपर्णा जगताप**/पुणे

### पाईप गॅसचे दर कमी करावेत

पाईपद्वारे गॅसचा पुरवठा करा असे राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी गॅस कंपन्यांना आदेश दिले आहेत. पाईप गॅसपेक्षा सिलेंडरचा गॅस स्वस्त आहे. म्हणूनच गृह रचना सोसायट्या तसेच उद्योजक पाईप गॅस घेण्याचे टाळत आहेत. खरे तर पाईप गॅस सिलेंडरपेक्षा बराच स्वस्त मिळणे गरजेचे आहे. पाईप गॅसमध्ये सिलेंडर भरण्याचा, वाहतुकीचा, वितरक नेमण्याचा आणि त्याचे कमिशन, ग्राहकाचे घरी नेऊन सिलेंडर देण्याचा तसेच ग्राहकाला अनामत रक्कम आदी खर्च करावा लागत नाही. शासनाने गॅस कंपन्यांना पाईप गॅस स्वस्तात उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे ९८८१४७३५८०

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# पंढरपुरात कोट्यावधी रुपयांच्या मशिनरी धुळखात

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धुळीचे साम्राज्य

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.३१ मार्च-**

पंढरपूर शहरामध्ये स्वच्छता राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने कोट्यांवधी रुपये खर्च करून स्वच्छतेसाठी विविध मशिनरी उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु नगरपालिका प्रशासनाच्या वतीने कोट्यांवधी रुपयांच्या मशिनरी धूळ खात पडून असल्याचे निदर्शनास विक्रम शिरसट यांनी आणून दिले आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे पंढरपुरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे, ज्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. कोट्यावधी रुपये खर्च करून आणलेल्या मशीनरी धुळखात पडल्या आहेत, ज्यामुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विक्रम शिरसाट यांच्या वतीने या मुद्द्यावर स्लीपर मशीनला मास्क बांधून गांधीगिरी आंदोलन करण्यात आले आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करू नये, अशी मागणी केली आहे. तसेच





### यावेळी उपस्थित केलेले प्रश्न

पंढरपूरच्या स्वच्छतेसाठी प्रशासन काय उपाययोजना करत आहे? पंढरपूरच्या रस्त्यांची मरम्मत कधी होणार आहे? पंढरपूरच्या धार्मिक स्थळांच्या सुव्यवस्थेसाठी कोणते उपाययोजना आहेत?तसेच शहरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे आहेत. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करू नये, अशी मागणी केली आहे.

### पंढरपूरच्या समस्येचे मुख्य मुद्दे

* धुळीचे साम्राज्य : शहरातील रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. * खड्डे: रस्त्यांवर मोठमोठे खड्डे आहेत. * मशीनरी धुळखात : कोट्यावधी रुपयांच्या मशीनरी धुळखात आहेत.

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर आणि चंद्रभागा नदी यांच्या आसपासच्या क्षेत्रात स्वच्छता आणि सुव्यवस्था राखण्याची गरज आहे. पंढरपूरचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेता, प्रशासनाने याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. यावेळी. समाजसेवक शंकर सुरवसे समाजसेवक पिंटू शिंदे,अमर घाटे अफजल सय्यद गजेंद्र परदेशी आधी उपस्थित होते.

# टीजेएसबी सहकारी बँकेचा २५ हजार कोटींचा टप्पा पार

## देशातील चौथ्या क्रमांकाच्या सहकारी बँकेचे स्थान अधिक मजबूत

**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि. ३१ मार्च-**

देशातील चौथ्या क्रमांकाची सहकारी बँक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडने २५ हजार कोटींपेक्षा अधिक व्यवसायाचा महत्त्वपूर्ण टप्पा यशस्वीरित्या पार केला आहे. या यशामुळे बँकेच्या चौफेर विस्ताराच्या प्रवासाला आणि आर्थिक स्थैर्याला अधिक बळकटी प्राप्त झाली आहे.

सन १९७२ मध्ये स्थापन झालेल्या या बँकेने सहकारी क्षेत्रातील विश्वासनीय वित्तीय संस्था म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे. सध्या बँकेचे सात राज्यांमध्ये १६५ शाखांचे विस्तृत जाळे असून, रिटेल, एमएसएमई आणि कॉपरिट ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करत बँक ग्राहकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सेवा पुरवत आहे. २५ हजार कोटींचा महत्त्वपूर्ण टप्पा बँकेने सुयोग्य आर्थिक व्यवस्थापन आणि ग्राहक केंद्रित बँकिंग सेवांना दिलेले प्राधान्य यामुळे गाठला आहे.

बँकेच्या विस्ताराच्या वाटचालीत अध्यक्ष शरद गांगल आणि व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वासोबतच संचालक मंडळ आणि बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले आहे. बँक आपल्या ग्राहकांचा सातत्यपूर्ण विश्वास आणि सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करत आहे. तसेच या यशात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या समर्पणाची आणि योगदानाची विशेष दखल घेत आहे. २५ हजार कोटींच्या या उल्लेखनीय टप्प्यानंतर बँक भौगोलिक विस्तार वाढविणे, डिजिटल सेवा अधिक सक्षम करणे आणि सर्व ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा देण्यावर भर देऊन पुढील वाटचाल करणार असल्याचे बँकेने म्हटले आहे.

## महत्वाचे...



### राज्यशास्त्राचे धडे घेऊन विद्यार्थ्यांनी विकासात योगदान द्यावे : महापौर कोंड्याल

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा या उद्देशाने छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, कला व वाणिज्य, सोलापूर येथील राज्यशास्त्र विभागामार्फत बी.ए. व एम.ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेचे कामकाज पाहिले. राज्यशास्त्राचे धडे घेतले. सोलापूर महापालिकेची अंदाजपत्रकीय सभा महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेचे कामकाज या विद्यार्थ्यांनी पाहिले. प्रारंभी महापौर विनायक कोंड्याल यांचा राज्यशास्त्र विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महापौर कोंड्याल त्यांनी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय प्रक्रियेचे महत्त्व, शहर विकासातील प्राधान्यक्रम तसेच लोकप्रतिनिधींची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. राज्यशास्त्राचे धडे घेऊन शहर विकासासाठी विद्यार्थ्यांनी योगदान देण्याचे आवाहन केले. यावेळी सोलापूर महानगरपालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वाल्मिकी कीर्तीकर, प्रा.नवनाथ कुचेकर यांनी विशेष मार्गदर्शन केले.




### एन.के. किड्स स्कूलचा निरोप समारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

राजेश्वरी नगर येथील एन.के. किड्स स्कूलचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात, पण तितक्याच भावनिक वातावरणात पार पडला. लहानग्यांच्या निरोपाच्या क्षणी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांचे डोळे पाणावलेले दिसत होते.या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या प्रसिद्ध निवेदिका श्वेता हुल्ले यांनी आपल्या मनोगतातून पालकांना महत्त्वाचा संदेश दिला. लहान मुलांना मोबाईलपासून दूर ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. मोबाईलचा अतिरेक त्यांच्या नाजूक डोळ्यांवर विपरीत परिणाम करतो, असे सांगत त्यांनी पालकांना सजग राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इरा क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन सुरेश नारायणकर होते. त्यांनी आपल्या भाषणात बँकेच्या 'विद्या धन' योजनेची माहिती देत लहानपणापासून बचतीची सवय कशी लावावी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हेड शिक्षिका दिपाली कुलकर्णी, अश्विनी सिंघम, पुनम कळसाईत, सेविका संगीता हेगडकर व सुरेखा शिंदे यांनी परिश्रम घेतले.



### झेडपीचे कार्यकारी अभियंता धनशेट्टी सेवानिवृत्त

**सोलापूर, दि.३१ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांना सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा सन्मान जिल्हा परिषदचे अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, कृषी व पशुसंवर्धन विभागाचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य अतुल पवार, जिल्हा परिषद सदस्य अजिनाथ देशमुख, नेताजी खंडागळे उपस्थित होते. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी धनशेट्टी यांचे कार्याचा गौरव करून त्यांनी उत्तर सोलापूर तालुक्यात केलेले कामाचा गौरव केला. हातात घेतलेले काम तडीस नेणारा अधिकारी म्हणून संजय धनशेट्टी यांचे कार्याचा गौरव केला. सूत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे व जिल्हा परिषद सदस्य अजिनाथ देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत वरिष्ठ सहाय्यक रणजित घोडके यांनी केले. योवळी विद्याधर राठोड, अजित वाघमारे, वाहेकर, नितीन करवते, वसीम शेख, बेंबळगी, प्रसाद काटकर, दत्तात्रय सोनवणे, प्रकाश शेंडगे, अमित सलगर, सदाशिव पुजारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी वरिष्ठ सहाय्यक रणजित घोडके, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, योगेश कुंभार, अमित, बापू शेंडगे, ओम बुरसे यांनी प्रयत्न केले.

#### सीईओ कुलदीप जंगम यांचा गौरव

सोलापूर जिल्हा परिषदेत उत्कृष्ठ काम करत राज्यात प्रथम क्रमांक पटाकविले बद्दल जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांचे हस्ते सीईओ कुलदीप जंगम यांचा सत्कार करण्यात आला. १०० पैकी ८० गुण मिळवून जिल्हा परिषदेची मान राज्यात उंचावण्याचे काम त्यांनी केले आहे.

# महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता व गुणवत्तेला महत्त्व द्या

## माजी प्रमुख जिल्हा न्यायाधीश डॉ. शब्बीर औटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता व गुणवत्तेला महत्त्व द्या, असे प्रतिपादन माजी प्रमुख जिल्हा न्यायाधीश डॉ. शब्बीर औटी यांनी केले.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नेमलेल्या न्यायाधीश पथकाने महानगरपालिका कॅम्प परिसरातील आठ शाळांची तपासणी करून मुख्याध्यापक व शिक्षकांना गुणवत्तावाढीसंदर्भात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. डॉ. औटी यांनी वर्गांना प्रत्यक्ष भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला व वाचन करून घेतले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने वाचन सादर केल्याबद्दल त्यांनी त्यांचे कौतुक केले. विद्यार्थी केंद्रित अध्यापन, शिस्तबद्ध शालेय व्यवस्थापन आणि गुणवत्तेला प्राधान्य देण्याचे त्यांनी विशेष आवाहन केले. या भेटीदरम्यान कॅम्प परिसरातील



आठ शाळांच्या मुख्याध्यापक उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव कादर शेख यांनी शिक्षकांशी संवाद साधताना या समिती भेटीतपथकात पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत पोलीस उपनिरीक्षक अफरीन शेख, जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत तहसीलदार जयश्री पंचे, कार्यकारी अभियंता कारले मार्फतउप अभियंता गायकवाड उपस्थित होते. तसेच उत्तर सोलापूर तालुक्याचे शिक्षण विस्ताराधिकारी बापूराव जमादार उपस्थित होते.

# डी.आर. श्रीराम स्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, डी.आर. श्रीराम इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पूर्व प्राथमिक,प्राथमिक व माध्यमिक विभाग वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ अतिशय उत्साहात पार पडला.

प्रशालेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षभरामध्ये Red Crown, White Knite , Black wadiyar, Gold Lion ग्रुपमध्ये मासिक उपक्रम जून - कथाकथन स्पर्धा, जुलै - भाषण स्पर्धा, ऑगस्ट - घोषवाक्य लेखन स्पर्धा, सप्टेंबर - राखी बनवण्याची स्पर्धा, ऑक्टोबर - चित्रकला आणि रंगकाम, नोव्हेंबर - हिंदी कथाकथन स्पर्धा, डिसेंबर - शुभेच्छापत्र बनवणे, जानेवारी - भाषण स्पर्धा, फेब्रुवारी - मराठी भाषण, मार्च - आत्मपरिचयस्पर्धा. विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी ७०० च्या वर विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक व ट्रॉफी देण्यात



आल्या. White Knite या ग्रुपने ६६८ गुण मिळवून पटकावले.

याप्रसंगी पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी, पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त संगीता इंदापुरे, मल्लिकार्जुन सरगम, प्रभाकर आरकाल, दिनेश यनम, विजयकुमार गुल्लापल्ली प्रशालेच्या मुख्याध्यापिका अजिता पिल्लाई उपमुख्याध्यापिका प्राथमिक विभाग रसिका किल्लेदार उपमुख्याध्यापक शौरप्पा पुजारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख आसिफा मुल्ला व नम्रता नल्ला सर्व शिक्षक व क्रीडा शिक्षक नबीलाल पटेल, जिशान शेख यांचे सहकार्य लाभले.

# पुणे विभागाचा दबदबा; २४ सुवर्णासह चॅम्पियन ट्रॉफी पटकावली

## पहिल्या राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचा बक्षीस वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**



महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य व सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिला राज्यस्तरीय 'चाचा नेहरू बाल महोत्सव २०२५-२६' मध्ये पुणे विभागाने २४ सुवर्ण पदकांची कमाई करत प्रथम क्रमांक पटकावला व मानाची चॅम्पियन ट्रॉफी आपल्या नावावर केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. समारोप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले होते. प्रमुख उपस्थितीत विभागीय उपआयुक्त संजय माने (पुणे विभाग), पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शाहीन शेख, सिंहगडचे मुख्य निबंधक डॉ. डी. आय. नवले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विजय खोमणे, अविनाश मगर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच बाल कल्याण समिती सदस्य सुवर्णा कोकरे, दीपक ढेपे, अमृत सरडे उपस्थित होते.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी किरण सूर्यवंशी, बालाजी अल्लडवाड, समाधान नागणे, विशाल भोसले, अभिजित मोलाने, राहुल चव्हाण, सुवर्णा जाधव, आस्मा आत्तार, प्रतिभा साखरे, भुजंग चिंताकोटे, अक्षय साळुंखे, अच्युत शेवाळे, युवराज गाढवे, शेखर बंडगर, पद्माकर सुरुषे, मिलिंद घाडगे, मारुती ताटे, उज्वला कापसे, पिंकी वावरे, सुप्रिया बेलोशे, सचिन चव्हाण, अमोल जमदाडे, मिथुन पवार, आर. आय. विजापूरे यांचे सहकार्य लाभले.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात धावणे, लांब उडी, रिले, कबड्डी, खो-खो यांसारख्या क्रीडा स्पर्धांसह चित्रकला, निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर आणि समूह नृत्य अशा सांस्कृतिक स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. राज्यभरातून आलेल्या बालकांनी आपल्या क्रीडा व कलागुणांचे प्रभावी प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली. सूत्रसंचालन गौरी जिंदे व रेश्मा गायकवाड यांनी केले.

# बार्शीत किरकोळ वादातून तरुणावर हल्ला

## पती-पत्नीविरुद्ध मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मार्च-**

शहरातील देशमुख प्लॉट परिसरात किरकोळ कारणावरुन झालेल्या वादातून एका २० वर्षीय तरुणावर कुऱ्हाड व दांडक्याने हल्ला केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी संबंधित पती-पत्नीविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, प्रेम गणेश राऊत (वय २०), रा. देशमुख प्लॉट, सरकारी गोदामाजवळ, उपळाई रोड, बार्शी हा आपल्या आजीसमवेत राहत असून मजुरी करुन उदरनिर्वाह करतो. दि. ३० मार्च रोजी सकाळी घरासमोर आलेल्या एका फिरत्या कुत्र्याने त्याची चप्पल उचलून नेण्याचा प्रयत्न केल्याने त्याने त्या कुत्र्याला दगड मारुन हाकलून लावले. यावरचन गैरसमज निर्माण झाला. त्या दिवशी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास, शेजारी राहणारे बाळू शंकर भालेराव व त्यांची पत्नी अश्विनी बाळू भालेराव हे दोघे प्रेम राऊत यांच्या घरासमोर आले. त्यांनी सकाळच्या घटनेचा राग मनात धरुन शिवीगाळ करत वाद घालत त्याच्यावर हल्ला केला,

तक्रारीनुसार, बाळू भालेराव यांनी हातातील लोखंडी कुऱ्हाडीने प्रेम राऊत यांच्या डाव्या पायाच्या पिंडरीवर वार केला, तर अश्विनी भालेराव यांनी लाकडी दांडक्याने त्यांच्या डाव्या हाताच्या दंडावर व उजव्या पायाच्या मांडीवर मारहाण करुन जखमी केले. हल्लयादरम्यान दोघांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीने नमूद केले आहे. प्रेम राऊत यांच्या आरडाओरडीनंतर शेजारील नागरिक युवराज कांबळे, सचिन राऊत व चंद्रकांत राऊत यांनी घटनास्थळी धाव घेऊन मध्यस्थी करत भांडण सोडविले. जखमी झालेल्या प्रेम राऊत यांना त्यांचा भाऊ सुरज राऊत यांनी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे दाखल केले होते. घटनेबाबत प्रेम राऊत यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन बाळू शंकर भालेराव व अश्विनी बाळू भालेराव, रा. देशमुख प्लॉट, उपळाई रोड, बार्शी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

Classifieds

**पाहिजेत**

**पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन, ऑफलाईन काम करून अधिक इन्कम मिळवा. संधी सार्वांसाठी. प्रियांका मॅडम मो. 9226340650**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**जाहीर नोटीस**

ने.ता. ०४/०५/२६
ॲड. संपदा एस. बागल
रा. कुर्डूवाडी, ता. माढा
नि.न. ०७
दि. कि. अर्ज नंबर १५/२०२६

**माढे येथील मे. सि. जज्ञ सि. डि. सो. यांचे कोर्टात**

(मा. श्री. ए. डी. कुलकर्णी साहेब कोर्ट)

**तन्मय रविंद्र जाधव वगैरे** -- **अर्जदार**
**विरुद्ध**
**कोणी नाही** -- **सा. वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यानी मयत रविंद्र ज्ञानदेव जाधव, रा. मंगळवार पेठ, माढा, ता. माढा यांचे वारस आहोत म्हणून या मे. कोर्टात वारस सर्टिफिकेट मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, सदर रविंद्र ज्ञानदेव जाधव, रा. मंगळवार पेठ, माढा, ता. माढा यांचे अर्जदार वारस नाहीत अगर इतर वारस आहेत वगैरे बाबत कोणाचे काही म्हणणे तक्रार असलेस तसे या कोर्टात हजर राहून नेमलेल्या तारखेस आपले हरकती नोंदविणेत यावेत व त्यास अनुसरुन योग्य तो पुरावा द्यावा. केसची चौकशीकामी प्रत्येक तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे कोणी हजर न राहिलेस कोणाचीही तक्रार नाही असे समजून याकामी पुढील योग्य तो निर्णय दिला जाईल.

कळावे
ही जाहीर नोटीस दिली तारीख ३१/०३/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**माढा सिव्हील कोर्ट**
**वरिष्ठ स्तर माढा**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी बार्शी म्यू. पल येथील जमीन गट नं. १२१२/२ क्षेत्र ०.१३ आर, (१३००० चौ. फुट) आकार ०० रू. १० पै. यासी चतुःसिमा पुर्वेस- जुना गट नंबर १२०४, नवीन गट नं. १२१०, दक्षिणेस - गट नं. १२१२/३, पश्चिमेस - सदर गट नंबरपैकी राजेंद्र रामलिंग शेटे यांचे वाटणीचे क्षेत्र, उत्तरेस- ३० फुट रूंदीचा अंतर्गत रस्ता, येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक वर्णनाची जमीन, अशा वर्णनाची सौ. चंद्रमाला शिवाजी बाबर, रा. भाळवणी, ता. पंढरपूर यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदरील जमीन आमचे अशिल दादासाहेब विठ्ठल फुंदे, रा. खडकोणी, ता. बार्शी यांना त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेवरून सदरील जमीनीचे खरेदीखताचा ठराव आमचे अशिल यांच्या बरोबर झाला असून त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदरील वर्णनाची मिळकत त्यांनी व्यवहार करतेवेळी सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचा विश्वास दिला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरील मिळकतीबाबत इतर कोणाचे गहाण, दान, हस्तांतरण इ. स्वरूपाचा व्यवहार असेल तर सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसाचे आंत आमचे अशिलास किंवा खालील पत्यावर तक्रार नोंदवावी मुदतीमध्ये कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली.

ता. ३१/०३/२०२६

**सही/-**
**अशिल**
**दादासाहेब विठ्ठल फुंदे**

**सही/-**
**ॲड.श्री. एस. एस. ठोंबरे**
फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर मो.नं. ९३७११६२४२५
**दादासाहेब विठ्ठल फुंदे**
रा. खडकोणी, ता. बार्शी, जि. सोलापूर मो.नं. ९९२१८९४९३२

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली ता. १७/०४/२०२६
दि.कि.अ.नं. ०५/२०२६

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठस्तर यांचे न्यायालयात**

**राजकुमार भुजंगराव यादव,** वय ४४ वर्षे, धंदा- नोकरी, रा. रुम नं.८ विद्यासागर, बिल्डींगनगर, संकल्प गार्डनजवळ, तानाजीनगर, चिंचवडगांव, पुणे ४११०३३ -- **अर्जदार**
**विरुध्द**
कोणी नाही -- **सा.वाला**

ज्याअर्थी अर्ज कलम १ मधील जागेत अर्जदाराची चुलती कुसूम उर्फ कुसूमबाई सर्जेराव यादव हिचा १/३ हिस्सा असून सदर अर्जदाराची चुलती कुसूम उर्फ कुसूमबाई सर्जेराव यादव ही दि. १७/०४/२०१९ रोजी मौजे नांदणी ता. बार्शी येथे मयत झालेली आहे तसेच अर्जदाराचे चुलते सर्जेराव बाबाजी यादव हे दि. २१/०१/२०१६ रोजी मौजे नांदणी, ता. बार्शी येथे मयत झाले आहेत यातील अर्जदाराचे सदर चुलते व चुलती यांना स्वतःचे असे कोणतेही अपत्य नसलेने यातील अर्जदार हाच त्यांचा सांभाळ, देखभाल, सेवाशुश्रुषा करत होता व पुढे ते मयत झालेनंतर मृत्यूपश्चातचे सर्व विधी देखील अर्जदार यानेच केलेले आहेत यातील अर्जदार हाच मयत कुसूम उर्फ कुसूमबाई सर्जेराव यादव यांचा कायदेशीर वारस असलेने सदर मिळकतीस त्याचे नावाची नोंद व्हावी म्हणून संबंधीत ग्रामपंचायतीचे अधिकारी यांना विनंती केली असता त्यांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारानी सदरचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख १७/०४/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीखः २१/०३/२०२६

**सही/-**
**वरिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी**
**क. स्तर, बार्शी**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**



## महत्त्वाचे

### खेळाडूंना त्यांच्या भूमिकांची जाणीव : कृणाल



**बंगळुरू** : गेल्या वर्षीच्या तुलनेत संघात स्थिरता आली आहे आणि या हंगामात खेळाडूंना त्यांच्या भूमिकांची चांगली जाणीव आहे, असा विश्वास रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा कृणाल पांड्या याने व्यक्त केला. आरसीबीने २०२५ मध्ये १८ वर्षांत प्रथमच इंडियन प्रीमियर लीगचे विजेतेपद पटकावले आणि पंजाब किंग्सविरुद्धच्या अंतिम सामन्यात चार षटकांत १७ धावा देऊन दोन बळी घेत कृणाल सामनावीर ठरला. आरसीबीने हा सामना सहा धावांनी जिंकला. संघाच्या प्रसिद्धी पत्रकात कृणाल म्हणाला, माझा विश्वास आहे की यावर्षी अधिक स्थिरता आहे. गेल्या वर्षी संघ नवीन होता आणि प्रत्येक जण एकमेकांना समजून घेत होता. यावर्षी खेळाडूंना त्यांच्या भूमिका, एकमेकांची बलस्थाने आणि कमकुवतपणा खूप चांगल्या प्रकारे माहीत आहेत. जेव्हा मी मोठ्या सामन्यात खेळतो, तेव्हा मला वाटते की जर देवाने तुम्हाला येथे आणले असेल, तर त्यामागे काहीतरी कारण असले पाहिजे. आणि माझा विश्वास आहे की हे मोठे प्रसंग माझ्यासाठीच बनले आहेत. मला दडपण जाणवते, पण शांत राहून गरजेनुसार कसे खेळायचे याचा मी विचार करतो.

### संजय बांगरकडून वैभव सूर्यवंशीचे कौतुक

**नवी दिल्ली** : आयपीएल २०२६ च्या पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने ज्या प्रकारे जागतिक दर्जाच्या गोलंदाजांवर दबाव आणला, ते त्याच्या अपवादात्मक प्रतिभेचे आणि निर्भय खेळाचे द्योतक आहे, या शब्दांत भारताचे माजी फलंदाजी प्रशिक्षक संजय बांगर यांनी त्याचे कौतुक केले. गेल्या वर्षी आयपीएलमध्ये शतक झळकावणारा सर्वांत तरुण फलंदाज ठरलेल्या सूर्यवंशीने मॅट हेन्री आणि नूर अहमदसारख्या गोलंदाजांना फोडून काढले. बांगर यांनी सांगितले की, वैभव सूर्यवंशी एक वेगळाच खेळाडू आहे. त्याने गोलंदाजीच्या आक्रमणाची अक्षरशः चिरफाड केली. त्याने मॅट हेन्री आणि खलील अहमदसारख्या गोलंदाजांवर दबाव आणला, तसेच नूर अहमदसारख्या गोलंदाजांसाठीही अडचणी निर्माण केल्या. बांगर म्हणाले, वयाच्या पंधराव्या वर्षी त्याने आपल्या निर्भय फलंदाजीने चार सर्वोत्तम गोलंदाजांवर दबाव आणला. हे त्याचे वैशिष्ट्य आहे आणि मला ते खूप आवडते. त्याने ज्या प्रकारे या हंगामाची सुरुवात केली आहे, ती त्याच्यासाठी संस्मरणीय असेल.

### तुमच्या मर्यादा कोणालाही ठरवू देऊ नका : शीतल देवी

**नवी दिल्ली** : जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या आणि २०२५ सालची सर्वोत्कृष्ट पॅरा तिरंदाज म्हणून गौरविण्यात आलेल्या शीतल देवी यांचा विश्वास आहे की, हा सन्मान अनेक वर्षांची मेहनत, अपयश आणि मौन त्यागाचे प्रतीक आहे. तुमच्या मर्यादा कोणालाही ठरवू देऊ नका असे ती म्हणाली. जागतिक तिरंदाजी संघटनेने सोमवारी जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या पॅरा तिरंदाज शीतल देवीला २०२५ सालची सर्वोत्कृष्ट पॅरा तिरंदाज म्हणून घोषित केले. ज्यामुळे तिच्या विलक्षण कामगिरीत आणखी एका यशाचा मानाचा तुरा रोवला गेला आहे. बँकॉक येथे एका स्पर्धेत सहभागी झालेल्या शीतल देवीने सांगितले, हे खूपच अद्भुत आहे. जगातील सर्वोत्कृष्ट पॅरा तिरंदाजांमध्ये नामांकन मिळणे हीच एक विशेष गोष्ट होती आणि हा पुरस्कार जिंकणे अविस्मरणीय आणि खूपच खास आहे.

### अभियंत्याच्या निधनाबद्दल आयपीएलकडून शोक

**नवी दिल्ली** : इंडियन प्रीमियर लीगच्या नियामक परिषदेने मंगळवारी, लीगच्या २०२६ च्या हंगामासाठी बीसीसीआयसोबत काम करणारे ब्रिटिश प्रसारण अभियंता जॉन विल्यम लँगफोर्ड यांच्या अकाली निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. नियामक परिषदेने शोकाकुल कुटुंबीयांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासनही दिले. लँगफोर्ड ७६ वर्षांचे होते. सोमवारी सकाळी दक्षिण मुंबईतील एका हॉटेलमधील त्यांच्या खोलीत ते बेशुद्धावस्थेत आढळले. हॉटेल व्यवस्थापनाने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. एका अधिकाऱ्याने सांगितले की, रुग्णालयात दाखल होताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

### मापारा, याज्ञिक आणि दांडेकर यांचा सलग चौथा विजय

**मुंबई** : पलाश मापारा, प्रतीक याज्ञिक आणि अमेया दांडेकर यांनी मंगळवारी येथे झालेल्या ऑल इंडिया चेस मास्टर्सच्या तिसऱ्या हंगामाच्या चौथ्या फेरीत आपला सलग चौथा विजय नोंदवला. ऑल इंडिया चेस मास्टर्स ही मुंबई चेस सेंटरद्वारे आयोजित एक फिडे-मानांकित क्लासिकल बुद्धिबळ स्पर्धा आहे. मापाराने ध्रुव मुठेचा, तर याज्ञिकने आदित्य सिद्धार्थचा पराभव केला. अमेया दांडेकरने विराज राठीला हरवून आपला सलग चौथा विजय नोंदवला.

# चहल, वैशाखची भेदक गोलंदाजी

## पंजाबने गुजरातला १६२ धावांवर रोखले ● शेवटच्या ५ षटकांत केवळ ३४ धावा



शुभमन गिलला बाद केल्यानंतर यजुवेंद्र चहलचे अभिनंदन करताना खेळाडू

**◆ मुल्लानपूर, ३१ मार्च**

आयपीएल २०२६ च्या चौथ्या सामन्यात पंजाब किंग्सने गुजरात टायटन्सला २० षटकांत ६ बाद १६२ धावांवर रोखले. गुजरात टायटन्सला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखण्यात यजुवेंद्र चहल आणि विजयकुमार वैशाखने मोलाची भूमिका बजावली. नाणेफेक पंजाब किंग्जने जिंकला आणि प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यांचा निर्णय खरा ठरवत पंजाबने गुजरात टायटन्सला मोठी धावसंख्या काढण्यापासून रोखले. शेवटच्या ५ षटकांत केवळ ३४ धावा झाल्या. विजयकुमार वैशाखनेही पंजाबसाठी उत्कृष्ट गोलंदाजी करत ४ षटकांत ३४ धावा देऊन ३ बळी घेतले. गुजरातकडून कोणालाही अर्धशतक काढला आले नाही.

गुजरातने चांगली सुरुवात केली होती. साई सुदर्शन आणि शुभमन गिल यांनी पहिल्या गड्यासाठी ३७ धावा जोडल्या. सुदर्शन ११ चेंडूंमध्ये दोन चौकारांसह १३ धावा करून बाद झाला. त्याला मार्को जॅनसेनने बाद केले. त्यानंतर गिल आणि जोस बटलर यांनी ४६ धावांची भागीदारी केली. कर्णधार गिल १० व्या षटकात बाद झाला, तेव्हा धावसंख्या ८३ होती. त्याने २७ चेंडूंमध्ये सहा चौकारांसह ३९ धावा केल्या. गिलला चहलने बाद केले.

८३ धावांवर दोन गडी बाद झाल्यावर ग्लेन फिलिप्स फलंदाजीसाठी आला. फिलिप्स आणि बटलर यांनी डाव सावरला. दोघेही स्थिरावले होते. १४ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार मारण्याच्या प्रयत्नात फिलिप्स झेलबाद झाला. त्याने १७ चेंडूंमध्ये एक चौकार आणि एक षटकार मारून २५ धावा केल्या. त्यानंतर, धावसंख्या १२९ असताना, बटलरही षटकार मारण्याच्या प्रयत्नात तंबूत परतला. बटलरने ३३ चेंडूंमध्ये तीन चौकार आणि दोन षटकारांसह ३८ धावा केल्या.

फिलिप्स आणि बटलर बाद झाल्यानंतर धावगती मोठ्या प्रमाणात मंदावली आणि त्यांचे मोठी धावसंख्या उभारण्याचे स्वप्न भंगले. पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला वॉशिंग्टन सुंदर दोन चौकारांच्या मदतीने १६ चेंडूंमध्ये १८ धावा करून बाद झाला. शाहरुख खानलाही जलद धावा करता आल्या नाहीत आणि तो सहा चेंडूंमध्ये चार धावा करून बाद झाला. राहुल तेवतिया १० चेंडूंमध्ये ११ धावा करून नाबाद राहिला.

पंजाबच्या गोलंदाजांनी मुल्लानपूरच्या संथ खेळपट्टीचा चांगला फायदा घेतला. मार्को जॅनसेनने आपल्या चार षटकांत केवळ २० धावा दिल्या आणि एक बळी घेतला. चहलने चार षटकांत २८ धावा देऊन दोन बळी घेतले. वैशाखने चार षटकांत ३४ धावा दिल्या. अर्शदीप सिंग थोडा महागडा ठरला, त्याने आपल्या चार षटकांत ४२ धावा दिल्या. अर्शदीपने ११ चेंडूंचे शेवटचे षटक टाकले. ◄(वृत्तसंस्था)

# लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स सामना आज

## ऋषभ पंतवर चांगल्या कामगिरीचा दबाव

**◆ लखनौ, ३१ मार्च**

आयपीएलच्या यावर्षीच्या हंगामात बुधवारी लखनौ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना रंगणार आहे. या सामन्यात लखनौचा कर्णधार ऋषभ पंतवर आपली कामगिरी सुधारण्याचा प्रचंड दबाव असणार आहे.

गेल्या वर्षी, तडाखेबंद फलंदाज आणि यष्टिरक्षक ऋषभ पंत लखनौ संघाचा कर्णधार म्हणून आपल्या पहिल्याच वर्षात अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरला होता. प्रमुख खेळाडूंना, विशेषतः वेगवान गोलंदाजांना झालेल्या दुखापतींमुळे त्याच्या अडचणी आणखी वाढल्या. या वर्षी, लखनौकडे पूर्णपणे तंदुरुस्त संघ आहे आणि मोहम्मद शमी व नरिच नॉर्टजेसारख्या अनुभवी गोलंदाजांच्या दाखल होण्याने गोलंदाजी अधिक मजबूत झाली आहे.

वारंवार दुखापतग्रस्त होणारा वेगवान गोलंदाज मयंक यादवने गेल्या वर्षभरात आपल्या तंदुरुस्तीवर खूप मेहनत घेतली आहे आणि लखनौला आशा आहे की तो



ऋषभ पंत



अक्षर पटेल

संघाच्या विश्वासाला पात्र ठरेल. वेगवान गोलंदाज मोहसिन खान दुखापतीतून पुनरागमन करत आहे, तर प्रिन्स यादवनेही आपल्या मध्यमगती गोलंदाजीने प्रभावित केले आहे. फिरकी गोलंदाज दिग्वेश सिंग राठीने आपल्या पहिल्याच वर्षात छाप पाडली होती आणि तो त्याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न करेल.

लखनौची फलंदाजी त्यांच्या गोलंदाजीपेक्षा चांगली दिसते. मिचेल मार्श आणि एडन मार्कराम ही आयपीएलमधील सर्वांत धोकादायक सलामीच्या जोड्यांपैकी एक आहे. गेल्या हंगामात चौथ्या क्रमांकावर चांगली कामगिरी करू न शकलेल्या पंतने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावले. तो तिसऱ्या क्रमांकावरच खेळेल, तर निकोलस पूरन चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करेल.

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ** : एकाना क्रिकेट स्टेडियम, लखनौ
**वेळ** : सायं. ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

दिल्ली कॅपिटल्सने गेल्या हंगामात सात सलामीच्या जोड्या आजमावल्या, पण यश आले नाही. या हंगामात, ते वरच्या फळीत स्थैर्याची अपेक्षा करतील. केएल राहुल डावाची सुरुवात करेल, पण त्याच्यासोबत कोण खेळेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

मधली फळी मजबूत करण्यासाठी डेव्हिड मिलरला संघात स्थान देण्यात आले आहे, तर दक्षिण आफ्रिकेचा ट्रिस्टन स्टब्सही संघात आहे. दुखापतीमुळे मिचेल स्टार्क पहिला सामना खेळू शकणार नाही, पण दिल्लीचे गोलंदाजी आक्रमण मजबूत आहे. त्यांच्याकडे कर्णधार अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांच्या रूपात दोन सामनावीर आहेत. तसेच, टी-२० विश्वचषकात उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेला लुंगी एनगिडीही संघात आहे. ◄(वृत्तसंस्था)

# बीसीसीआयच्या मागणीला गांगुलीचा पाठिंबा

## सर्वत्र कसोटी सामने खेळवावे

**◆ कोलकाता, ३१ मार्च**

ईडन गार्डन्सवर अधिक कसोटी सामने खेळवले जावेत, पण त्याचबरोबर गुवाहाटी आणि रांचीसारख्या मैदानांवर पारंपरिक स्वरूपाचे सामने खेळले जात असल्याचा आनंद भारताचा माजी कर्णधार आणि क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालचा अध्यक्ष सौरव गांगुलीने व्यक्त केला.

गेल्या आठवड्यात, बीसीसीआयने भारतीय क्रिकेट संघाच्या २०२६-२७ च्या देशांतर्गत हंगामाचे वेळापत्रक जाहीर केले. त्यात ऑस्ट्रेलियाविरुद्धचे बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी कसोटी सामने कोलकाता आणि मुंबईसारख्या पारंपरिक मैदानांवर न खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे सामने २१ जानेवारी ते २५ फेब्रुवारी दरम्यान नागपूर, चेन्नई, गुवाहाटी, रांची आणि अहमदाबाद येथे खेळले जातील.



एका पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना गांगुली म्हणाला, ईडन गार्डन्सवर मोठे कसोटी सामने खेळले गेलेले पाहणे नेहमीच आनंददायी असते. सीएबीचा अध्यक्ष आणि एक माजी खेळाडू म्हणून, तिथे कसोटी सामने खेळले जावेत अशी माझी इच्छा आहे, पण आम्ही दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्याचे आयोजन केले होते. यानंतर, टी-२० विश्वचषकाचे सामने येथे झाले आणि आता आयपीएलचे सामनेही येथे आयोजित केले जात आहेत.

गांगुली म्हणाला, आम्हा सर्वांना ईडनवर आणखी सामने हवे आहेत, पण हे समजून घेणेही महत्त्वाचे आहे की सामने इतर मैदानांवरही आयोजित केले पाहिजेत.

गुवाहाटी नोव्हेंबर २०२५ मध्ये कसोटी केंद्र बनले आणि एका वर्षाच्या आत तिथे दुसरी कसोटी नियोजित आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर एक कसोटी सामना आयोजित करण्यात आला होता. वानखेडे स्टेडियमवर शेवटचा कसोटी सामना नोव्हेंबर २०२४ मध्ये खेळला गेला होता. बीसीसीआयच्या वेळापत्रकानुसार, झिम्बाब्वेविरुद्धचे एकदिवसीय सामने कोलकाता (३ जानेवारी २०२७) आणि मुंबई (९ जानेवारी २०२७) येथे होणार आहेत, तर दिल्लीत यावर्षी १३ डिसेंबर रोजी श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय सामना आयोजित केला जाईल.

या विषयावर पहिल्यांदाच बोलताना, गांगुली म्हणाला, संपूर्ण भारतात चांगले स्टेडियम्स आहेत. चेन्नई, गुवाहाटी आणि रांची येथे कसोटी सामने होत आहेत हे पाहून आनंद होतो. तेथील सुविधा खूप चांगल्या आहेत. भारताचे माजी फिरकीपटू व्यंकटपथी राजू म्हणाले, आमच्या काळात फक्त कोलकाता, कानपूर, चेन्नई, दिल्ली आणि मुंबई येथेच कसोटी सामने होत असत. त्याची एक वेगळीच मजा होती आणि मला वाटते की पुन्हा तसेच व्हायला हवे.

या प्रसंगी गांगुलीने सांगितले की, ईडन गार्डन्सवर २००१ च्या संघाच्या पुनर्मिलनाची योजना आखली जात आहे. आम्ही हा कार्यक्रम ईडन गार्डन्सवर आयोजित करणार आहोत. तो या महिन्याच्या सुरुवातीलाच होणार होता, पण सचिन तेंडुलकरच्या मुलाच्या लग्नामुळे त्याला विलंब झाला. ◄(वृत्तसंस्था)

# आयपीएल आणि ऑस्ट्रेलियामध्ये ग्रीनकडून मोठ्या अपेक्षा

## अँड्र्यू मॅकडोनाल्डचे मत

**◆ सिडनी, ३१ मार्च**

आयपीएल आणि ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये कॅमेरॉन ग्रीनकडून मोठ्या अपेक्षा असल्या तरी, या अष्टपैलू खेळाडूमध्ये या अपेक्षांमध्ये संतुलन साधण्याची आणि आपल्या कारकीर्दीला नवनवीन उंचीवर नेण्याची क्षमता आहे, असे मत ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक अँड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी मांडले.



मुंबई इंडियन्सविरुद्धच्या पहिल्या आयपीएल सामन्यात दुखापतग्रस्त ग्रीन गोलंदाजी करू न शकल्याबद्दल विचारले असता, कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणेने केलेल्या वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने नंतर सांगितले की, केकेआर संघ व्यवस्थापनाला त्याच्या दुखापतीची पूर्ण कल्पना होती आणि तो आणखी १०-१२ दिवस गोलंदाजी करू शकणार नाही.

मॅकडोनाल्ड यांनी सांगितले, आयपीएलमध्ये ग्रीनकडून मोठ्या अपेक्षा आहेत. ऑस्ट्रेलियन संघालाही त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. हे अयोग्य नाही, कारण अष्टपैलू खेळाडूंकडून नेहमीच अपेक्षा असतात. केकेआरने ग्रीनला २५ कोटी रुपयांना करारबद्ध केले. त्याला २० कोटी रुपयांना विकत घेण्यात आले, ज्यामुळे तो आयपीएलमधील सर्वांत महागडा परदेशी खेळाडू ठरला.

तो एक उत्कृष्ट खेळाडू आहे हे आम्हाला माहीत आहे. त्याला सर्व अपेक्षांमध्ये संतुलन साधावे लागेल, विशेषतः तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळताना हे महत्त्वाचे ठरते. हे कोणत्याही क्रिकेटपटूसाठी आव्हानात्मक असते, असे मॅकडोनाल्ड म्हणाले. ◄(वृत्तसंस्था)

# झारखंडच्या शिव कुमार, पृथ्वी ओराओनला सुवर्ण पदके

## खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धा




**◆ रायपूर, ३१ मार्च**

झारखंडचे धावपटू शिव कुमार सोरेन आणि पृथ्वी ओराओन यांनी मंगळवारी येथे आयोजित उद्घाटनपर खेलो इंडिया वनवासी खेळांमध्ये (केआयटीजी) अनुक्रमे पुरुष आणि महिलांच्या १०० मीटर शर्यतीत सुवर्णपदके जिंकली.

यजमान छत्तीसगडकडून सिद्धार्थ नागेशने गोळाफेकीत सुवर्णपदक आणि थाळीफेकीत रौप्यपदक जिंकले, तर तिलक बारसेलने पुरुषांच्या १०० मीटर शर्यतीत रौप्यपदक पटकावले.

शिव कुमार आणि पृथ्वी यांनी आपापल्या गटातील १०० मीटर शर्यतीत आपापल्या राज्यांसाठी सुवर्ण दुहेरी (दोन सुवर्णपदके) मिळवली. शिव कुमारने १०.५८ सेकंदांची वेळ नोंदवली, तर बारसेलने १०.८७ सेकंदांत रौप्यपदक जिंकले. ओडिशाच्या अतिश किंडोने (१०.९१ सेकंद) कांस्य पदक जिंकले.

महिलांच्या १०० मीटर अंतिम फेरीत, १६ वर्षीय पृथ्वीने १२.७३ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवून सुवर्ण पदक पटकावले. नागालँडच्या रुदुओल्हुनुओ बेल्हो (१२.९० सेकंद) आणि झारखंडच्या पुतुल बक्षी (१३.०३ सेकंद) यांनी अनुक्रमे रौप्य आणि कांस्य पदके जिंकली.

जगदलपूरमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे काल संध्याकाळचे ॲथलेटिक्स सत्र रद्द करण्यात आले, त्यामुळे आज सकाळचे सत्र व्यस्त होते, ज्यात सात अंतिम फेऱ्या पार पडल्या. १९ सुवर्ण, सात रौप्य आणि सात कांस्य पदकांसह कर्नाटक पदक तालिकेत पहिल्या स्थानावर कायम आहे, तर ओडिशा १३ सुवर्ण, आठ रौप्य आणि १५ कांस्य पदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे. ◄(वृत्तसंस्था)

# सब-ज्युनियर महिला राष्ट्रीय हॉकी चॅम्पियनशिपमध्ये २९ संघ

**◆ रांची, ३१ मार्च**

बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या १६व्या हॉकी इंडिया सब-ज्युनियर महिला राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये २९ संघ तीन गटांमध्ये सहभागी होतील.

ही स्पर्धा १२ एप्रिलपर्यंत होणार असून आणि संघ अ, ब आणि क या गटांमध्ये सहभागी होतील. अ गटातील संघ चॅम्पियनशिपच्या विजेतेपदासाठी खेळतील, तर ब गटातील अव्वल दोन संघ आणि क गटातील विजेत्या संघाला बढती मिळेल. अ आणि ब गटातील शेवटचे दोन संघ पुढील वर्षी अनुक्रमे ब आणि क गटात खाली ढकलले जातील.

अ गटातील बारा संघांना चार गटांमध्ये विभागण्यात आले आहे आणि बाद फेरी ९ एप्रिल रोजी सुरू होईल. अ गटात यजमान हॉकी झारखंड, बिहार आणि महाराष्ट्र यांचा समावेश आहे, तर ब गटात ओडिशा, हॉकी पंजाब आणि हॉकी आंध्र प्रदेश यांचा समावेश आहे. क गटात हॉकी हरयाणा, हॉकी मध्य प्रदेश आणि हॉकी मणिपूर यांचा समावेश आहे. सर्व संघांना विजयासाठी तीन गुण आणि बरोबरीसाठी एक गुण मिळेल. ◄(वृत्तसंस्था)

# ॲडव्होकेट ब्लॅक पॅन्थर संघ विजेता

## बार असोसिएशनची क्रिकेट स्पर्धा : महिला गटात स्ट्रायकर संघास विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

सोलापूर बार असोसिएशनची टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत ॲडव्होकेट ब्लॅक पॅन्थर संघाने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी पंढरपूर वकील संघाचा २२ धावांनी पराभव केला. महिला गटात लीगल स्ट्रायकर संघ विजेता ठरला. लीगल दिवाज संघ उपविजेता ठरला.

या स्पर्धेमध्ये १६ पुरुष वकिलांच्या संघांनी तसेच ३ महिला वकिलांच्या संघांनी सहभाग नोंदविला होता. पारितोषिके जिल्हा कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश स्मिता घारगे, जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी ज्येष्ठ वकील ॲड. एस. आर. पाटील व ॲड. मंगला चिंचोलकर, बारचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख, जयदीप मोहिते व स्मिता घारगे आदी उपस्थित होते.

स्वर्गीय विश्वनाथ फताटे यांच्या स्मरणार्थ ॲड. विक्रांत फताटे यांच्या सौजन्याने विजेत्या संघाला चषक प्रदान करण्यात आला. प्रथम पारितोषिक स्व. दत्तात्रय जोशी यांच्या स्मरणार्थ ॲड. निलेश जोशी यांच्या सौजन्याने रुपये ११ हजार कर्णधार ॲड. मुनीनाथ कारमपुरी व संघातील सर्व खेळाडूंना देण्यात आले. उपविजेत्या संघास ॲड. सागर घाटे यांच्या सौजन्याने ७ हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. बारचे सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले. सहसचिवा ॲड. मीरा प्रसाद यांनी आभार मानले.



**वैयक्तिक पारितोषिके**

मॅन ऑफ द सिरीज : ॲड. अभिषेक थोरात. उत्कृष्ट फलंदाज : ॲड. आकाश देशमुख (पंढरपूर), गोलंदाज : ॲड. महेश इजामुरी, क्षेत्ररक्षणक ॲड. शक्तिमान माने (पंढरपूर).

# माळशिरस तालुका सायकल राईड रविवारी

## राज्यातील १२५ सायकल रायडर्सचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ मार्च-**

जागतिक आरोग्य दिन व खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित अकलूज ते अकलूज या सुमारे ७५ किलोमीटर माळशिरस तालुका सायकल राईड रविवार ५ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता होणार असल्याची माहिती सायकल रायडर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली.

अकलूज - माळीनगर- महाळुंग - श्रीपूर - बोरगाव - माळखांबी - बोंडले - वेळापूर - खुडूस - माळशिरस - संग्रामनगर - अकलूज असा या सायकल राईडचा मार्ग असणार आहे. यात राज्यातील १२५ सायकल रायडर्सनी भाग घेतला असून अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथून सकाळी ६ वाजता अकलूज नगर परिषदेचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते तर अकलूज पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नीरज उबाळे यांच्या अध्यक्षतेखाली या सायकल राईडचा शुभारंभ होणार आहे.



माळशिरस येथे सकाळी ११ वाजता पंचायत समितीच्या वतीने जिल्हा परिषद सदस्य अर्जुनसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते व सभापती दत्ताभैय्या मगर यांच्या अध्यक्षतेखाली सायकल राईडचे स्वागत करण्यात येणार आहे. येथील पंचायत समिती सभागृहात सायकलिंग काळाची गरज या विषयावर आंतरराष्ट्रीय सायकल रायडर्स सतीश जाधव (मुंबई) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे सायंकाळी ४ वाजता शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील यांच्या हस्ते व अकलूजचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व नगराध्यक्षा रेश्मा अडगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सहभागी सायकल रायडर्सना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे

# मंद्रूपच्या ग्रामसेवकाचा पदभार काढण्यासाठी बीडीओंकडून चालढकल

## दहा महिन्यांपासून शासनाच्या आदेशाचे उल्लंघन

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.३१ मार्च-**

ग्रामपंचायत सदस्य ठराव व वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने मंद्रूपचे ग्रामसेवक नागेश जोडमोटे पदभार देणार नसल्याची चर्चा सुरू आहे.

दहा महिन्यापासून बदलीचा आदेश मिळूनही पदभार न देणाऱ्या मंद्रूपचे ग्रामसेवक जोडमोटे यांना बीडीओंसह वरिष्ठ अधिकाऱ्याचे पाठबळ मिळत असल्याने बदली होऊन इतर गावात रूजू झालेल्या ग्रामसेवकांमधून प्रशासनविरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तक्रारदारांना चुकीची माहिती देऊन दिशाभूल करण्यात येत असून ग्रामसेवकांना कामकाज करण्याचे अलिखित आदेश दक्षिणेच्या बीडीओकडून दिल्याची चर्चा पंचायत समिती कार्यालयात सुरू आहे. ग्रामसेवक जोडमोटे यांनी पदभार न सोडल्यामुळे व शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे झेडपीच्या बदली आदेशाला गालबोट लागले आहे.

ग्रामसेवक जोडमोटे यांच्याकडे मंद्रूपचा प्रभारी पदभार असताना सीईओ कुलदीप जंगम यांनी जूनमध्ये त्यांची मंद्रूपमधून बदली करून मूळ ठिकाणी निंबर्गी येथे रुजू होण्याचे आदेश दिले. मात्र, तब्बल दहा महिन्यानंतरही राजकीय दबावामुळे व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने ग्रामसेवक जोडमोटे हे पदभार सोडण्यास तयार नाहीत. माझी वसुंधरा निधी व वित्त आयोगाचे निधी खर्ची टाकण्यासाठी मार्च अखेरपर्यंत ठिया मारला असल्याची चर्चा सुरू आहे. वरिष्ठ अधिकार्यांकडून पदभार देण्यासाठी अनेक आदेश मिळाल्यानंतरही मंद्रूप ग्रामपंचायतमध्ये शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करत कामकाज करीत आहेत . ग्रामसेवक जोडमोटे यांना त्यांचे पदभार काढून घेण्यासाठी तक्रारदाराने पाठपुरावा केल्यानंतर दक्षिणच्या बीडीओंकडून उडवा उडवीची उत्तरे देण्यात येत आहेत. तसेच ग्रामपंचायतच्या सदस्यांची मागणी असल्याचे सांगत त्यांना मार्चअखेरपर्यंत ठेवण्याचा उद्देशही साध्य केल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे ग्रामसेवक जोडमोटे यांच्या पदभार न काढण्यामागे दक्षिणच्या बीडीओंचे पाठबळ असल्याची चर्चा सध्या ऐकावयास मिळत आहे . तत्कालीन विस्तार अधिकारी शंकर पाटील ३० मार्चला निवृत्त झाल्यानंतर युसुफ पठाण यांच्याकडे विस्तार अधिकारी पदभार देण्यात आला आहे. पदभार हस्तांतरणासाठी पंचायत समिती कार्यालयाकडून २७ मार्च रोजी काढलेला पत्र सोमवारी ३० मार्च रोजी विस्तार अधिकार्यांना देण्यात आला आहे.

तक्रारदाराला शुक्रवारी २७ मार्चला मिळालेला पत्र विस्ताराधिकाऱ्यांना ३० मार्चला देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारीच ग्रामसेवक जोडमोटे यांच्या पाठीशी असल्याचे दिसून येत असल्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

> दक्षिणचे बीडीओ ग्रामसेवक जोडमोटे यांचे पदभार काढण्याऐवजी त्यांना पाठीशी घालत आहेत. त्यामुळे मंद्रूप मधील कोट्यावधीच्या विकासनिधीचा गैरवापर सुरू आहे. याबाबत बीडीओंकडे तक्रार करूनही पत्र काढण्यासाठी चालढकल करण्यात येत आहे. शिवाय शासनाच्या नियमाप्रमाणे ३१ मार्च रक्कम खर्च करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आल्याने दक्षिणच्या बीडीओविरोधात विभागीय आयुक्तांकडे तक्रार करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### कुंभारीचे ग्रामसेवक ढेपे यांना पदभार द्या

कुंभारीचे ग्रामसेवक ढेपे यांच्या ग्रामपंचायतच्या सुरळीत कामकाजामुळे पंचायत समितीकडे एकही तक्रारअर्ज नाही. बदली झाल्यानंतर आमदारांनी सांगितल्यानंतरही त्यांचे पदभार काढले. तसेच ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्षही पदभार सोडले. मात्र मंद्रूपचे ग्रामसेवक जोडमोटे पदभार सोडणार नसतील तर कुंभारीचे ग्रामसेवक ढेपे यांना कुंभारीचे पदभार देण्यासाठी बीडीओ व सीईओंकडे निवेदन देणार असल्याचे ग्रामपंचायत सदस्यांनी सांगितले.



# नागरिकाभिमुख सर्वसमावेशक बजेट; विकासाला नवी गती : किसन जाधव

## प्रशासनाच्या त्रुटींवर किसन जाधव यांची मांडणी, पाणीप्रश्नावरही भूमिका स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

सोलापूर महानगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी १४४९ कोटी ७१ लाख ९३ हजार ४०१ रुपयांचे अंदाजपत्रक सोमवारी सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आले. स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांनी सभागृहात हा अर्थसंकल्प सादर केला. शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सादर करण्यात आलेल्या या बजेटमध्ये पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते विकास आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे. यावेळी भाजपा नगरसेवक किसन जाधव यांनी बजेटवर आपली भूमिका मांडताना प्रशासनाच्या कार्यपद्धतीतील काही त्रुटी सभागृहात अधोरेखित केल्या.

महापौर विनायक कोंडयाल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, सभागृह नेते नरेंद्र काळे आणि स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत त्यांनी हे बजेट सोलापूरच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. मागील साडेचार वर्षांच्या प्रशासकीय कालावधीचा उल्लेख करताना जाधव यांनी महसूल संकलन अपेक्षेप्रमाणे झाले नसल्याचे नमूद केले. तसेच त्या कालावधीत घेतलेल्या निर्णयांची सविस्तर माहिती सभागृहासमोर सादर करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. याशिवाय, प्रशासकीय कालावधीत डीपी प्लॅन शासनाकडे पाठवण्यात आला असला तरी त्यासाठी सभागृहाची मंजुरी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने सदस्यांना विश्वासात घेऊन डीपी प्लॅन पुन्हा शासनाकडे पाठवावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच अद्याप प्रशासनाच्या वतीने आवश्यक रिव्हिजन करण्यात आलेले नसून ते तात्काळ करावे, गेल्या साडेचार वर्षांच्या प्रशासकीय कालावधीत सोलापूर शहराच्या विकासासाठी घेतलेले निर्णय तसेच शासनाकडे पाठवलेले प्रलंबित प्रस्ताव यांची पुस्तिका तयार करून येत्या दोन महिन्यांत सभागृहात सादर करावी, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, मूलभूत कामांमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हेड पूर्वीच्या अंदाजपत्रकात नमूद होता; मात्र अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे तो वगळण्यात आल्याने महापालिकेला सुमारे १०० कोटी रुपयांचा फटका बसल्याचा आरोप जाधव यांनी केला.

पाणीप्रश्नावर बोलताना काँग्रेसचे चेतन नरोटे यांच्या टीकेला उत्तर देताना जाधव म्हणाले की, सोलापूर शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उजनी ते सोलापूर दुहेरी पाईपलाईन प्रकल्पासाठी ८९२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या प्रकल्पामुळे भविष्यात पाणीपुरवठा सुधारण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला पक्षीय राजकारण करण्याऐवजी विकासाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे, असा संदेश देत जाधव यांनी विरोधकांना टोला लगावला. नव्या उत्पन्न स्रोतांचा शोध घेण्यावर भर देणारे हे बजेट महापालिकेला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# पंढरपूर सिंहगड महाविद्यालयात तंत्रज्ञान व्यावसायिकीकरणावर मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ मार्च-**

एसकेएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर येथे इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) अंतर्गत तंत्रज्ञान व्यावसायिकीकरण, परवाना व हस्तांतरण पद्धती आणि धोरण या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ राजेंद्र आर. शिंदे (संचालक, विक्ट्रिबेल एंटरप्रायझेस प्रा. लि.) उपस्थित होते. त्यांनी बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर), पेटंटचे व्यावसायिकीकरण, परवाना धोरणे, स्टार्टअप संकल्पना आणि तंत्रज्ञान हस्तांतरण या विषयांवर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून शैक्षणिक संशोधन आणि उद्योग क्षेत्र यामधील दरी कशी कमी करता येईल, हे त्यांनी स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. कैलाश जे. करांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाभिमुख दृष्टीकोन विकसित करून नवोपक्रमातून उद्योजकतेकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले.

उपप्राचार्य तसेच इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबतच संशोधन आणि स्टार्टअप क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अतुल आराध्ये व प्रा. के. पी. जाधव यांनी कार्यक्रमाची आखणी केली. डॉ. अतुल आराध्ये यांनी आभार मानले.



# एकता महिला मंचच्या सहकार्यामुळेच जनसेवा

## डॉ. ज्योती तीर्थ; वैराग येथे विशेष सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३१ मार्च-**

वैरागमधील कार्यकाळ माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. एकता महिला मंचने वेळोवेळी दिलेल्या सहकार्यामुळेच मला जनसेवा करणे शक्य झाले. आज मंचने जो माझा सत्कार आणि सन्मान केला, त्याबद्दल मी त्यांची नेहमीच ऋणी राहीन, असे प्रतिपादन डॉ. ज्योती तीर्थ यांनी केले

प्राथमिक आरोग्य केंद्र, वैराग येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. तीर्थ यांनी गेल्या चार वर्षांच्या कार्यकाळात बजावलेली उत्कृष्ट आरोग्य सेवा आणि त्यांची आगामी उच्च शिक्षणासाठी झालेली निवड याचे औचित्य साधून, 'एकता महिला मंच' च्या वतीने त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

श्री यंकोबाबा महाराज मंदिर येथे हा सन्मान सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. डॉ. तीर्थ यांनी वैराग येथे आपल्या कार्यकाळात सामान्य जनतेला, विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना मार्गदर्शन आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा दिली. 'एकता महिला मंच' च्या सामाजिक उपक्रमांत त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असायचा.

आता त्या पुढील उच्च शिक्षणासाठी मुंबईला रवाना होत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, रचनाताई निंबाळकर आणि अंकुश सिस्टर यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात आले. डॉ. ज्योती तीर्थ वैरागचा पदभार सोडून जात असल्यामुळे आरोग्य केंद्रातील कर्मचारी आणि अनेक 'आशा' स्वयंसेविका भावूक झाल्या होत्या.

या सोहळ्याला गीतांजली जोशी, लक्ष्मी सुतार, सुनिता जांभळे, पंचशीला बनसोडे, रजनी घोंगडे, वंदना कासार, सुचिता कासार, शितल दीक्षित, मीनाक्षी कासार, संगीता डाके, रसिका डाके, सुरेखा कोळी, मेघा दिंडोरे, राजश्री बादगुडे, अश्विनी गोडगे, अश्विनी माळी उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक आशा विभूते यांनी सूत्रसंचालन केले, तर रत्नप्रभा गायकवाड यांनी प्रास्ताविक मांडले. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी आभार मानले.

### प्रशासकीय पाठींबा आणि कौतुकाची थाप

पोलीस निरीक्षक गावडे म्हणाले की, प्रशासकीय क्षेत्रात निष्ठेने काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांचा सत्कार करणे ही समाजाची जबाबदारी असून एकता महिला मंचचे उपक्रम नेहमीच स्तुत्य असतात. याप्रसंगी रचना निंबाळकर यांनीही डॉ. तीर्थ यांना भावी वैद्यकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# सिंहगड महाविद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात

**पंढरपूर,दि.३१ मार्च-**

येथील सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये भारताचे थोर वैज्ञानिक भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांच्या 'रमण प्रभाव' या ऐतिहासिक शोधाच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय विज्ञान दिन' नुकताच साजरा करण्यात आला. सेंटर फॉर मटेरियल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी पुणे येथील डॉ. शशिकांत शिवाजी व्हटकर, प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांच्या हस्ते डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इन्स्टिटयूट इनोव्हेशन कौन्सिलचे समन्वयक डॉ.संपत देशमुख यांनी केले, प्रमुख पाहुण्याची ओळख उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी करुन दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एस. एस. घोंगडे आणि प्रा.एस. डी. घोडके यांनी समन्वयक म्हणून उत्कृष्ट नियोजन केले.आनम बेद्रेकर व साक्षी माळी यांनी आभार मानले.

# अवैध मुरूम उपसाकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष

## लाखो रूपयांची रॉयल्टी बुडीत

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.३१ मार्च-**

भंडारकवठे भीमा नदीतील वाळू उपसा करताना ठेकेदाराकडून शासनाच्या नियमाचे उल्लंघन होत असल्याने महसूल विभागाकडून पंधरा दिवसांसाठी वाळू ठेका निलंबित केला आहे. एकीकडे सरकारला कोट्यावधी रूपयांची कर भरून वाळू उपसा करण्यात येत असताना त्याच्यावर कारवाई होते, तर दुसरीकडे अनेक ठेकेदारांकडून हजारो ब्रास अवैद्य मुरूम उपसा करून लाखो रुपयांचा रॉयल्टी बुडविण्यात येत असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्यामुळे महसूल विभागावर नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. मंद्रूपचे तहसीलदार विष्णू बुटे यांनी पदभार स्वीकारल्यापासून अवैद्य मुरुम उपसाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. मंडल अधिकायांच्या आशीर्वादाने बिनदिक्कत अवैद्य मुरूम उपसा करण्यात येत आहे. त्या मंडल अधिकार्यांवर कारवाई होताना दिसून येत नाही. तसेच कार्यालयाकडे तक्रार करूनही अर्जानुसार पंचनामा न करता बघ्याची भूमिका घेण्यात येत असल्याने महसूल विभागाबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शेतकर्यांनी मुरूम उपसा केल्यावर कारवाई करण्यासाठी प्राधान्य देणारे महसूल विभाग ठेकेदारांवर कारवाई का करीत नाही ? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. आठ दिवसापूर्वी तहसीलदार विष्णू बुटे यांनी भंडारकवठे येथील वाळु उपसा करताना शासनाच्या नियमाचे उल्लंघन होत असल्याचे सांगत जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर केला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी भंडारकवठेचा वाळू ठेका पंधरा दिवसासाठी निलंबित केला आहे. या निर्णयामुळे महसूल विभागाचे कौतुक होत असले तरी मुरूम उपसाकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अवैद्य मुरूम उपसाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# यात्रेत नृत्यांगना, डीजे बंदीसाठी रणरागिणी सरसावल्या

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.३१ मार्च-**



दोन एप्रिलपासून सुरू होणाऱ्या झरे गावच्या यात्रेत डीजे, अश्लील हावभाव नृत्य व ध्वनी प्रदूषणास बंदीसाठी झरे (ता.करमाळा) येथील महिला सरसावल्या असून यासंबंधीचे निवेदन त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा, तहसीलदार शिल्पा ठोकडे यांचेसह महिला बालविकास अधिकाऱ्यांना दिले आहे.

सरपंच मंजुश्री मुसळे, वैशाली काळे, अश्विनी सरोदे, रेश्मा सरोदे, स्वाती पाटील, सैरंद्रा मोरे, मंगल ढावरे, अलका मोरे यांच्यासह १३५ महिला व ग्रामस्थांच्या सहया निवेदनावर केलेल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून या यात्रेमध्ये डीजे लावला जातो व अश्लील नृत्य केले जाते हे मात्र, मागील काही वर्षांपासून या यात्रेमध्ये उघडपणे अश्लील नृत्य, अश्लील गाणी आयोजित केले जात आहेत. हे प्रकार सार्वजनिक ठिकाणी उघडपणे घडत असून ते समाजातील नैतिक मूल्ये, महिलांचा सन्मान व सार्वजनिक शिस्त यांना बाधा आणणारे आहेत.

# शिवभक्त प्रतिष्ठानतर्फे रायगड दुर्ग मोहीम

## पंढरपुरातून साडेपाचशे मोहिमेत सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ मार्च-**

शिवभक्त प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या माध्यमातून पंढरीची वारी मंगळवारी (ता.३१) रायगडच्या द्वारी अशा घोषणा देऊन रायगड कडे रवाना झाले. विशेष म्हणजे यावर्षी तब्बल साडेपाचशेच्यावर महिला आणि पुरुष या मोहिमेत सहभागी झाल्याची माहिती येथील शिवभक्त प्रतिष्ठानचे पदाधिकारी श्रीराम गणपुले यांनी दिली.

या मोहिमे संदर्भात माहिती देताना गणपुले यांनी सांगितले की, तिथीनुसार असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त नतमस्तक होण्यासाठी पंढरपुरातून शिवभक्त प्रतिष्ठानची दुर्ग मोहीम प्रतिवर्षी रायगडला जाते. यंदाच्या वर्षी तब्बल ५७० तरुण स्त्री-पुरुष हे रायगड साठी पंढरपुरातून रवाना झाले आहेत.

रायगडभूषण पुरस्कार प्राप्त येथील शिवभक्त प्रतिष्ठान पंढरपूरच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शिवसमाधी नतमस्तक दुर्गमोहिम रायगड कडे मार्गस्थ होत आहे. पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीला नतमस्तक होण्यासाठी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या प्रमाणावर शिवभक्त रायगड कडे मार्गस्थ होत आहेत. ही परंपरा जवळजवळ २५ वर्षापासून अखंडितपणे सुरु आहे.

पंढरीची वारी रायगडच्या व्दारी या उपक्रमाद्वारे आम्ही दरवर्षी ही मोहिम राबवित असतो. पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार जर बळकट करावयाचे असतील तर प्रत्यक्ष गडकिल्यांवर जावून गड किल्यांना भेटी देवून त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत. हीच भावना मना मध्ये ठेवून आम्ही ही शिवसमाधी नतमस्तक दुर्गमोहिम राबवित असतो.

विशेष म्हणजे रायगडावर गेल्यावर गडपूजन, व्यसनमुक्तीची शपथ आणि विशेष म्हणजे एक दिवस गडस्वच्छता अभियान देखील राबविले जात असते.

होळीच्या माळावरच्या शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे पूजन, जगदिश्वराची आणि शिवसमाधीचे पूजन करुन सर्व शिवभक्त पंढरपूरकडे रवाना होत असल्याचे देखील श्रीराम गणपुले यांनी सांगितले.




### ११ बसगाड्या आणि ३ जीपमधून शिवभक्त रवाना

यंदाच्या वर्षी येथून ११ बसगाड्या आणि तीन जीप गाड्यातून सुमारे ५३० शिवभक्त रायगड मोहिमेवर निघालेले आहेत. विशेष म्हणजे या मध्ये १७० मुली आणि महिला आणि सुमारे ४०० च्या आसपास पुरुष आणि मुले सहभागी झालेली आहेत. रायगडावर आमचे सर्व धारकरी, वारकरी दिंडीसह शिवसमाधीवर नतमस्तक होणार आहेत.



# सुलोचना काळे ठरल्या पैठणीच्या मानकरी

## आंबेगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि.३१ मार्च-**

जागतिक महिला दिननिमित्त आंबेगाव (ता. बार्शी) येथे झालेल्या स्पर्धेत सुलोचना काळे ठरल्या पैठणीच्या मानकरी ठरल्या. त्यांना मानाची 'आकर्षक पैठणी' देऊन गौरविण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि ग्रामपंचायत आंबेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या प्रांगणात विविध स्पर्धांचे व कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आंबेगावचे सरपंच सुशीलकुमार दळवी, ग्राम सेवक रोहिणी घुगे जिल्हा परिषद शाळेचे शेंडगे आणि शिक्षिका गाडवे, ज्योती सुनील दळवे नलिनी धेंडे, वर्षा साळुंखे, अनिता ढवळे, माधुरी माळी, मनुबाई माळी यांच्या प्रमुख उपस्थितीत याचे उद्घाटन झाले. यावेळी फुगे फोडणे, पाण्याने बाटली भरणे, केसामध्ये स्ट्रॉ खोवणे, टिकली लावणे व उखाणे स्पर्धा झाल्या. द्वितीय पूजा काळे यांनी मिळवला. त्यांना थर्मास भेट देण्यात आला. तृतीय विजेत्या महिलेस आपेपात्र देऊन सन्मानित करण्यात आलकार्यक्रमास उपस्थित सर्व महिलांमधून 'लकी ड्रॉ' काढून त्यांनाही विशेष भेटवस्तू देण्यात आल्या.

## निधन वृत्त...

### सोपान मदने-पाटील



**पिलीव, दि. ३१ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील सोपान गेना मदने-पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शाम गुज्जा



**सोलापूर दि. ३१ मार्च-**

रविवार पेठ येथील रहिवासी शाम नारायणराव गुज्जा यांचे मंगळवार, ३१ मार्च २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, बहीण, मुले, मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा बुधवार, १ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता त्यांच्या राहत्या घरातून निघणार आहे. पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त गणेश नारायणराव गुज्जा यांचे ते लहान बंधू होत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## थोडक्यात...



### हिंदू संमेलनात करण्यात आली पंच परिवर्तनच्या मुद्दयांवर चर्चा

**सोलापूर, दि.३१ मार्च-**

सकल हिंदू समाजच्या वतीने आरटीओ परिसरातील डॉ.आंबेडकर चौक येथे आयोजित केलेल्या हिंदू संमेलनात पंच परिवर्तन मुद्दयांवर व्यापक चर्चा करण्यात आली. हिंदूंच्या सकल समाजाचे एकत्रिकरण, हिंदुत्वाचे महत्त्व याविषयीचे महत्व विशद करण्यात आले. राष्ट्रीय सेवा समितीच्या गायत्री सुमंत यांचे 'कुटुंब प्रबोधन' या विषयावर व्याख्यान तर अपर्णा सहस्त्रबुध्दे यांचे भारुड झाले. आरटीओ परिसरातून शोभायात्रा काढण्यात आली. राम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांच्या वेशभुषा केलेली मुले सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. डॉ. चिलजवार यांनी या कार्यक्रमांचे संयोजन केले होते. प्रीता चिलजवार यांनी सूत्रसंचालन केले. शोभायात्रेत डॉ.माने, डॉ.तरनळ्ळी, हेमंत जाधव, वडणे, वीरेंद्र मुळे यांच्यासह परिसरातील महिला, पुरुष, युवक मोठ्या संख्येने सामील झाले होते. 'भारत माता की जय'च्या घोषाने परिसर दणाणून सोडण्यात आले होते.

### धनगर समाजातील वधू-वर, पालकांचा परिचय मेळावा

**सोलापूर, दि.३१ मार्च-**

राजमाता सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने रविवार, दि.२४ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता नेहरु नगर येथील सुंदर मल्टिपर्पज हॉल येथे धनगर समाजातील वधू-वर, पालकांचा परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाऊसाहेब चोरमुले यांनी दिली. या मेळाव्यात महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील समाजबांधव उपस्थित राहणार आहेत. यात सहभागी होणेसाठी १५ एप्रिल २०२६ पर्यंत नावनोंदणी करावे. या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक रवींद्र नागणकेरी, अध्यक्ष सुहास गडदे, कार्याध्यक्ष उदयकुमार ठेंगले, उपाध्यक्ष आत्मराम देवडे आदी परिश्रम घेत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

### विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी सात जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.३१ मार्च-**

संसार उपयोगी सामान दिले नाही. सोने, पैसे दिले नाही. लग्नात योग्य मानपान केला नाही. घरातील किरकोळ कारणावरुन घालून पाडून बोलत एका विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सात जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत प्रतीक्षा रोहित अक्कलकोटे (वय-२४, रा.कलावती नगर, एमआयडीसी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, पतीसह सासरच्या मंडळींनी दि.३ जून २०२३ ते २० जून २०२४ यादरम्यान नवीन घरातील फर्निचर करण्यासाठी माहेरुन २ लाख रुपये घेऊन ये असे म्हणून शिवीगाळ व मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पती रोहित अक्कलकोटे, सासू सुरेखा अक्कलकोटे, सासरा संतोष अक्कलकोटे, आजी सासू सर्वमंगल अक्कलकोटे, चुलत सासू महादेवी व दीर गणेश (सर्वजण रा.उत्तर कसबा, बाळीवेस, गवंडी गल्ली, सोलापूर) आणि चुलत नणंद सुप्रिया यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास डोके हे करत आहेत.

### उद्या शिवदारे महाविद्यालयात मुख्याध्यापकांची कार्यशाळा

**वळसंग ३१ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुका मुख्याध्यापक संघ आणि वि. गु शिवदारे प्रतिष्ठान सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी २ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत मुख्याध्यापक कार्यशाळेचे आयोजन जुळे सोलापूर येथील वि. गु. शिवदारे महाविद्यालयात करण्यात आले आहे. या कार्यशाळेत डायट वेळापूरचे अधिव्याख्याता डॉ. प्रभाकर बुधाराम, बोमड्याल प्रशालेचे मुख्याध्यापक वेंकटेश पोटाबत्ती, संगमेश्वर महाविद्यालय सोलापूरचे प्राध्यापक डॉ. गणेश मुडेगावकर, गटशिक्षणाधिकारी कार्यालय उत्तर सोलापूरचे अमर शंकू हे मार्गदर्शन करणार आहे. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार प्राचार्य जयंत आसगावकर, मुख्याध्यापक महामंडळ मुंबईचे अध्यक्ष प्राचार्य सुभाषराव माने, जिल्हा परिषद सोलापूर माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

# 'त्या' दोन शाळांची मान्यता रद्द; सीईओंनी दिला अहवाल

- आठ शिक्षक अतिरिक्त
- विद्यार्थ्यांच्या समायोजनावरून वाद वाढला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

जिल्ह्यातील दिव्यांग शाळांमधील बोगस पटसंख्या उघड झाल्यानंतर प्रशासनाने कडक पाऊल उचलत दोन शाळांची मान्यता रद्द केली आहे. या निर्णयामुळे संबंधित शाळांतील ८ शिक्षक अतिरिक्त ठरले असून त्यांच्या समायोजनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या निर्देशानुसार सर्व दिव्यांग शाळांची चौकशी करण्यात आली.

जिल्ह्यात एकूण ३६ दिव्यांग शाळा असून त्यातील काही ठिकाणी दाखवलेली विद्यार्थी संख्या आणि प्रत्यक्ष उपस्थिती यामध्ये मोठी तफावत आढळून आली. यासाठी तीन महिन्यांपर्यंत बायोमॅट्रिक उपस्थितीची पडताळणी करण्यात आली. मात्र, तरीही आकडेवारीत विसंगती कायम राहिल्याने कारवाईचा निर्णय घेण्यात आला.



मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी यासंदर्भात सविस्तर अहवाल सादर केला असून दिव्यांग आयुक्तांकडे पुढील कारवाईसाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. संस्थाचालकांची सुनावणी झाल्यानंतर आणखी शाळांबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे संकेत आहेत.शासनाने दिव्यांग शाळांतील विद्यार्थ्यांचे नियमित शाळांमध्ये समायोजन करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने प्रक्रिया सुरू केली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या निर्णयाला संस्थाचालकांकडून तीव्र विरोध होत आहे.

त्यांचे म्हणणे असे की, दिव्यांग शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध असतात, त्या सुविधा सर्वसामान्य शाळांमध्ये उपलब्ध नाहीत. काही शाळांमध्ये अनियमितता असली तरी सर्व शाळांवर एकसारखी कारवाई करणे अन्यायकारक आहे. विशेषतः निवासी शाळांतील विद्यार्थ्यांचे काय होणार, याबाबत कोणतीही स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. या निर्णयामुळे अनेक दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

> फेरविचाराची मागणी : संस्थाचालकांनी शासनाकडे या निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे. दोषी शाळांवर कठोर कारवाई व्हावी, मात्र सर्व शाळांचे एकत्रित समायोजन टाळावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

# 'डीसीसी'पूर्वी 'केडर'ची रंगीत तालीम; ५५ वर्षांनंतर होणार स्वतंत्र निवडणूक

- पदसिध्द संचालक पध्दत रद्द
- प्रत्येक तालुक्याला प्रतिनिधित्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. 'डीसीसी' अर्थात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीपूर्वी 'केडर' अर्थात जिल्हा देखरेख सहकारी संस्थेची निवडणूक रंगणार आहे. 'डीसीसी'पूर्वी 'केडर'ची रंगीत तालीम मानली जात आहे. तब्बल ५५ वर्षांनंतर प्रथमच केडरची स्वतंत्र निवडणूक होत असल्याने या प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



जिल्ह्यात नगरपरिषदा, महापालिका, जिल्हा परिषद तसेच ११ पैकी १० पंचायत समित्यांवर वर्चस्व मिळवल्यानंतर आता सहकार क्षेत्रातील सत्ता काबीज करण्यासाठी राजकीय हालचाली वेगाने सुरु झाल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पोटनियमात करण्यात आलेला मोठा बदल. आतापर्यंत जिल्हा बँकेचे संचालक हेच केडरवर पदसिद्ध सदस्य म्हणून कार्यरत होते.

आता ही पध्दत पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. नवीन नियमांनुसार प्रत्येक तालुक्याला स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळणार असून, त्यामुळे ग्रामीण भागातील नेतृत्वाला संधी मिळणार आहे. या बदलामुळे केडर आणि जिल्हा बँक या दोन स्वतंत्र संस्थांचे स्वतंत्र अस्तित्व स्पष्ट होणार आहे. केडरच्या संचालक मंडळासाठी एकूण १६ सदस्यांची निवड होणार आहे. त्यामध्ये प्रत्येक तालुक्यातून ११ सर्वसाधारण प्रतिनिधी असणार आहेत. अनुसूचित जाती/जमातीमधून १ इतर मागासवर्गीयमधून १ विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्गातून १ महिलांमधून २ प्रतिनिधी, याशिवाय जिल्हा गट सचिव संघटनेचे २ प्रतिनिधी स्वीकृत संचालक म्हणून नियुक्त केले जाणार आहेत. जिल्ह्यातील सुमारे १,२७७ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या निवडणुकीत मतदान करणार आहेत. केडर निवडणुकीसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने हालचाली सुरू केल्या आहेत. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांकडून ठराव मागवण्यासाठी लवकरच पत्रव्यवहार होणार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिली.

| निवडणुकीची वैशिष्ट्ये आणि परिणाम | |
|---|---|
| स्वतंत्र अस्तित्व | ५५ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर ही संस्था निवडणूक प्रक्रियेला सामोरे जात आहे. |
| राजकीय वर्चस्व | या निवडणुकीतील विजयाचा परिणाम आगामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकांवर होण्याची शक्यता आहे. |
| प्रशासकीय हालचाली | निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत. |

**५५ वर्षांनंतर स्वतंत्र ओळख**

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेची स्थापना १९७१ मध्ये झाली. स्थापनेपासून २०१७ पर्यंत जिल्हा बँकेचे संचालकच पदसिध्द पध्दतीने केडरचा कारभार पाहत होते. मात्र, संचालक मंडळ बरखास्त झाल्यानंतर प्रशासक नियुक्त करण्यात आला. पोटनियमात बदल करण्यात आले. संस्थेचे अस्तित्व टिकवण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाच्या आदेशानंतर या प्रक्रियेला गती मिळाली.

**राजकीय समीकरणांवर परिणाम**

केडरच्या निवडणुकीमुळे जिल्ह्यातील सहकार राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची शक्यता आहे. प्रत्येक तालुक्याला प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे स्थानिक पातळीवरील नेत्यांची ताकद वाढणार असून, याचा थेट परिणाम आगामी जिल्हा बँक निवडणुकीवर होणार आहे. 'केडर'ची ही निवडणूक केवळ संस्थात्मक बदल नसून जिल्ह्यातील सहकार राजकारणाला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

# ८६ हजारांहून अधिक महिलांना दिलासा

**तालुकानिहाय शिबिरांद्वारे कागदपत्रांची पूर्तता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

जिल्ह्यातील विधवा, परित्यक्ता आणि अविवाहित अशा गरजू व वंचित महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. गावनिहाय करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून जिल्ह्यात तब्बल ८६ हजारांहून महिला विविध योजनांच्या प्रतीक्षेत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महिला व बालकल्याण विभागाने जिल्ह्यातील प्रत्येक गावात जाऊन प्रत्यक्ष सर्वेक्षण केले. रेशन कार्ड, आधार कार्ड, बँक खाते, राहण्याचा पुरावा यांसारख्या मूलभूत कागदपत्रांअभावी महिलांना लाभ मिळवताना अडचणी येत आहेत. जिल्हा परिषदेने तालुकानिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे.

एकूण २३ प्रकारच्या कागदपत्रांसाठी मदत करण्यात येणार आहे. शिबिरांच्या माध्यमातून कागदपत्रांची पूर्तता करून महिलांना सक्षम करण्याचा आमचा उद्देश आहे. तालुकानिहाय पाहता अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, पंढरपूर आणि करमाळा या भागांमध्ये सर्वाधिक महिलांची नोंद झाली आहे.

सर्वेक्षणातील महिलांना योजनांचा लाभ देण्यासाठी मदत करण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले.

| तालुकानिहाय महिलांची संख्या | |
|---|---|
| अक्कलकोट | ९५०९ |
| बार्शी | ६१३५ |
| अकलूज | ४५३४ |
| करमाळा | ७२९२ |
| कोळा | ३६२८ |
| माढा | ३७५५ |
| माळशिरस | ६५६२ |
| मंगळवेढा | ४३२० |
| मोहोळ | ६००३ |
| उत्तर सोलापूर | ३८०५ |
| पंढरपूर | ८३०७ |
| सांगोला | ४५१६ |
| दक्षिण सोलापूर | ९६२५ |
| टेंभुर्णी | २९६९ |
| वैराग | ५४४९ |
| एकूण | ८६२२९ |

## विटांच्या ढिगाऱ्यात आढळला नाग

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

संजय विजयकुमार उपाध्ये पुणे हायवे कारंबा नाका सोलापूर इथे बांधकाम चालू असलेल्या विटेमध्ये एक साप आढळून आला लगेच या घटनेची माहिती सर्पमित्र अनिल अलदर यांना देण्यात आले. त्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली असता विटेमध्ये एक भला मोठा नाग बसलेला आढळून आला. तेथील नागरिकांनी सर्पमित्रांना विचारले असता तर सापाविषयी माहिती सांगण्यात आली. हे साप विषारी असल्याचं सांगण्यात आले व सोलापूरमध्ये कडाक्याचा उन्हाळा असल्यामुळे साप थंड ठिकाणी येऊन बसतात चालू असलेले बांधकाम बाथरूम टॉयलेट जिन्याच्या खाली झाडांच्या बुडात ज्या ज्या ठिकाणी थंड वलावा आहे. त्या-त्या ठिकाणी ते जाऊन बसतात तर आपला परिसर स्वच्छ ठेवणे व या विषयावरती नागरिकांना जनजागृती करण्यात आली सर्व नागरिकांनी सर्पमित्रांचे व नाग फाउंडेशनचे आभार मानले व त्या सापास निसर्गाच्या स्वाधीन करण्यात आले.



# ज्येष्ठांनी अहंकार बाजूला ठेवून माफ केले पाहिजे : सभागृह नेते नरेंद्र काळे

**महापौर विनायक कोंड्याल यांच्या समान संधीचा पॉझिटिव्ह इफेक्ट**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

ज्येष्ठांनी नव्या सदस्यांवर रागाला जाऊ नये. अहंकार बाजूला ठेवून मोठ्या मनाने माफ केले पाहिजे. तरच ज्येष्ठांच्या प्रेरणा, मार्गदर्शनातून नवी पिढी विकासाच्या दिशेने वाटचाल करु शकेल, असा विश्वास महापालिका सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी अंदाजपत्रकीय सभेतील भाषणातून दिला. वैशिष्ट्यपूर्ण ठरलेल्या महापालिकेच्या अंदाजपत्रकीय सभेत महापौर विनायक कोंड्याल यांच्या समान संधीचा पॉझिटिव्ह इफेक्ट दिसून आला. सभागृह नेते नरेंद्र काळेंच्या मोठी स्वप्ने पेरणाऱ्या स्फूर्तीदायी भाषणाने सर्वांचीच मने जिंकली. यानिमित्ताने समृध्द राजकीय संस्कृतीचा वारसा चालविण्याचा विश्वास दिला गेला.



बिनविरोध निवडून नवा इतिहास घडविणारे महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा अनेक कारणाने वैशिष्टयपूर्ण अशीच ठरली. तब्बल चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीनंतर सोलापूर महापालिकेचे अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेत मांडण्यात आले.

स्थायी समितीच्या लोकाभिमुख सभापती रंजीता चाकोते यांनी अंदाजपत्रक सादर केले. सभागृहनेते नरेंद्र काळे यांनी सत्ताधाऱ्यांकडून सूचना मांडली. ही सभा तब्बल १० तास म्हणजे दुपारी १२.१२ वाजता सुरु झालेली ही सभा रात्री १०.०९ मिनिटांपर्यत चालली. सत्ताधारी असो वा विरोधक सर्वांना समान निधी आणि समान संधी हे नवसूत्र महापौर विनायक कोंड्याल यांनी यानिमित्ताने घालून दिले. सर्वांना सोबत घेऊन कारभार कसा करावा? याचा जणू मानदंडही त्यांनी घालून दिला. हेडमास्तर तथा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी शिस्तप्रियता दाखवून दिली.

नगरसेविका वृषाली चालुक्य यांनी सभेच्या सुरुवातीलाच सर्वांनाच चॉकलेट केक देऊन वातावरण अधिक प्रफुलित केले. शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे, एमआयएमच्या गटनेत्या वहिदा भंडाले-शेख यांनी जबाबदार विरोधक म्हणून सकारात्मक नेतृत्व सिध्द केले.

या सभेत महिलांसह सर्वच सदस्यांनी एकापेक्षा सरस अशी भाषणे केली. एक जबाबदार नगरसेवक म्हणून आपल्या सूचना अपेक्षा मांडल्या. नव्या उमेदीने सर्वांनीच विकासाची भाषा मांडली. सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या १३ मिनिटाच्या भाषणाने सर्वांचीच मने जिंकली. अवघे महापालिका सभागृह स्तब्ध झाले होते.

नव्या सदस्यांना शिस्तीचे धडे देतानाच ज्येष्ठांना जबाबदारीची जाणीवही करुन देण्यात आली. दरम्यान, यंदाचे महापालिका बजेट फुगवले असल्याचा आरोप ऐकायला मिळाला. तो आरोप खोडून काढत नरेंद्र काळे यांनी मोठी स्वप्ने आता सर्वांना बघावी लागतील, असे सांगितले.

विकासाच्या मुद्द्यांवर सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र आले पाहिजे. महापालिका सभागृहात येताना पक्ष भेद विसरुया. सर्वांना समान निधीचा दिलेला शब्द आम्ही पूर्ण केला आहे. विरोधकांची विकासासाठीची सूचना कधीही मान्य करु आणि बहुमतावर चुकीची गोष्टही आम्ही करणार नाही, अशी ग्वाही देण्यात आली.

# श्री विष्णू महादेव यात्रा पुरवणीचे शानदार प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील ग्रामदैवत श्री विष्णू-महादेव यात्रेनिमित्त दैनिक तरूण भारत परिवाराने काढलेल्या यात्रा महोत्सव विशेष पुरवणीचे प्रकाशन देवस्थान यात्रा कमिटी पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शानदारपणे पार पडले.



गेल्या २१ वर्षांपासून या ग्रामदैवताची यात्रा विशेष पुरवणी काढण्यात येते. या पुरवणी प्रकाशन समारंभास दे वस्थान यात्रा कमिटी अध्यक्ष सुनील पाटील, दै. तरुण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसरपंच सुधीर पाटील, लोकमतचे पत्रकार संतोष नगर, पत्रकार सर्जेराव गायकवाड, हभप विनायक पाटील, शाहीर गायकवाड, श्रीकांत गायकवाड, कृष्णा घोटकर, सिध्देश्वर नसुते, महादेव माळी, अप्पूराजे भोसले, आंगद पाटील, रामदास गायकवाड यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी देवस्थान समितीच्या वतीने तामलवाडीतील पत्रकार बांधव, पोलिस प्रशासन व इतर क्षेत्रातील विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यानंतर दैनिक तरूण भारतने काढलेल्या विशेष पुरवणीचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

**हजारो भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन**

श्री विष्णू-महादेव यात्रा सोहळ्याच्या आजच्या मुख्य दिवशी तामलवाडीसह सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील हजारो भाविकांनी श्रीचे दर्शन घेतले, अनेकांनी आपले नवस फेडले. शेरण्याचा विशेष कार्यक्रमही आज पार पडला.

सकाळी ५. वाजेपासूनच भाविकांची वर्शनासाठी रीघ लागली होती, सायंकाळी ५ वाजता कुस्त्यांचा फड पार पडला. येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दिवसभर महाप्रसाद होता.

बुधवार, दि. १ एप्रिल रोजी रात्री देवाची पालखी नगरप्रदक्षिणा होणार आहे. तर गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी हनुमान जयंतीनिमित्त कीर्तन सोहळा होवून महाप्रसाद कार्यक्रम पार पडणार आहे. यानंतर यात्रेची सांगता होणार आहे.

## ट्रकमधील रंगाचे डबे नेले चोरुन

**सोलापूर :** ट्रकमधील रंगाचे डबे चोरुन नेल्याची घटना हैदराबाद रोडवरील बंदेनवाज हॉटेलजवळ दि.२८ मार्च रोजी घडली. कर्नाटक राज्यातील समीर हमीद चुडीवाले (वय-५८, रा.हुमनाबाद) यांनी आपली ट्रक बंदेनवाज हॉटेलजवळ लावून जेवण करण्यासाठी गेले होते. तेव्हा ट्रकवर चढून पाहिले असता एशियन कंपनीचे रंगाचे १० डबे चोरट्याने चोरुन नेल्याचे निदर्शनास आले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



### यंत्रोधारक हनुमान मंदिरच्या वतीने गुरुवारी विविध धार्मिक कार्यक्रम

सोलापूर : श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त यंत्रोधारक हनुमान मंदिरच्या वतीने होम मैदानजवळील श्रीमहासिध्द व अमोगसिध्द मंदिर येथे गुरुवार, दि.२ एप्रिल २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष संतोष पुजारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. 'श्री'स अभिषेक, पुष्पार्चना, सहस्त्रनामार्चना, हनुमान सहस्त्रनाम, हनुमान चालिसा, गदा पूजन, पाळणा, होमहवन, महाआरती असे कार्यक्रम होणार आहेत. नगरसेविका श्रीदेवी फुलारे, स्त्रीशक्ती फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा किरण माशाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस अनिकेत खजिनदार, रितेश खांडेकर, सुरज पुजारी, प्रणित जबडे, शेखर बंगाळे उपस्थित होते.



# भगवान महावीरांचा जन्मोत्सव 'न भूतो, न भविष्यती'

## दिगंबर, श्वेतांबर जैन समाजाची संयुक्त शोभायात्रा

## जैन मुनींच्या पावन सानिध्यात साधकांचा उत्साह

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ मार्च-

**जैन मुनींच्या पावन सानिध्यात भगवान महावीर यांच्या २६२५ व्या जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त मंगळवारी शहरात दिगंबर आणि श्वेतांबर जैन समाजाच्या वतीने संयुक्तपणे काढण्यात आलेली शोभायात्रा न भूतो न भविष्यती अशी ठरली. प्रथमच सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील सकल जैन समाजातील बांधवांनी आपल्या कुटुंबासह उपस्थिती लावत हे ऐतिहासिक ऐक्य अधोरेखित केले.**



▸ नवलबाई फुलचंद शहा-कोठारी प्रशालेचे लेझिम पथक



▸ जैन मुनीच्या सानिध्यात निघालेल्या शोभायात्रेत जैन समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



▸ जैन धर्माचा १०८ फुटीचा पंचरंगी ध्वज शोभायात्रेचे आकर्षण होते.

शोभायात्रेची सुरुवात सकाळी ८ वाजता आचार्य शांतीसागर महाराज चौक (रंगभवन) येथे उत्साहात झाली. तत्पूर्वी सकाळी ७ वाजता डॉ. सुहास रतिलाल करकमकर-शहा यांच्या हस्ते ध्वजारोहण व वीरध्वज वंदन करण्यात आले. जैन महिला विकास मंडळाच्या महिलांनी ध्वज गीत सादर केले. यावेळी निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी उपस्थितांना मंगल आशिष दिले. भगवान महावीरांचे जगा आणि जगू द्या हे तत्वज्ञानच जगाला शांतीचा मार्ग दाखवेल, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

**भक्तीचा महाकुंभ आणि मार्गक्रमण**

कलेक्टर कचेरी येथून निघालेली ही शोभायात्रा विजापूर वेस, माणिक चौक, मधला मारुती, सराफ कट्टा मार्गे मंगळवार पेठ पोलीस चौकी येथे आली. याच वेळी जोडभावी पेठेतील श्री आदिश्वर मंदिराची मिरवणूक मुख्य शोभायात्रेत सामील झाली. ही भव्य संयुक्त शोभायात्रा पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. फलटण गल्ली, बाळीवेस, टिळक चौक, कुबेर गल्ली, फौजदार चावडी मार्गे मार्गक्रमण करत असताना ठिकठिकाणी रांगोळ्या आणि पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी श्वेतांबर समाजाचे आचार्य देव श्री दिव्येशसागरसुरीश्वरजी, साध्वी श्री चंद्ररत्नाश्रीजी तसेच दिगंबर समाजातील मुनिश्री १०८ विशालसागरजी, धवलसागरजी, मंथनसागरजी, मननसागरजी, विरलसागरजी महाराज आणि क्षुल्लक श्री १०५ विजितसागरजी महाराज उपस्थित होते.

**मिरवणुकीचा समारोप आणि वात्सल्य भोज**

सकाळी ११:०० वाजता माणिक चौक येथे मिरवणुकीचा समारोप झाला, जिथून सर्व पालख्या आपापल्या स्थळी रवाना झाल्या. श्री आदिनाथ मंदिरात सुवर्ण कलशाने पंचामृत अभिषेक व शांतीधारा करण्यात आली. मुनिश्रींची आहारचर्या महावीर भवन येथे संपन्न झाली. यानंतर महावीर सांस्कृतिक भवन येथे आयोजित वात्सल्य भोजाचा हजारो जैन बांधवांनी लाभ घेतला. या सोहळ्यात अध्यक्ष सुनील गांधी, डॉ. रणजीत गांधी, श्री पराग शहा, शिरीष शहा, पराग गांधी, संजय शहा, मनोज शहा, पुष्कर शहा, श्याम पाटील, वनकुदरे, शिरसोडे, कंदले, इंद्रमल जैन, कनूभाई शहा, पदमजी राका, कैलाश कोठारी, चेतन बाफना, कल्पेश मालू, गौतम संचेती, रमेश डाकलिया, विजय डाकलिया, सुभाष लोणावत, केतनभाई शहा, विकास संघवी, राजेश जैन, गौतम सुकलेचा, राजा गांधी, उन्मेष करनावट, गौतम छाजेड, चेतन सुराणा, संजय सेठिया, विनोद सेठिया आदी मान्यवर सहभागी झाले होते. हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट आणि जैन श्वेतांबर आदेश्वर भगवान मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी आणि सकल जैन समाजाने विशेष परिश्रम घेतले.

### आकर्षक शोभायात्रा आणि लेझीम पथक

त्रिशला नंदन वीर की, जय बोलो महावीर की आणि वर्धमान महावीर की जय अशा जयघोषाने आज सोलापूर शहर दुमदुमून गेले. सकाळी ८ वाजता निघालेल्या या शोभायात्रेत हत्ती, घोडे, १२ बग्गी आणि १०८ फुटांचा विशाल जैन ध्वज सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. दिगंबर समाजाची चांदीची पालखी आणि श्वेतांबर समाजाची चांदीची बग्गी यात भगवान महावीर विराजमान होते. जैन गुरुकुल, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सर्वोदय विकास प्रभावना ट्रस्ट, नवलबाई फुलचंद शाह कोठारी शाळा, खमितकर बालक मंदिर आणि लाल बहादूर शास्त्री हायस्कूलचे विद्यार्थी व कर्मचारी सहभागी झाले होते. कोठारी प्रशालेच्या लेझीम पथकाने आणि महिला-पुरुषांच्या भजन-दांडिया पथकाने शोभायात्रेत रंगत भरली.

# चेसी क्रॅक बसेस् प्रकरण : संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचा निर्णय

## ● परिवहन उपक्रमाचा ६४ कोटींच्या अंदाजपत्रकाला मंजुरी ● ई-बसेस्सह ४० बसेसचे केले बजेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

चेसी क्रॅक बसेस्प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचा निर्णय एकमताने घेण्यात आला. सोलापूर महापालिका अंतर्गत परिवहन उपक्रमाचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा ६४ कोटी ५० लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला महापालिका सभेत एकमताने मान्यता देण्यात आली.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन उपक्रमाच्या अंदाजपत्रकावर विशेष बैठक घेण्यात आली. महापालिका परिवहन समिती स्थापन न झाल्याने परिवहन उपक्रम प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकावर स्थायी समितीत



मान्यता देऊन पुढील शिफारसीसाठी सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात आले होते. स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांनी सदर अंदाजपत्रक मांडला. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी या संदर्भातील सूचना केली. विरोधी पक्षाकडून यावर कोणतीही उपसूचना आले नव्हते. सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये एकूण १० ते १२ बसेस धावलेले असून आता बसेसची संख्या ही ३५ इतकी दाखविण्यात आली आहे. सन २०२६-२७ मध्ये केंद्र शासनाकडून येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील ३० बसेससह ४० पेक्षा अधिक बसेस धावणार आहेत. त्यामधून उत्पन्नात वाढ आणि प्रवाशांची सोय होणार असल्याचे नव्या अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

गतवर्षी परिवहनचे अंदाजपत्रक हे ५९ कोटी ३१ लाखाचे होते. यामध्ये यंदा ५ कोटी १९ लाख रुपये वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी महापालिकेकडून परिवहन विभागाला अनुदान स्वरूपात १४ कोटी रुपये मिळालेले आहे. चालू आर्थिक वर्षात देखील महापालिकेकडून १७ कोटी ३२ लाख ८० हजार रुपयांचे अनुदान अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**अशी असणार परिवहन उपक्रम जमा बाजू**

| विभागाचे नाव | अंदाजित तरतूद रक्कम |
|---|---|
| आरंभी शिल्लक | १ लाख |
| वाहतूक विभाग | ६ कोटी ४७ लाख २५ हजार ८०७ |
| कर्मशाळा विभाग | ८१ लाख ४१ हजार ८५८ |
| महापालिकेकडून आर्थिक सहाय | १७ कोटी ३२ लाख ८० हजार |
| पीएमईव्ही बसेसमधून मिळणारे उत्पन्न | १४ कोटी ७१ लाख १२ हजार १३४ |
| महापालिका शासन अनुदान | २३ कोटी ७४ लाख ९३ हजार ६२८ |
| ॲडव्हान्स/डिपॉझिट | १ कोटी ४० लाख ८१ हजार ५०० |
| बँक व्याज जमा | १ लाख २६ हजार ४९६ |
| एकूण | ६४ कोटी ५० लाख ६१ हजार ४२३ |

**परिवहन उपक्रम असे होणार खर्च**

| विभागाचे नाव | अंदाजित खर्च रक्कम |
|---|---|
| डिझेल विभाग | ४ कोटी |
| कर्मशाळा विभाग | १ कोटी ३९ लाख |
| वाहतूक विभाग | १४ कोटी ०२ लाख ३५ हजार |
| ड्युटी क्लार्क | ५ कोटी ६४ लाख ०१ हजार ५५१ |
| पेन्शन विभाग | ८ कोटी ०५ लाख ३५ हजार २०० |
| प्रा. फंड विभाग/ ईएसआय | २ कोटी ५२ लाख ६१ हजार |
| स्टेशनरी विभाग | १३ लाख ५० हजार |
| परिवहन सभापती खर्च | १७ लाख |
| लेखा विभाग | ५८ लाख ०१ हजार ३०० |
| कोर्ट / विधी विभाग | ५४ लाख |
| थकीत देणी २६ कोटी | १६ लाख ६० हजार १२६ |
| सण ॲडव्हान्स वर्ग | ८ लाख |
| ॲड./डिपॉझिट | १ कोटी १९ लाख १७ हजार ०१० |
| बँक चार्जेस | २३६ रुपये |
| शिल्लक | १ लाख |
| एकूण | ६४ कोटी ५० लाख ६१ लाख ४२३ |

### पिशवीत आढळला २२७ ग्रॅम गांजा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

रजाक गफूर शेख (वय-४९, रा.थोबडे वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर) याच्या पिशवीमध्ये २२७ ग्रॅम गांजा व राहत्या घराच्या परिसरात ५९ गांजाचे झाडे आढळून आली.

**घराच्या परिसरात ५९ गांजाची झाडे लावली**

अवैधरित्या विक्री करणे व गांजा झाडाची लागवड केल्याप्रकरणी पोलिस मुकेश गायकवाड यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला.

# थकीत मानधनाचा प्रश्न सुटला!

# ऑपरेटरचे ४.६७ कोटी रुपये अखेर जमा

## २५० ग्रामपंचायतींकडून जिल्हा परिषदेकडे निधी वर्ग; उर्वरितांवर कारवाईचा इशारा




**अंतिम निर्णयाची प्रतीक्षा :** ज्या ग्रामपंचायतींमध्ये प्रत्यक्षात सेवा उपलब्ध आहे, त्यांच्याकडूनच मानधन घेण्याचे धोरण अवलंबले जात आहे. जिथे सेवा नाही, तिथे अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे.सध्या संबंधित ग्रामपंचायतींची यादी तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, पुढील दोन दिवसांत आकडेवारी स्पष्ट होणार आहे. त्यानंतर कोणत्या ग्रामपंचायतींकडून मानधन वसूल करायचे आणि कोणाला सूट द्यायची, याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

- **सूर्यकांत भुजबळ,** उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ मार्च**

जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडे प्रलंबित असलेल्या ऑपरेटरच्या मानधनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून तब्बल ४ कोटी ६७ लाख रुपयांची रक्कम जिल्हा परिषदेकडे जमा करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या कठोर भूमिकेमुळे आणि सुनावणी प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींनी ही थकीत रक्कम भरण्यास सुरुवात केली.

जिल्ह्यात एकूण ३२५ ग्रामपंचायती असून, 'आपले सरकार सेवा केंद्र' अंतर्गत विविध दाखले व सेवा देण्यासाठी नियुक्त केलेल्या ऑपरेटरचे मानधन अनेक ठिकाणी थकले होते. ही थकबाकी सुमारे ४.६७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली होती.


या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामसेवक आणि विस्तार अधिकाऱ्यांची सुनावणी घेतली व थकीत मानधन तातडीने जमा करण्याचे आदेश दिले. या आदेशाचा परिणाम म्हणून सुनावणीपूर्वीच १५० हून अधिक ग्रामपंचायतींनी आपली थकबाकी भरली होती. त्यानंतर सुनावणी पूर्ण झाल्यावर आणखी काही ग्रामपंचायतींनी मानधन जमा केले. आतापर्यंत ३२५ पैकी २५० हून अधिक ग्रामपंचायतींनी सुमारे ४ कोटी रुपयांची रक्कम जिल्हा परिषदेकडे वर्ग केली आहे.

**इंटरनेट अभावी अडचणी**

अनेक ग्रामपंचायतींनी इंटरनेट सुविधेअभावी ऑपरेटरची गरज नसल्याचे सांगितले आहे. काही ठिकाणी दोन ग्रामपंचायतींसाठी एकच ऑपरेटर कार्यरत असल्याचेही समोर आले आहे. काही ग्रामपंचायतींमध्ये गेल्या दोन वर्षांपासून ऑपरेटरच नियुक्त केलेला नाही. इंटरनेटच नाही, तर ऑपरेटर कशासाठी? असा सवाल काही सरपंचांनी उपस्थित केला आहे.

**प्रशासनाचा तोडगा**

प्रशासनाने याप्रश्नी मध्यम मार्ग स्वीकारण्याची तयारी दर्शवली आहे. ज्या ग्रामपंचायतींमध्ये ऑपरेटर कार्यरत आहेत आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे, त्या ग्रामपंचायतींकडूनच मानधन वसूल केले जाणार आहे. तर ज्या ग्रामपंचायतींमध्ये ऑपरेटर नाहीत किंवा इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही, अशा ग्रामपंचायतींना या मानधनातून सूट देण्याचा विचार सुरू आहे. यासाठी संबंधित ग्रामपंचायतींची स्वतंत्र यादी तयार करण्यात येत आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३९९

**वैद्य वांचविती जीवा ।
तरी कोण ध्यातें देवा ।।**

श्रध्दा आणि अंधश्रध्दा या दोन परस्परविरोधी आहेत. श्रध्दा ही आवश्यक असणारी तर अंधश्रध्दा ही अजिबात नको असणारी बाब आहे. संत महात्म्यांनी, समाज सुधारकांनी खूप प्रयत्न करूही अंधश्रध्देचे समाजातून पूर्णत: उच्चाटन झालेले नाही, असे म्हणायला वाव मिळतो. अंधश्रध्दा हा मानवी जीवनातील तसेच मानवाच्या विकासातील सर्वात मोठा अडसर असला तरीही मानव अंधश्रध्देची जोपासणूक करीत असल्याचे अधून मधून पहायला मिळते. संत महात्म्यांनी अत्यंत कडक शब्दात अंधश्रध्देवर धाव घातल्याने समाज बऱ्याच प्रमाणात अंधश्रध्देतून बाहेर पडल्याचे आज पाहायला मिळते. स्वत: कसल्याही प्रकारचे कष्ट न करता देवाचे नामस्मरण केल्याने किंवा मूर्ती पूजेत मग्न राहिल्याने आपले सर्व व्यवस्थित होईल, या कल्पनेतून वारकरी सांप्रदाय बाहेर पडला आहे. पण ज्या लोकांपर्यंत संत महात्म्यांचे विचार पोहचले नाहीत, किंवा संत महात्म्यांच्या विचाराचा खरा



अर्थ समजला नाही, तसेच कायदयाचे ज्ञान झाले नाही, असे लोक कमी अधिक प्रमाणात अंधश्रध्देला श्रध्दा मानतात. अंधश्रध्दाळू किंवा दैववादी प्रवृत्ती जोपासल्यामुळे आपले व पर्यायाने समाजाचे नुकसान होत आहे, याची जाण अशा लोकांना नसावी. एखादा रोग, अपघात झाला तर वैद्याकडे जाऊन औषधोपचार घ्यायला पाहिजे. पण औषधोपचार न घेताही ईश्वर आपले भले करील म्हणून शांत बसून राहणे चुकीचे असते. वैद्याच्या सल्ल्यानुसार वागल्याने किंवा वैद्याने औषधोपचार केल्याने रोगी वाचला तर त्याचे श्रेय वैद्याला न देता ईश्वरानेच रोग दूर केला, असे म्हणणे संयुक्तीक नाही. अशा दैववादी व अंधश्रध्दाळू प्रवृत्तीवर तुकाराम महाराजांनी घाव घातला आहे.

सर्व प्राणीमात्राच्या ठिकाणी एका भगवंताला पाहून त्यांची सेवा करणे, त्यांना मदत करणे योग्य असते. पण आपण कोणाला मदत करण्याची, सहकार्य करण्याची गरज नाही. आपण फक्त उपवास, व्रत वैकल्ये केले तरी पुरेसे आहे,असा समज ठेवणे चुकीचे आहे. केल्याशिवाय कांहीही होत नाही. ईश्वर येऊन कोणाचे कांही करीत नाही. आपले कर्तव्यच खऱ्या अर्थाने ईश्वराचे स्वरुप होय. कर्तव्य न कता आळशी वृत्ती जोपासून जीवन जगणाऱ्यांना ईश्वरही साथ देत नाही. कारण ईश्वर म्हणजे दुसरे- तिसरे कांही नसून आपण सर्व जीव मात्रच ईश्वर आहोत. स्वकष्ट न करता कांही प्राप्त होत नसल्याने स्वकष्टाचे श्रेयही इतरांना देण्याचे कारण नाही. दे रे देवा पलंगावरी ही वृत्ती झुगारून आपण आपल्या कर्तव्याकडे वळायला हवे. कोण्याही संत महात्म्यांनी अंधश्रध्देला खतपाणी घातले नाही किंवा त्यांच्या जीवनात त्यांनी किंचितही अंधश्रध्देला स्थान दिले नाही. त्यामुळे आपणही त्यांच्या पावलावर पाऊल टाकून कर्तव्यतत्पर व्हायला हवे. कर्तव्यप्रसंगी आपली तत्परता हेच आपल्या जीवनाचे खरे यश असणार आहे. त्याचबरोबर आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार असणार आहोत, हे या प्रसंगी लक्षात ठेवायला हरकत नसावी. जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. १ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - फाल्गुन शु. चर्तुदशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- उ. फाल्गुनी (१६.१७)
योग - वृद्धि (१४.५०)
करण - विष्टि (१९.२०)
राहू काल : बुधवार
दु. १२.०० ते १.३०

दिनविशेष :
एप्रिल फूल डे: विनोदी आणि खोडकर दिवस म्हणून साजरा केला जातो.
आर्थिक वर्ष: भारतात व्यवसायांसाठी आणि करारांसाठी नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात होते.
१८८७: मुंबई अग्निशमन दलाची स्थापना.
१९३५: रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ची स्थापना.
१९४१: भारतीय क्रिकेटपटू अजित वाडेकर यांचा जन्म.




## रिकामी पोट राहणे म्हणजे 'रोजा' नव्हे : डॉ. सय्यद

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ मार्च-**

मानवजात कशी एकाच जोडप्याची लेकरे आहेत, सर्व मानव एकाच आईबापापासून आहेत हे कुराणच्या आयतीचा/श्लोकाचा दाखल देत तसेच आधुनिक विज्ञानचा दाखला देत समजावून सांगितले. रोजाचे महत्व, ईदचा अर्थ सांगत रोजा फक्त रिकामी पोट राहण्याचे कार्य नसून, वाईट संगत, वाईट गोष्टी पासून दूर राहून आपली स्वच्छ प्रतिमा सुधारण्याचे काम उपवासाच्या माध्यमातून केले तरच खरा रोजा होवू शकते. हे चांगले कार्य वर्षभर चालले पाहिजे. म्हणजे रोजा उपवास हे आम्हास प्रत्येक वर्ष चांगल कार्याची ट्रेनिंग देत असतो, असे मत डॉ. रफिक सय्यद (पारनेर) यांनी व्यक्त केले.

जमाते इस्लामी हिंद सोलापूर आणि सद्भावना मंचतर्फे निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे ईद मिलनचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. कुरान पठणाने कार्यक्रमाची सुरवात झाली. सद्भावना मंचचे सचिव शफिक काझी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. इसलाईल शेख यांनी स्वागत केले यानंतर विजयपूर, कर्नाटक येथील बसव तत्वविक डॉ. जे. एस. पाटील बसव यांनी लिंगायत धर्मामधील एकेश्वरवाद, महात्मा बसवण्णाची शिकवण फारच विस्तृतपणे माडली. व राष्ट्रिय एकात्मेला मजबूत करणारे अशे कार्यक्रम सतत व्हावे अशी अपेक्षा ही व्यक्त केली. सूत्रसंचालन अब्दुल करीम यांनी केले तर आभार सदभावना मंचचे अध्यक्ष अशोक आगवने ह्यांनी केले. कार्यक्रमाला जाकराज पाटील, शफी कैप्टन, राम गायकवाड, सिराज अहमद, हसीब नदाफ, अय्युब अहमद नल्लामंदू , जाफर बांगी, डॉ. कुरेशी, शफीक अन्सारी, डॉ. इसहाक मुजावर उपस्थित होते.

# आजपासून माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियान

## सोलापूरसह राज्यभर वर्षभर मोहीम; प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांवर भर

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.३१ मार्च-**

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम, स्वयंपूर्ण आणि रोगमुक्त करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाला मंजुरी दिली असून, या राज्यव्यापी आरोग्य चळवळीची सुरुवात दि.१ एप्रिल पासून होत आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही योजना लोकसहभागावर आधारित असून, सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात ती प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.या अभियानाच्या प्रारंभानिमित्त पुणे येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी दिली.




१ एप्रिल ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत वर्षभर चालणाऱ्या या मोहिमेचा मुख्य उद्देश गावपातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावणे हा आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध या तत्त्वावर आधारित या उपक्रमातून प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देण्यात येणार आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या आरोग्यविषयक सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

### लोकसहभागातून उभी राहणारी आरोग्य क्रांती

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' ही योजना केवळ शासकीय उपक्रम नसून लोकसहभागातून उभी राहणारी व्यापक आरोग्य चळवळ आहे. या माध्यमातून ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळेल आणि आरोग्यदायी महाराष्ट्राच्या संकल्पनेला बळकटी मिळेल, असे मत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी व्यक्त केले.

### स्थानिक पातळीवर नियोजनाला वेग



सोलापूर जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या मार्गदर्शनाखाली केली जाणार आहे. यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. स्थानिक पातळीवर समन्वय साधून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### अंमलबजावणीची ठोस रचना

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्राम पंचायत स्तरावर स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष आरोग्यमंत्री असतील, तर विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील. गावांचे मूल्यमापन करून ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून घोषित केले जाणार आहे. अशा गावांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. या अभियानासाठी ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### भगवान महावीरांचा अहिंसेचा संदेश सर्वांनी पुढे नेऊ या



''भगवान महावीरांनी जो अहिंसेचा संदेश दिला आणि ज्याला धर्म मानले, तोच संकल्प आपण सर्वांनी मिळून पुढे नेला पाहिजे. हा संदेश केवळ ऐकण्यापुरता मर्यादित न ठेवता तो आयुष्यभर पाळला, तरच अहिंसेचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचेल,'' असे प्रतिपादन जैन मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी केले. मंगळवारी सकाळी महावीर जयंतीनिमित्त रंगभवन येथील आचार्य शांतीसागर महाराज चौकात ध्वजारोहण प्रसंगी ते श्रावकांना संबोधित करत होते. मुनीश्री म्हणाले, संसारातील वास्तविकता जपायची असेल, तर मनातील अहंकाराचा भाव पूर्णपणे सोडून दिला पाहिजे. ज्याचे जीवन विनयाने भरलेले असते, तोच भगवंताचा खरा उपासक मानला जातो. शिक्षण संस्थांच्या माध्यमातून समाजकार्य वाढवा यावेळी त्यांनी सोलापूरच्या जैन समाजाच्या कार्याचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, सोलापूरमध्ये जैन समाजाच्या इतक्या मोठ्या प्रमाणावर शिक्षण संस्था आहेत, ज्या समाजकार्य करत आहेत. एवढ्या मोठ्या शिक्षण संस्थांचे जाळे इतरत्र कुठेही पाहायला मिळत नाही. आपल्या पूर्वजांनी ही मोठी संपत्ती आपल्या हाती सोपवली आहे. या महान वारसाचा आपल्याला स्वाभिमान वाटला पाहिजे. आता हे कार्य अधिक जोमाने पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे. या शिक्षण संस्थांमधून हजारो कुटुंबे शिकून बाहेर पडली असून ती राष्ट्राच्या प्रगतीत मोठे योगदान देत आहेत. केवळ स्वत:चा विकास न साधता, क्षमा आणि करुणेचा भाव मनात ठेवून एखाद्या गरजू कुटुंबाला दत्तक घ्या. हीच खरी धर्मप्रभावना आहे. आपल्या पूर्वजांनी आचार्य शांतीसागर महाराज यांची निष्ठेने सेवा केली आहे. आपण त्याच महावीरांचे वंशज आहोत ज्यांनी धर्म केवळ सांगितला नाही तर तो जगाला आणि विश्वाच्या कल्याणासाठी अर्पण केला. सोलापूरमधील सर्व जैन शिक्षण संस्थांनी आणि समाजाने एकजूट होऊन हे सेवाकार्य अधिक व्यापक करावे, हाच खरा धर्म आहे, असेही मुनीश्री म्हणाले.

## वखारिया विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ३१ मार्च-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची भारतीय लष्कर आणि पोलिस दलात स्थान मिळवून विद्यालयाचा आणि गावाचा नावलौकिक वाढवला आहे. या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.



भारतीय लष्करात (आर्मी) निवड झालेले खाजा दाऊद बाबूलाल बागवान, पुणे शहर पोलीसपदी निवड झालेले अमन रहिमान मुलाणी आणि सोलापूर शहर पोलीसपदी निवड झालेली नंदिनी घायतिडक या गुणवंत विद्यार्थ्यांचा मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. लष्करात भरती झालेल्या खाजा बागवान याने देश सेवेचे स्वप्न पूर्ण केले, तर अमन मुलाणी आणि नंदिनी घायतडक यांनी पोलीस दलात प्रवेश मिळवून खाकी वर्दीचा मान वाढवला आहे. याप्रसंगी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सहशिक्षक दत्तात्रेय राऊत, प्रशांत काशीद, अनिल वैद्य, नामदेव महाले, राठोड, मकरंद जगदाळे, रेवनसिद्ध दुलंगे आणि वाघ उपस्थित होते.

## जड वाहतूक तातडीने बंद करा

### अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडणार

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ मार्च-**

सोलापूर शहरात दिवसेंदिवस वाढणारी जड वाहतूक आणि त्यातून होणारे जीवघेणे अपघात रोखण्यासाठी 'जडवाहतूक विरोधी नागरी कृती समिती' आक्रमक झाली आहे. शहरांतर्गत जड वाहतूक तातडीने बंद करण्यात यावी, या मागणीसाठी समितीचे निमंत्रक निरंजन बोधुल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलीस उपायुक्त हसन गौहर यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी प्रशासनाला आंदोलनाचा इशाराही देण्यात आला.

प्रशासकीय दुर्लक्षामुळे सामान्य नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शहरांतर्गत जड वाहतूक त्वरित पूर्णपणे बंद करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.



अत्यंत आवश्यक साहित्यासाठी केवळ रात्रीच्या वेळी किंवा दुपारी ठराविक दोन तासांसाठीच परवानगी द्यावी, असा आग्रह समितीने धरला आहे. निवेदनाची दखल घेत पोलीस उपायुक्त हसन गौहर यांनी सोलापूर शहरातून तातडीने जड वाहतूक बंद करण्याचे आश्वासन दिले. जर प्रशासनाने यावर ठोस कार्यवाही केली नाही, तर सोलापूरकरांच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडले जाईल आणि होणाऱ्या नुकसानीस प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा निरंजन बोधुल यांनी दिला आहे. याप्रसंगी प्रभाकर भोंगे, बालाजी नल्ला उपस्थित होते.



## अस्लम यासीन यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ मार्च-**

जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा सिद्धापुर (ता. मंगळवेढा) येथील कर्तव्यदक्ष शिक्षक अस्लम यासीन जहाँभाई यांना जिल्हा परिषद पंचायत समिती शिक्षण विभाग मंगळवेढातर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार आमदार समाधान महादेव आवताडे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा आमदार व दिपाली आनंद ताड सभापती पंचायत समिती मंगळवेढा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आदर्श शिक्षक असलम यासीन जहाँभाई हे राष्ट्रीय कार्य कोविड योद्धा म्हणून जिल्हा परिषद सोलापूरतर्फे सन्मानित आहे. अंधश्रद्धा निर्मूलन व वृक्षरोपण कार्य करत आहेत. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत तालुक्यात तृतीय क्रमांक मिळवला.

## कारने दिली दुचाकीला धडक



**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.३१ मार्च-**

नातेवाईकांना भेटण्याकरिता दि. ३० मार्च रोजी सिद्राम सखाराम होटकर, वय ५५, रा. भगवंत सोसायटी, सोलापूर हे दुचाकी क्रमांक एम एस १३ डीबी ८६५० वरून निघाले असता आरोपीची कार क्रमांक एमएच ०२ सीआर ४३६३ चा मालक यांनी त्यांच्या ताब्यातील कार वेगाने अचानक वळण घेऊन समोर सिद्राम होटकर यांच्या दुचाकीस जोराची धडक दिली त्यामध्ये त्यांच्या कपाळाला कच लागून जखम झाली. दोन्ही पायास मुक्कामार लागला व उजव्या पायाच्या हाडाला मार लागून क्रॅक झाले. त्यांच्या दुचाकीचे ही नुकसान झाले. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात दि. ३० मार्च रोजी आरोपी विरोधात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास गायकवाड करत आहेत.

## श्री बिरोबा-महालिंगराया देवाच्या यात्रेला २ एप्रिलला प्रारंभ

### पालखी भेट सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ मार्च-**

श्री बिरोबा महाळिंगराया देवाची यात्रा महोत्सव व पालखी भेट सोहळा सन २०२६ निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमेनिमित्त हा उत्सव अश्विनी हॉस्पिटलसमोर, लष्कर परिसरातील मंदिरात होणार आहे, अशी माहिती अमोल कारंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली

या यात्रेनिमित्त अभिषेक, महापूजा, पालखी सोहळा, पालखी भेट, ओव्या, वीर खेळणे तसेच महाप्रसाद वाटप असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत कार्यक्रम पार पडणार असून, सायं. ६ वाजता मुख्य सोहळा होणार आहे. कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, खासदार प्रणिती शिंदे, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार राम सातपुते, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, काँग्रेस शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांच्यासह सोलापूर महापालिकेतील धनगर समाजाचे नगरसेवक उपस्थित राहणार आहेत. मंदिर परिसर सुधारणा व सुशोभीकरणासाठी सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी महापालिका अंदाजपत्रकात ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती ही अमोल कारंडे यांनी दिली. श्री बिरोबा देवस्थान व यात्रा समितीच्या वतीने सोलापूर शहर व जिल्ह्यातील भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस प्रा. देवेंद्र मदने, संतोष नरोटे, आकाश बनणे, राम वाकसे, शेखर बंगाळे आदी उपस्थित होते.

## लिंगायत स्मशानभूमी वादात संस्था आणि समाजाला वेठीस धरू नका : विजयकुमार हत्तुरे

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ मार्च-**

लिंगायत स्मशानभूमीच्या वादामध्ये लिंगायत समाजाच्या दोन्ही संस्था व समाजाला वेठीस धरू नये. सोलापूर महापालिकेनेच याचे व्यवस्थापन करावे, अशी मागणी जागतिक लिंगायत महासभा प्रदेश कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी पत्रकार परिषदेत केली.

सोलापूर शहरातील लिंगायत समाजाच्या जिव्हाळ्याचा आणि अत्यंत संवेदनशील प्रश्न म्हणजे स्मशानभूमीचा प्रश्न आहे. अक्कलकोट रोड लगत असलेली जागा सोलापूर महानगरपालिकेने लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीसाठी देण्याचा प्रस्ताव महापालिकेत आणला होता. समाजाच्या दृष्टीने हा निर्णय स्वागतार्ह असला तरी, त्या स्मशानभूमीची देखभाल सिद्धेश्वर देवस्थान समितीकडे द्यावी की होटगी मठाकडे, यावरून अनावश्यक वाद आणि टीका सुरू झाली आहे. या विषयामध्ये सध्या राजकारण होत असल्याचे दिसून येत आहे. काही मंडळी केवळ श्रेयवादासाठी आणि राजकीय पोळी भाजण्यासाठी मंदिर समिती आणि मठ यांच्यामध्ये मुद्दाम वाद निर्माण करत आहेत. हा प्रकार समाजहिताला घातक असून, यामुळे संपूर्ण लिंगायत समाज बदनाम करण्याचे कटकारस्थान रचले जात असल्याची भावना समाजामध्ये निर्माण होत आहे असा आरोप हत्तुरे यांनी केला.

शहरातील सर्व स्मशानभूमी महापालिकेच्या अखत्यारीत घेऊन सर्व बाबींसह अद्ययावत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी त्यांनी केली. श्रेय वादापेक्षा सामाजिक विकासाला प्राधान्य द्यावे असे मत यावेळेस राजेश काळे माजी उपमहापौर यांनी व्यक्त केले

सन २०२१ मध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये, तत्कालीन उपमहापौर राजेश काळे यांनी मजरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेजवळील चौकास लि. ष. ब्र. तनवीर शिवाचार्य महाराज विसावा चौक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मांडला होता. मात्र त्यावेळी तत्कालीन सभागृह नेते शिवानंद पाटील, तत्कालीन नगरसेवक वैभव हत्तुरे यांनी या प्रस्तावाला विरोध करून तो बारगळला होता. हा प्रस्ताव म्हणजे समाजाच्या भावना आणि होटगी मठाच्या सन्मानाशी निगडित असल्याने, संबंधितांनी समाजाची आणि होटगी मठाची जाहीर माफी मागावी, अशी मागणी विजयकुमार हत्तुरे यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेस माजी उपमहापौर राजेश काळे, लिंगायत समाजाचे समन्वयक शकलेश बाबुळगावकर, सिद्धाराम कटारे, गणेश धोकटे उपस्थित होते.

## गॅसचे केवायसी होत नसल्याने भिरकावला दगड

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.३१ मार्च-**

साईराम गॅस एजन्सी येथे दि. ३० मार्च रोजी अन्नपूर्णा राजू पद्मा, वय ५०, रा. १०३ चाकोते नगर, जुना वीडी घरकुल, सोलापूर व वासुदेव लक्ष्मण बंदगी असे गॅस बुकिंग करताना करिता उभे असता आरोपी सोमनाथ सिद्राम धनुरे, वय ४२, रा. प्लॉट नंबर २१९, किसान संकुल, जवाहर नगर, सोलापूर याने त्याच्या गॅसचे केवायसी होत नसल्यामुळे त्या रागाच्या भरात तेथेच रोडवर पडलेला दगड उचलून साईराम गॅस एजन्सीच्या लोखंडी जाळीवर भिरकावल्यामुळे तो दगड जाळीला धडकून उडून अन्नपूर्णा पद्मा यांच्या डोक्यास व त्यांच्या पाठीमागे उभे असलेल्या लक्ष्मण बंदगी यांच्या डोक्यास लागून मुकामार लागला.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात दि. ३० मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास कटके करत आहेत.



## 'सीपीआर' दिल्यास व्यक्तीचे प्राण वाचू शकतात : डॉ. बसवराज सुतार

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ मार्च-**

आपण जवळ असताना एखाद्याला हृदय विकाराचा झटका आल्यास प्रथम त्याची नाडीची स्पंदने, श्वास चालू आहे का हे पहा जर चालू असेल तर पेशंटला मिनिटाला शंभर वेळा याप्रमाणे सी.पी.आर देण्यास सुरुवात करावी आणि वेळेत दवाखान्यात पोहोचवावे असे केले तर संबंधित व्यक्तीचे प्राण वाचवू शकतात असे प्रतिपादन हृदयरोग तज्ञ डॉ. बसवराज सुतार यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सन फार्मा यांच्यावतीने फुफ्फुस व हृदय पुनरुज्जीवन प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. अशोक यक्कलदेवी, राजकीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर राजे व डॉ. अँनी जॉन उपस्थित होत्या.

सुतार म्हणाले की, आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी वयाच्या ४० चे पर्यंत सर्व प्रकारचे व्यायाम केले तरी चालते पण ४० नंतर शरीराला ताण देणारे व्यायाम करावेत. वेगाने चालणे, सावकाश चालणे, सूर्यनमस्कार, योगा व प्राणायाम सारख्या व्यायामामुळे आपल्या हृदयाबरोबर फुफ्फसाचे आरोग्य चांगले राहते. आदित्य बोने यांनी प्रास्ताविक केले. डॉ शंकर राजे यांनी आभार मानले. विनायक चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### 'स्वेरी'तील प्राध्यापकांची पुण्याच्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटला भेट

**पंढरपूर, दि.३१ मार्च -**

येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या चार प्राध्यापकांनी नुकतीच पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचा अभ्यास दौरा केला. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक तांत्रिक कौशल्ये व करिअर संधीच्या अनुषंगाने या भेट दिली. प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांचा सहकार्याने आणि उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजलेल्या या अभ्यास दौऱ्यात स्वेरीच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.चित्रसेन मैतई, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ.एम. एस. अभिषेक, डॉ. मृणाल कांती रजक, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील डॉ.आदित्य कुमार अंशू आदी प्राध्यापकांनी या अभ्यास दौऱ्यात सहभाग घेतला.या भेटीत साखर उद्योगाच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असून उद्दिष्ट प्राप्तीसाठी शैक्षणिक विस्तार, संशोधन आणि विकास या तीन मुख्य बाबींवर या दौऱ्यादरम्यान झालेला अभ्यास हा अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांसाठी खूप उपयोगी पडणार आहे. शुगर टेक्नॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. कार्कला गंगाधरम आणि वरिष्ठ शुगर अभियंता डॉ. आण्णासाहेब कोटकर व राजेंद्र भुईटे व सहकाऱ्यांनी प्राध्यापकांचे स्वागत केले. यामध्ये प्राध्यापकांनी त्यांच्याकडून महत्वाच्या बाबी जाणून घेतल्या यामध्ये उसाच्या प्रसंस्करणातील कार्यक्षमता सुधारणे, उत्पादनाच्या नाविन्यपूर्ण अनुप्रयोगावर लक्ष केंद्रित करणे, साखर उत्पादन, कचरा व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, विद्युत ऊर्जा जतन करण्याच्या संधी या मुख्य क्षेत्रांचा अभ्यास केला.



### डॉ. आंबेडकरांमुळेच मी सभापती झालो : डॉ. शुभम आगवणे

**पंढरपूर, दि.३१ मार्च -**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याची संधी संविधानातून दिली. आज बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या अधिकारामुळेच मी पंढरपूर पंचायत समितीचा सभापती झालो हे बाबासाहेबांचे माझ्यावर आणि आपणा सर्वांवर थोर उपकार आहेत असे उद्गार पंढरपूर पंचायत समितीचे सभापती डॉ. शुभम आगवणे यांनी काढले. डॉक्टर आंबेडकर मध्यवर्ती जयंती समितीच्या वतीने आयोजित रंगभरण स्पर्धेचे उद्घाटन डॉ. आगवणे यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी व्यापार व उद्योग सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे होते. यावेळी आरपीआयचे ज्येष्ठ नेते सुनील सर्वगोड, जितेंद्र बनसोडे, आरपीआय तालुकाध्यक्ष संतोष पवार, संग्राम अभंगराव, अभिराज उबाळे, जितेंद्र आठवले, समाधान लोखंडे, शैलेश आगावणे उपस्थित होते.

### वॉशिंग मशीनसाठी विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि.३१ मार्च-**

लग्न झाल्यापासून ऑक्टोबर २०२५ ते १० डिसेंबर २०२५ पर्यंत किरण पांडुरंग बेंजरपे (माहेरचे नाव) किरण श्रीगणेश शिरहट्टी (सासरचे नाव) वय २६, रा. हल्ली मुक्काम कावेरी नगर, वाकड पोलीस लाईन, बिल्डिंग नंबर ३९, रूम नंबर ८, पिंपरी चिंचवड यांचे सहा महिन्यानंतर आरोपी श्रीगणेश गोविंद शिरहट्टी (पती), रा. सुशील नगर, कमला नगर, सोलापूर याने तू नोकरी सोडली तरच मी तुला नांदवितो तसेच वाशिंग मशीन घेण्यासाठी ५५ हजार रुपये घेऊन ये म्हणून शारीरिक छळवणूक केली. आरोपी वृंदाशिर हट्टी (ननंद), रतन गणूरे (नंदवे), वैशाली विश्वास गवंडी (ननंद) रा. सोलापूर, सुनिता विजय गुंठे (पतीची मावशी) रा. अक्कलकोट, ललिता गणोरे (नंदेची सासू) रा. सोलापूर यांनी बहिणीच्या लग्नात दोन तोळे सोन्याचे मागणी करून ते का दिले नाही असे म्हणून अपमानास्पद वागणूक दिली. तसेच लग्नात किरण यांच्या आई-वडिलांनी मानपान केला नाही. लग्नात चांगल्या दर्जाची वस्तू दिली नाही. या कारणावरून घालून पाडून बोलून वारंवार टोमणे मारून, मानसिक त्रास देऊन छळवणूक केली. याबाबत सदर बाजार पोलीस ठाण्यात दि. ३० मार्च रोजी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास प्रवीण पारडे करत आहेत.

# विकासाभिमुख कामातून जनतेचा विश्वास दृढ करा

## प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे; अकलूज नगरपरिषदेवर राष्ट्रवादीचा एकहाती विजय मिळवल्याबद्दल मुंबईत सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ मार्च-**

अकलूजमधील हा विजय केवळ निवडणुकीतील यश नसून, तो जनतेच्या विश्वासाचा आणि कार्यकर्त्यांच्या एकजुटीचा परिणाम आहे. विकासाभिमुख कामातून हा विश्वास अधिक दृढ करा, असा स्पष्ट संदेश प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिला.



राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने अकलूज नगरपरिषदेत मिळवलेल्या एकहाती व निर्विवाद विजयाच्या पार्श्वभूमिवर मुंबईत विजयी पदाधिकाऱ्यांचा भव्य आणि उत्साहपूर्ण सत्कार सोहळा पार पडला. पक्षाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते नगराध्यक्ष रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील आणि सर्व विजयी नगरसेवकांचा गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. अकलूज नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने स्पष्ट बहुमतासह सत्ता स्थापन करत स्थानिक राजकारणात आपली मजबूत पकड पुन्हा अधोरेखित केली आहे. या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट उसळली असून, राज्यभरात या निकालाची दखल घेतली जात आहे.

सत्कार सोहळ्यात क्रांतिसिंह माने पाटील, सचिन देशमुख, विशाल मोरे, नासिक आबा सोनवणे, मोहसीन शेख, विलास क्षीरसागर, अझर शेख, मिलिंद कोतमिरे, युवराज दोरकर, वैशाली भोसले, मनीषा तिकोटे, प्रियांका गायकवाड, मंदाकिनी पाडोळे, मृदुला सूर्यवंशी, प्रतिभा गायकवाड, शितल बनपट्टे, रेश्मा तांबोळी या नगरसेवकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

त्यांच्या कामगिरीचे कौतुक करत पक्ष नेतृत्वाने भविष्यातही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला लालासाहेब अडगळे, महेश सूर्यवंशी, धनाजी भोसले, संजय पाडुळे, लखन गायकवाड, मोहन तिकोटे, विलास गायकवाड, रवी लव्हाळे, सुनील पवार, गणेश वसेकर, परशुराम बनपट्टे, पुष्कराज दिवाडकर, इकबाल तांबोळी उपस्थित होते.

## निंभोरेची ज्ञानेश्वरी काळदाते सोलापूर पोलिस दलात भरती

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.३१ मार्च-**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सोलापूर ग्रामीण पोलीस दलात निवड झाल्याबद्दल निंभोरे येथील ज्ञानेश्वरी काळदातेचा निंभोरे ग्रामस्थ व योद्धा कारिअर ॲकॅडमीच्या वतीने मकाई कारखान्याचे माजी अध्यक्ष दिग्विजय बागल व मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला




निंभोरे (ता.करमाळा) येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलीची जिद्द कष्ट आणि चिकाटीच्या जोरावर सोलापूर पोलीस दलात निवड झाली आहे. आई-वडिलांची बेताची परिस्थिती असताना बारावीनंतर पुढील शिक्षण घेणे शक्य नसल्याने स्वतःच्या पायावर उभे राहून नोकरी मिळवावी या हेतूने पोलीस भरतीचा सराव सुरू केला सोलापूर ग्रामीण पोलीस दलात भरती निघाल्यानंतर काही दिवस जेऊरवाडी येथील योद्धा करिअर अकॅडमीचे नवनाथ नाईकनवरे व इतर सहकाऱ्यांनी तिला योग्य मार्गदर्शन केल्याने पहिल्याच प्रयत्नात चांगल्या गुण मिळवत तिची सोलापूर ग्रामीण पोलीस दलात निवड झाली आहे.

या यशाबद्दल निंभोरे ग्रामस्थांच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी निंभोरे ग्रामपंचायतचे सरपंच रवींद्र वळेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलिस निरीक्षक स्वप्निल लोंढे उपस्थित होते. प्रास्ताविक नवनाथ नाईकनवरे यांनी केले. याबरोबरच योद्धा ॲकॅडमीमधील ऋतूराज शिर्के या विद्यार्थ्यांचीही महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. यावेळी सरपंच रवींद्र वळेकर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल लोंढे, राजेश वरकड यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक अविनाश वळेकर, योद्धा ॲकॅडमीचे अध्यक्ष हंबीरराव नाईकनवरे, नागनाथ काळदाते, ज्ञानेश्वर वाघमारे, अमोल काळदाते, निशा अनपट, सोनाली नाईकनवरे उपस्थित होते.

## रिक्षात भरावयाच्या गॅसची वाढीव दराने आकारणी; रिक्षा सेना आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३१ मार्च-**

बार्शी शहर रिक्षा सेनेच्यावतीने शहरातील रिक्षा चालकांना भेडसावणाऱ्या एल.पी.जी. आणि सी.एन.जी. गॅसच्या तुटवड्याबाबत आणि वाढीव दराबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. रिक्षा सेनेचे अध्यक्ष राजेंद्र मुळे यांनी आमदार दिलीपरावजी सोपल यांना लेखी निवेदन देऊन या प्रश्नी तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे निवेदनात नमूद केल्यानुसार, पूर्वी एल.पी.जी. गॅसचा दर ५० रुपये प्रति लिटर होता. मात्र, सध्या अधिकृत डीलर युद्धाचे कारण सांगून मनमानी पद्धतीने ९८ रुपये प्रति लिटर दराने विक्री करत आहेत.

गॅसच्या दरात थेट ४८ रुपयांची वाढ झाल्यामुळे रिक्षा चालकांना दररोज मोठ्या आर्थिक रिक्षा सेनेच्या मागण्या शासकीय दराची अंमलबजावणीः शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच गॅसची विक्री करण्याचे आदेश पंपांना देण्यात यावेत. बार्शी शहरातील प्रत्येक गॅस पंपावर शासनाचा अधिकृत दरदर्शक बोर्ड लावण्यात यावा. तक्रार निवारणासाठी त्या बोर्डवर प्रशासकीय कार्यालयाचे आणि संबंधित अधिकाऱ्यांचे मोबाइल नंबर असावेत, जेणेकरून रिक्षा चालक त्वरित तक्रार करू शकतील.

सी.एन.जी. आणि एल.पी.जी. गॅसचा पुरवठा विनाव्यत्यय सुरू राहावा. नुकसानीचा सामना करावा लागत आहे. सोलापूर आणि बार्शी परिसरातील अधिकृत पंपांवर रिक्षा चालकांना नियमित गॅस पुरवठा होत नसल्याने व्यवसायावर गदा आली आहे.

निवेदनाच्या प्रती खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाधिकारी सोलापूर, तहसीलदार बार्शी आणि पोलीस निरीक्षक बार्शी यांना माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. रिक्षा चालकांच्या या प्रश्नावर प्रशासनाने लवकर तोडगा न काढल्यास आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## गोर -गरीबांच्या मुलांसाठी शिक्षकांनी ज्ञानदान करावे

### सभापती देशमुख; आदर्श शिक्षक पुरस्कार कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३१ मार्च-**

आदर्श शिक्षक पुरस्कार हा ज्या शिक्षकांना मिळाला आहे,त्यांच्या कामाचे फळ आहे,भविष्यात त्यांच्या हातून उज्वल काम व्हावे, प्राथमिक शिक्षकांचे कार्य यशस्वी व्हावे, गोरगरीब लोकांच्या मुलांसाठी काम आपल्या हातून व्हावे, असे प्रतिपादन सभापती पंडित देशमुख यांनी कुर्डूवाडी येथील कार्यक्रमात केले. ते शिक्षक पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते.



कुर्डूवाडी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम सावित्रीबाई फुले व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर आ. अभिजीत पाटील, माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे, उपसभापती स्वाती गिड्डे, जि.प.सदस्य अण्णासाहेब ढाणे, जि. प. सदस्या सविता कोकाटे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव,पं.स.सदस्या सोनाली माळी, प्रा. आशिष रजपूत, प्रतिभा खरात, प्रा.नितीन झाडबुके, बिभीषण डांगे, नगरसेवक रेश्मा लंकेश्वर, डीसीसीचे माजी संचालक विलासराव देशमुख, उल्हास राऊत, नितीन कापसे, बालाजी पाटील, दिगंबर माळी, योगेश दळवे, सरपंच हनुमंत गिड्डे उपस्थित होते. सूत्रसंचालन अतुल देशमुख व अनिल क्षीरसागर यांनी केले.

### आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षक

आशा डावरे, हरी माने, मनीषा लोंढे, अंकुश गवळी, वर्षाराणी शिराळ, सविता तरकसवंद, ताई चव्हाण, मेघा कोंडूभैरी, शिवदास कुबेर, प्रफुल्ल गायकवाड, जयश्री वायाळ, रामचंद्र लोकरे, पांडुरंग माळी, शरद रेपाळ, हनुमंत इंगळे, किशोरकुमार आडकर, प्रदीप जाधव, स्वाती राजगुरू, संपत लेंढवे, विद्या भानवसे, सोमनाथ शिंदे.

### दोन्ही आमदारांना शिक्षण विभागाचे विशेष आमंत्रण

माढा व करमाळा विधानसभा मतदार संघाची रचना बदलल्यापासून यावर्षी प्रथमच दोन्ही मतदार संघाचे आमदार एका पक्षाचे तर पंचायत समितीवर सत्ता दुसऱ्यांची अशी परिस्थीती आहे. माढा पंचायत समितीवर भाजपा व राष्ट्रवादी अजीत पवार गटाची सत्ता आहे. माजी आ. संजयमामा शिंदे व जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांची सत्ता आहे. आजपर्यंत एकदाही शिक्षण विभागाने विरोधी आमदारांना कार्यक्रमाला निमंत्रीत केले नव्हते. मात्र यावर्षी शिक्षण विभागाने करमाळा व माढाच्या दोन्ही आमदारांना विशेष आमंत्रण देण्यात आले होते. त्यामुळे माढ्याचे आ. अभिजीत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपिठावर विराजमान झाले.आमदार येताच अनेकांच्या भूवया उंचावल्या.

## ट्रॅक्टर अडवून पाच हजारांची लूट

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३१ मार्च-**

येथील मार्केट यार्डमध्ये शेतीमाल घेऊन जाणाऱ्या एका शेतकऱ्याला अडवून, त्यांच्याकडून ५ हजार रुपयांची रोकड जबरीने हिसकावून घेतल्याची घटना ३० मार्च रोजी पहाटेच्या सुमारास घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी दोघांना पोलिसांनी घटनास्थळावरुनच ताब्यात घेतले आहे.

सुजित युवराज मोरे (वय- २२, रा. साकत, ता. बार्शी) हे २९ मार्च रोजी सायंकाळी आपल्या ट्रॅक्टरमध्ये कडबा भरुन विक्रीसाठी बार्शी मार्केट यार्डकडे निघाले होते. ३० मार्च रोजी पहाटे २:३० च्या सुमारास ते बार्शीतील भोसले चौक परिसरातून जात असताना, तीन अनोळखी इसमांनी त्यांच्या ट्रॅक्टरसमोर मोटारसायकल आडवी लावून ट्रॅक्टर थांबवला. या तिघांनी सुजित मोरे यांना, आम्हाला दारु पिण्यासाठी पैसे दे, नाहीतर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. त्यांनी मोरे यांना हाताने मारहाण खिशातील ५ हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले. सुजित मोरे खूप घाबरलेले करुन त्यांच्या असतानाच, त्याच वेळी गस्त घालणारी पोलिसांची गाडी तिथे आली. पोलिसांची गाडी पाहताच तिघांनी पळण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्परता दाखवत त्यातील दोघांना ताब्यात घेतले, तर एक जण पळून जाण्यात यशस्वी झाला. पकडलेल्या आरोपींची नावे किरण राजू शेंडगे आणि विशाल उर्फ केशव तिसरा आरोपी सुमित काकडे हा पसार झाला आहे.

# मंद्रूप ग्रामपंचायतकडून शासन नियमाला हरताळ

### कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३१ मार्च-**

माझी वसुंधरा योजनेत प्रथम आणि तृतीय पुरस्कार मिळालेल्या मंद्रूप ग्रामपंचायतीकडून प्लास्टीक खुर्च्या व कचराकुंडी खरेदी करून माझी वसुंधरा योजनेतील शासनाच्या नियमाला हरताळ फासण्यात आला आहे. या योजनेतील निधी खर्ची टाकून मार्चअखेर बिल काढण्यासाठी धावपळ सुरू असून कारवाई न करता बघ्याची भूमिका घेणाऱ्या प्रशासनाची भूमिका गुलदस्त्यात आहे.



माझी वसुंधरा अभियानातून मंद्रूप ग्राम पंचायतला प्रथम व तृतीय क्रमांकासाठी दोन कोटी ७५ लाख रुपये बक्षीस प्राप्त मिळाले आहेत. या रक्कमेतून पर्यावरण पूरक साहित्य खरेदी करून पर्यावरण संवर्धनाचे काम करणे गरजेचे असताना ग्रामपंचायतीकडून प्लास्टिक खुर्ची व प्लास्टीक कचराकुंडीसह विविध साहित्य खरेदी करून माझी वसुंधरा अभियानाच्या पुरस्काराचे नियम पादळी तुडविण्यात आले आहेत.

शिवाय मंद्रुपमध्ये मोठ्या प्रमाणात कॅरीबॅग व प्लॅस्टिकचा वापर वाढला असून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ग्रामपंचायतीकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे नियमाचे उल्लंघन करणाऱ्या ग्रामपंचायतीकडून माझी वसुंधरा योजनेतील रक्कम खर्ची टाकण्याचा प्रयत्न सुरू असून प्रशासन मात्र मूग गिळून गप्प आहे. एकीकडे याबाबत तक्रार करूनही पंचायत समिती कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होताना दिसून येत नाही तर दुसरीकडे ग्रामसेवक दहा महिन्यांपासून पदभार न देता बिनदिक्कत रक्कम खर्ची टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे नियमबाह्य कामाला प्रशासनाची संमती आहे का ? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज्य अभियानात मंद्रूप ग्रामपंचायतीचा सहभाग असून पुरस्कारासाठी निवड करताना माझी वसुंधराचा निधी खर्च करून पर्यावरणाचे नुकसान करणार्या प्लास्टीक वापराचाही तपासणी करण्यात यावे. तसेच शासनाचे नियम धाब्यावर बसवून प्लास्टीक साहित्य खरेदी करणाऱ्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



# शेतकरी आणि वाटसरूंसाठी बार्शीत थंड पाण्याची सोय

### उन्हामुळे दिलासा; मोरया क्रिकेट क्लब व धर्मात्मा युवा मंचचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मार्च-**

उन्हाळ्याची चाहूल लागताच तापमानात झपाट्याने वाढ होत असून, कडक उन्हामुळे नागरिकांची लाहीलाही होत आहे. अशा परिस्थितीत शहरात कामानिमित्त येणाऱ्या शेतकरी, मजूर व सर्वसामान्य वाटसरुंना पिण्याच्या पाण्यासाठी होणारी गैरसोय दूर करण्याच्या उद्देशाने बार्शीत एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला आहे.

मोरया क्रिकेट क्लब आणि माजी नगराध्यक्ष कै. श्रीकांत पिसे यांच्या नावाने स्थापन केलेल्या धर्मात्मा युवा मंच बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मोफत 'पाणपोई' सुरु करण्यात आली असून, या पाणपोईचे उद्घाटन विनोद वडतिले आणि योगेश शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सागर सोत्रे, विनोद वडतिले, तुकाराम कुंचे, योगेश शुक्ला, अजय परदेशी, धनंजय धारुरकर, आकाश सोत्रे, भालचंद्र गुंगे, राम बोविंदवार, आनंद देबडवार, महादेव चौधरी, पंकज अलमलकर, समर्थ हिंगमिरे व प्रवीण पवार आदी मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे, मोफत पाणपोईचा हा उपक्रम यंदा सलग तिसऱ्या वर्षी राबविण्यात येत आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सिंदखेड येथे श्री हनुमान यात्रेस आजपासून सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३१ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सिंदखेड येथील श्री हनुमान यात्रेस मंगळवारपासून प्रारंभ होत असून ही यात्रा चार दिवस चालणार आहे.

यानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार (दि. १ एप्रिल) रोजी सायंकाळी श्री हनुमान व जिवाजी मास्तर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येणार असून देवतांना तेलाभिषेक करण्यात येईल. गुरुवारी पहाटे रुद्राभिषेकानंतर नंदीध्वज व पालखीची मिरवणूक काढण्यात येणार असून दहीहंडी कार्यक्रमही होणार आहे. दिवसभर कर्नाटकातील सुप्रसिद्ध ढोलकी कार्यक्रम तसेच रात्री प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.



शुक्रवारी शोभेचे दारूकाम, आध्यात्मिक विषयावरील प्रवचन व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. शनिवारी ढोलकी कार्यक्रम, तालुक्यातील नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्या तसेच माता तप्पीदा मैदन अर्थात देवरहंता अण्णा हे कन्नड सामाजिक नाटक सादर करण्यात येणार आहे. दररोज रात्री महातेंश हिरेमठ महास्वामीजी (तद्देवाडी) यांचे आध्यात्मिक जीवनावर प्रवचन होणार असून यात्रेदरम्यान भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या यात्रेत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे

### मल्लिकार्जुन यात्रा महोत्सवानिमित्त खिरीचा महाप्रसाद वाटप

**अक्कलकोट, दि. ३१ मार्च-**

ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा महोत्सवानिमित्त नंदीध्वज काट्यांचे मानकरी सुनील नंदीकोले परिवाराच्या वतीने हजारो भाविकांना खिरीचा महाप्रसाद वाटप करण्यात आले. या परिवाराची अन्नदानाची शेकडो वर्षांपासूनची परंपरा अखंडपणे सुरू आहे. प्रारंभी श्री मल्लिकार्जुन देवस्थानात महाप्रसादाचा नैवेद्य श्रीशैल मल्लीकार्जुन महाराज की जय च्या मोठ्या जयघोषात अर्पण करण्यात आला. दिवसभर सुमारे एक हजाराहून अधिक भाविकांनी खिरीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला. या महाप्रसाद वाटपाचा शुभारंभ नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी श्री मल्लिकार्जुन देवस्थानचे अध्यक्ष वेदमूर्ती शिवलिंगय्या स्वामी, उद्योगपती प्रकाश उण्णद, सुनील गोरे, राजशेखर हिप्परगी, राजशेखर नागुरे, मानकरी अमोल पाटील, निखिल पाटील, माळी समाजाचे नेते संतोष पराणे, नगरसेवक महेश हिंडोळे, कांतु धनशेट्टी, रमेश कापसे, देविदास कवटगी, सचिन स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बसवराज नंदीकोले, सचिन नंदीकोले, सुरेश नंदीकोले, संजय नंदीकोले, राहुल नंदीकोले, श्रीकांत नंदीकोले, सोमनाथ नंदीकोले, शिवशंकर नंदीकोले यांच्यासह शशिकांत नंदिकोले, आकाश नंदिकोले संदीप नंदिकोले, शरणप्पा म्हेत्रे, श्रीशैल म्हेत्रे, महादेव म्हेत्रे आदींनी परिश्रम घेतले.



### साळुंखे पाटील यांच्या स्मारकाला पालकमंत्री गोरेनी केले अभिवादन

**सांगोला, दि.३१ मार्च-**

ग्रामविकास आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे रविवार दि.२९ मार्च रोजी आपल्या नियोजित सांगोला दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी जवळा येथील स्व.आ.काकासाहेब साळुंखे पाटील आणि स्व.शारदादेवी साळुंखे पाटील यांच्या स्मारकाला भेट देऊन अभिवादन केले. यावेळी माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील, बाळासाहेब एरंडे, ड.सचिन देशमुख, ड.यशराजे साळुंखे पाटील, सभापती पूनम इंगवले, नवनाथ मगर, बाळासाहेब काटकर, चंद्रकांत चौगुले, पं.स. सदस्य बापू जावीर, प्रशांत वलेकर, सरपंच सज्जन मागाडे उपस्थित होते.

### शेअर मार्केट फसवणूक प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

केरळ येथील रहिवासी महेश मूरक्कना वय-३९ वर्षे, रा. थ्रीसूर केरळ याची सोलापूर येथील ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ श्री.एन.ए.मोर यांनी शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक करुन फसवणूक केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यात जामीन मंजूर केला. याची थोडक्यात हकीकत अशी की, दि.०१/०५/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजणेच्या सुमारास फिर्यादी हे त्यांचे घरी असताना यातील आरोपीनी बनावट लिंक व बनावट ट्रेडींग ॲप तयार करुन त्याचे माध्यमातुन जादा शेअर मार्केट मधून जास्ती प्रॉफिट मिळवून देतो असे अश्वासन देवून फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, फिर्यादीकडून कडुन वेळोवेळी तीस लाख अकरा हजार शंभर इतकी रक्कम वेगवेगळ्या खात्यात RTGS व UPI द्वारे जमा करण्यास भाग पाडून ती रक्कम स्वतःचे फायदयाकरीता काढुन घेतली. तसेच ॲपवरील फिर्यादीच्या अकाऊंटमधील माहिती डिलीट करुन शेअर ट्रेडींगमध्ये गुंतवलेली रक्कम परत न करता फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली म्हणून फिर्यादीने सायबर पोलिसात तक्रार दाखल केली होती.



सदर फिर्यादीच्या अनुषंगाने सोलापूर सायबर पोलीसांनी सखोल तपास करुन आरोपींस शहर थ्रीसूर केरळ येथून अटक केली होती. सदर आरोपीने सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टासमोर जामीन अर्ज दाखल केला होता. सदर प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झालेले आहे, तपासपूर्ण झालेला आहे, त्यामुळे आरोपीस जामीन देण्यास कोणतीही हरकत नाही. असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांनी केला तसेच त्या अनुषंगाने उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे सादर केले, सदरचा युक्तीवाद ग्राहय धरुन मे. कोर्टाने आरोपीस जामीनावर सोडण्याचा आदेश पारीत केला. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. देवदत्त बोरगांवकर ॲड. निकिता कुलकर्णी, ॲड. शिवानी करवा सरकारतर्फे ॲड. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

## अकलूज परिसरात भगवान महावीर जयंती उत्साहात

### शांतीसागर ढोल पथकासह सुवाद्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३१ मार्च-**

अहिंसा परमो धर्माची शिकवण देणारे जैन धर्मियांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती अकलूज व परिसरामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी सकाळी ७ वाजता शिवापूर पेठ येथील विसाहुमड दिगंबर जैन मंदिरातून भगवान महावीरांच्या पालखीची परिसरातून शांतीसागर ढोल पथकासह सुवाद्य मिरवणूक काढण्यात आली.



या मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्वच श्रावक, श्राविकांनी भगवान महावीरांचा जयघोष केला. दुपारी मंदिरात भगवान महावीरांच्या मूर्तीचा अभिषेक मंगेश गांधी व सौ मयुरा गांधी यांच्या हस्ते झाला. तर बाहुबली गांधी यांच्यावतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी सुनील दोशी व परिवाराच्या वतीने भगवान महावीरांचा जन्म सोहळा साजरा करण्यात आला. अध्यक्ष इंद्रराज दोशी यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी सर्वच महिला मंडळे व सामाजिक मंडळांनी दिवसभराच्या उपक्रमात सहभाग घेतला.

संग्रामनगर येथेही सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीरांचा जन्म सोहळा साजरा करण्यात आला. सकाळी संग्रामनगर परिसरातून भगवान महावीरांची पालखी वाजत गाजत काढण्यात आली. भगवान महावीरांचा अभिषेक भरतेश उपाध्ये व सविता उपाध्ये यांच्या हस्ते झाला. दुपारी समाजाच्या वतीने सर्वांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. सायंकाळी भगवान महावीरांच्या जन्म सोहळयात कविता मगदूम, सुवर्णा सावळे, सुनीता कवठे यांच्यासह समाजातील महिलांनी सहभाग घेतला. येथील सर्व समाज बांधवांनी सदरचा सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा केला. सुभाष पंडीत यांनी धर्मप्रभावनेतून वातावरण मंत्रमुग्ध केले. भारत वर्ष दिगंबर जैन तिर्थक्षेत्र कमिटीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मिहीर गांधी व सन्मती सेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी येथे भेट देऊन भगवान महावीरांच्या दर्शनाचा लाभ घेतला.



### माळशिरसमध्ये भगवान महावीरांची सवाद्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३१ मार्च-**

माळशिरस येथे जैन समाजाच्या वतीने महावीर जयंती उत्साहात व भक्ती भावात साजरी करण्यात आली. यावेळी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते

महावीर जयंतीनिमित्त जैन समाजाच्यावतीने सकाळी मंदिरात ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर शहरातून भगवान महावीरांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. सकाळी नऊ वाजता मंदिरामध्ये अभिषेक करण्यात आला. त्यानंतर दहा वाजता धर्मानुरागी दिलीपराव दोंगडे मिरजगांव यांचे प्रवचन झाले त्यानंतर भोजनाचा आस्वाद सर्वांनी घेतला. या कार्यक्रमाच्या वेळी प्रकाश अंबुडकर, विनोद दोशी, अभिजीत दोभाडा, अनुप दोशी, अभयकुमार दोशी, संतोष देशमाने, शशिकांत दोशी, सुकुमार दोशी, अनिल दोशी यासह समाजातील सर्व महिला व नागरिक उपस्थित होते.

### श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयातर्फे चप्पल वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३१ मार्च-**

बार्शी येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय बार्शी येथे आज भगवान महावीर जयंतीनिमित्त बार्शी शहरातील गोरगरिबांना १०१ चप्पलांचे मोफत वाटप करण्यात आले आहे. पद्ममभाई कांकरिया, अशोकभाई श्रीश्रीमाळ, प्रवीणभाई पुनमिया, प्रमोदभाई वखारिया यांचे हस्ते गोरगरिबांना चप्पलांचे मोफत वाटप करण्यात आले यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, ऑ.सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, प्रमोद भंडारी, श्री जैनाश्रमचे अध्यक्ष जयचंद सुराणा, ऑ.सेक्रेटरी ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ, गौतमचंद बोथरा, अशोक कुंकूलोळ, अशोक,सुराणा, माणीकभाऊ सुराणा, राहुल दुगड, किरण श्रीश्रीमाळ, यश कुंकूलोळ उपस्थित होते. कार्यक्रमास माझी आमदार राजाभाऊ राऊत, बार्शी नगरपालिकाच्या नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, प्रशांत कथले यांनी भेट दिली. कार्यक्रमानंतर प्रमुख पाहुणे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, सहा.ग्रंथपाल शितल लुकडे, क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.

### कुर्डुवाडीत जैन समाजाची शोभायात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**कुर्डूवाडी, दि.३१ मार्च-**

शहरात दिगंबर श्वेतांबर सकल जैन समाजाने भगवान महावीर जन्म कल्याणक निमित्त शोभा यात्रा काढली. ढोल ताशा बँडच्या गजरात शहरातील प्रमुख मार्गावरून श्रावक, श्राविका, महावीरांची पालखी, भगवान महावीरांचे तैलचित्र असलेली प्रतिमा भगवान महावीर स्वामी कि जय असा जय घोष करत मार्गस्त झाली. शहरात ठीक ठिकाणी भगवान महावीरांच्या पालखीचे पूजन करण्यात आले.



**कुर्डूवाडी नगर परिषद सभागृहात महावीर जन्मकल्याणक साजरी**

नगर परिषद सभागृहात भगवान महावीर जन्म कल्याणक साजरी करण्यात आली. यावेळी कै. काशिनाथ भिसे सभागृहात नगराध्यक्ष जयश्री भिसे यांच्या हस्ते भगवन महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष सविता जगताप, नगरसेविका वृषाली गांधी, मोहसिन मकणु, संजय टोणपे, शुभ्रा गोरे, वासिम मुलाणी, आनंद कदम, शकील तांबोळी, अबोली चौधरी, भाग्यश्री पाटील, बापूसाहेब जगताप, संतोष क्षीरसागर, विशाल गोरे उपस्थित होते.

महावीर भगवान कि जय, अहिंसा परमो धर्म कि जय अशा घोषणांनी सभागृह दणाणून गेले. यावेळी प्रशासन अधिकारी बापू चौबे, महेश गांधी ,चेतन शहा, केतन संचेती,नितीन दोशी, अनुप दोशी, प्रमोद पलसे, डॉ. प्रवीण तांबोळी, मनोज खडके, केशर सोनिमिंडे, किरण दोशी, नितीन पापरीकर, राजेश गांधी, संदीप दोशी, सुनील पुरवत, संजय पुरवत, आरिहंत कोठारी, निखील धोका, राहुल शहा, सुगंध धर्मराज, विजयकुमार पालिया, नितीन दोशी, जयंत पुरवत, संतोष दोशी, संजय देशमाने, महावीर देशमाने, सचिन शहा,वैशाली शहा,सायली शहा, स्नेहल पुरवत, प्रीती गांधी, माधुरी शहा, पल्लवी शहा, मयुरी शहा, निकिता दोशी, रिया शहा, पद्मा देशमाने, विद्या रणदिवे उपस्थित होते. यावेळी नगरसेविका वृषाली गांधी, वैशाली शहा, रिया गांधी यांनी भगवान महावीरांच्या विषयी माहिती दिली.


## बार्शीत भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक उत्साहात

**शोभायात्रा, रक्तदान, महाप्रसाद व सामाजिक उपक्रमांनी शहरात धार्मिक वातावरण**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मार्च-**

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर व अहिंसेचा संदेश देणारे भगवान महावीर स्वामी यांचा २६२५ वा जन्म कल्याणक दिवस मंगळवारी रोजी बार्शीत मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. सकल जैन समाजाच्यावतीने धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यानिमित्ताने श्री वर्धमान जैन स्थानक येथून भगवान महावीरांच्या प्रतिमेसह फुलांनी सजवलेल्या रथातून भव्य शोभायात्रेला सुरुवात झाली. सवाद्य मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरुन मार्गक्रमण करत श्री जैन श्वेतांबर ऋषभदेव मंदिर येथे विसर्जित झाली. शोभायात्रेदरम्यान शहरात ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पवृष्टी करुन स्वागत केले. ज्या भागांत शोभायात्रा पोहोचू शकली नाही, तेथे युवक-युवतींनी 'अहिंसा मोटरसायकल रॅली' काढून भगवान महावीरांचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविला. रक्तदान शिबिरात ७८ जणांचा सहभाग भगवान महावीर स्वामी जयंतीनिमित्त श्री वर्धमान नवयुवक मंडळ व रामभाई शहा रक्तपेढी यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात एकूण ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. युवकांसह महिला वर्गानेही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्व. पन्नालालजी मोहनलालजी श्रीश्रीमाळ यांच्या स्मरणार्थ समाज बांधवांसाठी पारंपरिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



जैन समाजाच्या वतीने वर्षभर जिवदया, 'जैन झुणका भाकर केंद्र', श्री महावीर धर्मार्थ दवाखाना तसेच श्री नवकार जैन सेवातीर्थ अंतर्गत सुमारे २५० गायींचे संगोपन असे विविध सेवाभावी उपक्रम राबविले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.या उत्सवाला आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, वर्षाताई ठोंबरे, माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत यांनी भेट देऊन समाजाला शुभेच्छा दिल्या.

उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध जैन संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले. यात ट्रस्टी अध्यक्ष सुमतीलाल मुनोत, शैलेश वखारिया, स्थानकवासी संघाचे अध्यक्ष जयचंद सुराणा, सचिव दिनेश श्रीश्रीमाळ, पदमचंद कांकरिया, अशोक श्रीश्रीमाळ, राहुल कुंकूलोळ, सेवा संघाचे अध्यक्ष सुभाष लोढा, महेश बाफना, वाचनालयाचे अध्यक्ष किशोर (बाळासाहेब) श्रीश्रीमाळ, आनंद पुनमिया, धीरज कुंकूलोळ, तसेच इतर समाजबंधूंचा समावेश होता.



